# वृषाली जोशी






# विश्वकथा–२

# विश्वकथा २

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

# विश्वकथा२

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# विश्वकथा २

लेखक : विविध आंतरराष्ट्रीय

अनुवादिका : वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २९ नोव्हेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अनुवादिकेची ओळख



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून व सात पुस्तके ई साहित्यतर्फे प्रसिद्ध

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन

संशोधन प्रकल्पात सहभाग

कॉलेजमध्ये प्राचार्यपद

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके


सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा,


कविता करण्याचा


व शब्दकोडी बनवण्याचा छंद

संपर्क वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९


चलभाष ९९२१७४६२४५



THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
4 BOOKS IN ONE
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअर च्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night



सॉमरसेट मॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
short story by W. Somerset Maugham
BEFORE
THE PARTY


वृषाली जोशी
विश्वकथा१


The Sherlock Holmes
शेरलॉक होम्स
वृषाली जोशी


SHERLOCK
2
HOLMES
शेरलॉक होम्स-२
वृषाली जोशी


THE ADVENTURES OF
SHERLOCK HOLMES
शेरलॉक होम्स ३
वृषाली जोशी
SIR ARTHUR CONAN DOYLE


Adventures of
Sherlock
Holmes
शेरलॉक होम्स ४
वृषाली जोशी
SIR ARTHUR CONAN DOYLE

# वृषाली जोशी यांच्या ई साहित्यवरील नऊ पुस्तकांच्या लिंक्स

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dorian_gray_oscar_wilde_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/saki_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holms_4_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_1a_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_2_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shakespere_stories_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_h_3_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mejavaanipurvi_and_other_stories_somerset_maughm_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/wishwakatha_vrishali_joshi.pdf



# विश्वकथा २ प्रस्तावना

या पुस्तकात जगातील आठ देशांमधील आठ लेखकांच्या कथा अनुवादित केल्या आहेत. टॉलस्टॉय या थोर रशियन लेखकाच्या कथेतून मला, ग दि माडगूळकरांच्या ‘अखेर तुजला जागा लागे साडेतीन हात’ या गाण्याची आठवण होते. मोपॉसा या प्रसिध्द फ्रेंच लेखकाच्या नेकलेस या कथेत आपल्याला, निव्वळ गैरसमजाने वर्षानुवर्षे हालात दिवस काढणारे जोडपे भेटते. स्टीफन्सन या जर्मन लेखकाने मुंग्यांची धाड व त्याविरुध्द जिवाच्या कराराने झुंजणारा लेइनिन्गेन, याची भेट आपल्याला घडवली आहे. स्वीडनच्या हॉलस्ट्रॉमने हनिमून या कथेत नवपरिणीत दाम्पत्य, योगायोगाने कसे त्यांचे पालक गेलेल्या ठिकाणीच जाऊन पोचते, याचे वर्णन केले आहे. अदृष्य संग्रह या कथेत ऑस्ट्रीयाचा लेखक स्टीफन याने जुन्या अमूल्य वस्तूंच्या संग्रहाचे वेड असलेल्या म्हाताऱ्याला फसवणे, कथानायकाला कसे भाग पडते ते लिहीले आहे. कॅनडाच्या रॉबर्टने काळवीटाच्या कथेतून प्राणीप्रेमाबद्दल सांगितले आहे. तर न्यूझीलंडची कॅथरीन एका अस्थिर मनाच्या मनस्वी तरूण मुलीची गोष्ट सांगते. ऑस्ट्रेलियाचा पाल्मर आपल्याला जुळया लहान निरागस मुलांच्या वाढदिवसाची गोष्ट सांगतो.

अशा तऱ्हेने आठ वेगवेगळया देशांमधील कथा हे पुस्तक सादर करते.


# अनुक्रम


| कथा | लेखक | देश | पृष्ठ |
| --- | --- | --- | --- |
| अदृष्य संग्रह | Stefan Zweig | ऑस्ट्रिया | |
| एका माणसाला किती जमीन लागते? | Leo Tolstoy | रशिया | |
| काळवीट आणि रस्टी जोन्स | Sir Charles Douglas Roberts | कॅनडा | |
| जोगीण होणे | Katherine Mansfield | न्यूझीलंड | |
| नेकलेस | Guy de Maupassant | फ्रांस | |
| लेइनिन्गेन विरुद्ध मुंग्या | Carl Stephenson | जर्मनी | |
| वाढदिवस | Vance Palmer | ऑस्ट्रेलिया | |
| हनिमून | Per Hallstrom | स्वीडन | |

**The Invisible Collection by**

**Stefan Zweig**

# अदृष्य संग्रह



ड्रेस्डेननंतरच्या पहिल्या जंक्शनशी एक वयाने मोठा सभ्य गृहस्थ, आल्हाददायकपणे सर्वांकडे बघून हसत, आमच्या डब्यात शिरला. माझ्याकडे बघून जणू जुनी ओळख असल्याप्रमाणे, त्याने विशेष प्रकारे मान हलवली. मी संभ्रमात पडलेली बघून, त्याने त्याचे नाव सांगितले. अर्थात

मी त्याला ओळखत होते. तो बर्लिनमधील प्रसिध्द उच्च मूल्य असलेल्या, पुरातन वस्तू विक्रेता होता. कलावस्तुंमधील व फाईन आर्टमधील जाणकारांपैकी एक होता. लढाईपूर्वी, मी बर्लिनमधील प्रसिध्द लोकांच्या सह्या घेत असे. तो माझ्यासमोर बसला आणि आम्ही काहीतरी बोलत राहिलो. नंतर संभाषणाचा ओघ बदलून, त्याने स्पष्ट केले की तो काय उद्देशाने कुठे गेला होता आणि तिथून आता परतता आहे. एक कलाविक्रेता म्हणून गेल्या सदतीस वर्षांमध्ये त्याला कधी आला नाही, असा विचित्र अनुभव यावेळी आल्याचे, तो पुढे म्हणाला. एवढी ओळख खूप झाली. काही गुंतागुंत टाळण्यासाठी मी त्याच्याच शब्दात, अवतरण चिन्हांशिवाय, त्याची गोष्ट सांगते.

तुम्हाला माहिती आहे (तो म्हणाला) सहजतेने वायू विरून जावा त्याप्रमाणे, माझ्या व्यवसायात पैशाची किंमत घसरत गेली. लढाईमुळे गब्बर झालेल्या लोकांची जुन्या जाणकार कलाकारांमधील (मॅडोना इत्यादी), छापील पुस्तकांतील व जुन्या वस्त्रप्रावरणातील रुची वाढू लागली. त्यांची आस पुरी करणे अवघड होते. स्वतःच्या मनोरंजनासाठी व वापरण्यासाठी, उत्तम ते राखून ठेवणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला स्वतःचे घर रिकामे करणे सोपे नव्हते. मी दिले असते तर माझ्या शर्टाचे कफलिंक व माझ्या लिहिण्याच्या टेबलावरील दिवाही त्यांनी विकत घेतला असता. मातीच्या नक्षीदार भांड्यांसारख्या कलात्मक वस्तू शोधून काढणे कठीण होते. कलात्मक वस्तूचा तू मर्यादित अर्थ घेऊ नकोस. खरे तर त्याबद्दल मी दिलगीर आहे. मी तो शब्द नव्या अर्थाने वापरतो आहे. बोलाचालीची नवीन वाईट पद्धत! -- जुन्या काळच्या व्हेनिसमधील छापखान्यात छापलेले अमूल्य पुस्तक! त्याची कदर नसणाऱ्यांना त्याची किंमत, काही शे किमतीच्या कोटापेक्षा काहीच जास्त वाटत नाही. जसे गुर्सिनोने काढलेले चित्र त्यांना काही हजार डॉलरच्या चेकपेक्षा जास्त लायकीचे किंवा शरीर सोडून गेलेल्या आत्म्याच्या पूजनीयतेपेक्षा जास्त मान द्यावा असे मुळीच वाटत नाही.

अशा माणसांच्या पैसे उडवायच्या हव्यासाला विरोध करणे अशक्य आहे. मी एखाद्या रात्री माझ्या आजूबाजूला बघतो तेव्हा मला कलात्मक वस्तूंची किंमत इतकी कमी झालेली

आढळते की मला वाटते, माझा व्यवसाय बंद करावा. हा माझ्या आजोबांपासून व वडिलांपासून माझ्याकडे चालत आलेला व्यवसाय आहे. पण आता दुकानात इतक्या भंगार वस्तू असतात की १९१४ पूर्वी एखाद्या रस्त्यावरच्या हातगाडीवाल्याला सुद्धा त्या विकायची लाज वाटली असती.

अशा संभ्रमावस्थेत असलेल्या व्यवसायाबद्दल मला असे वाटले, की जुन्या रजिस्टर्सची पाने चाळावीत. पूर्वी भरभराटीच्या काळी माझ्याकडून ज्यांनी काही विकत घेतले, ते त्यांनी स्वखुशीने परत केले तर मी ते नक्की घेईन. खरच अशा एके काळच्या गिऱ्हाईकांची यादी केली, तर तिची तुलना रणांगणावर लढाईत मारल्या गेलेल्या शूरवीरांच्या इतस्तः पडलेल्या प्रेतांशीच करता यईल. आणि लवकरच माझ्या लक्षात आले, की असे गिऱ्हाईक मरण पावले आहेत किंवा त्या वाटेवर असल्यामुळे, आधीच त्यांच्याकडील मूल्यवान वस्तू येईल त्या किमतीला विकून मोकळे झाले आहेत. तरीही मला अजून जिवंत असलेल्या एका म्हाताऱ्या माणसाकडे, मी पत्रांचा गठ्ठा विकला असल्याची नोंद मिळाली. पण तो फार वयस्क असल्यामुळे, मी त्याला विसरलो होतो. १९१४ च्या उन्हाळयानंतर त्याने माझ्याकडून काही खरेदी केले नव्हते. हो. खूप खूप जुने गिऱ्हाईक! आधीची काही पत्रे अर्धशतकापेक्षा जुनी होती, जेव्हा माझे आजोबा व्यवसाय बघत होते. गेले सदतीस वर्षांच्या माझ्या कारकिर्दीत, मला तरी त्या माणसाशी काही खासगी संबंध असलेले आठवत नव्हते. एकंदरीत असे दिसत होते की जर्मनीतील काही शहरांमध्ये असे पुरातन काळातील चक्रम लोक अजून जिवंत होते. त्यांच्याकडे कोरलेले लेखन असलेले ताम्रपट होते. माझ्याकडील रजिस्टरमध्ये प्रत्येक वस्तूच्या नावाखाली लाल रेष ओढलेली होती. प्रत्येकीचा दर आकड्यात व शब्दात दिलेला होता. त्यामुळे त्यात चूक होणे शक्य नव्हते. रजिस्टरच्या मुखपृष्ठाच्या मागील पानाचा लिहिण्यासाठी केलेला उपयोग व एका पाकिटात क्रमवार पद्धतीने लाऊन ठेवलेली त्या गठ्ठ्यातील पत्रांची क्रमवार यादी, अशा व इतर काही विशेषतांमुळे तो ग्रामीण भागातून आलेला गरीब खेडवळ माणूस असल्याचे कळत होते. त्याच्या सहीनंतर प्रत्येक ठिकाणी मिस्टर फ्रांझ क्रॉनफेल्ड्चे पूर्ण नाव व हुद्दे लिहिलेले होते. “निवृत्त जंगल अधिकारी व आर्थिक सल्लागार, निवृत्त लेफ्टनंट, लोखंडी क्रॉसचे मानचिन्ह मिळालेला” म्हणजे नक्कीच तो १८७०- ७१ च्या युद्धात लढलेला होता. आता तो साधारण ऐंशीच्या घरात असणार.

त्याच्या कंजूषपणा व विचित्रपणाबरोबर त्याने अतिशय मानभावीपणा, ज्ञान आणि ठसे व कोरीव कामातील रुचीबद्दल, आस्था दाखवलेली होती. त्याने विकत घेतलेल्या वस्तूंची यादी काळजीपूर्वक बघता, पहिल्यांदा ती खूप कमी वाटली. पण नंतर असा शोध लागला की एका चांदीच्या नाण्यात येणाऱ्या लाकडी कलाकुसरीच्या ढीगभर वस्तू, कोरीव काम केलेल्या वस्तू आणि लढाईत फायदा झालेल्यांकडून मिळवलेल्या कितीतरी वस्तूंचा संग्रह, या गावठी माणसाने केला होत्या. त्या काही दशकांमध्ये त्याने बारीकसारीक दाम देऊन, आजच्या घडीला अतिशय किमती ठरलेल्या वस्तू आमच्याकडून खरेदी केल्या होत्या. आणि दुसऱ्या माझ्यासारख्याच दुकानदाराकडून, त्याने खरेदी केलेली असल्याची शक्यता नाकारता येत नव्हती. त्याचा हा संग्रह खूप पसरलेला होता का? या कलाकुसरीच्या वस्तुंच्या व्यापारात गेली काही वर्षे मी असल्याने, वारा कसा वाहतो त्याचा मला अंदाज होता. माझी खात्री होती की त्याने आमच्याकडे शेवटची खरेदी केल्यापासून, क्वचितच त्याचा संग्रह दुसऱ्याच्या हाती गेला असेल. जर तो मृत्यु पावला असेल, तर त्याचा संग्रह त्याचा वारसांकडे बहुधा सुरक्षित असेल.

हे सर्व मला इतके दिलचस्प वाटले की मी दुसऱ्या दिवशी (काल संध्याकाळी) सॅक्सोनीतील एका आडबाजूच्या गावात जाण्यासाठी निघालो. जेव्हा मी ते लहानसे स्टेशन सोडले व मुख्य रस्त्यावर फिरू लागलो, तेव्हा मला वाटले की इतक्या भिकार घरांमध्ये रहाणाऱ्यांकडे व आतून ती घरे कशी सजवलेली असतील याचा मला अंदाज असल्याने अशा कुणाकडे, असा संग्रह असणे शक्यच नाही. रेम्ब्रांची ठसेकाम करून कोरून काढलेली चित्रे, ड्युरची लाकडावर कोरीव काम केलेली चित्रे व मँटेनियाचे पूर्ण काम, हे सर्व इथे कुणाकडे असेल, यावर माझा विश्वास बसत नव्हता. मी चौकशी करण्यासाठी पोस्टात गेलो आणि हे ऐकून मला आश्चर्य वाटले, की मी सांगितलेल्या नावाचा जंगल अधिकारी व आर्थिक सल्लागार अजून जिवंत होता. त्यांनी मला त्याच्या घराचा पत्ता दिला. दुपारपूर्वी मी तिथे जाण्यासाठी निघालो तेव्हा माझे हृदय जोरात धडधडू लागले.

मागील शतकातील साठीच्या दशकात कशातरी बांधलेल्या एका घराच्या दुसऱ्या मजल्यावर, मला हवा असलेला कलारसिक मनुष्य रहात होता. पहिला मजला एका शिंप्याने व्यापलेला होता. दुसरा जिना चढून गेल्यावर स्थानिक पोस्ट ऑफिसच्या व्यवस्थापकाची पाटी

होती. तर उजव्या हाताला असलेल्या दारावर मला हवे असलेले नाव होते. मी त्याच्याकडे धावत सुटलो. माझी घंटी ऐकून एक पांढऱ्या केसांच्या, काळी लेसवाली टोपी घातलेल्या बाईने दार उघडले. मी तिला माझे कार्ड दिले व मालक घरात आहेत का असे विचारले. तिने संशयाने माझ्याकडे बघितले. कार्डाकडे बघितले व परत माझ्याकडे बघितले. अशा आडबाजूच्या गावात एका मोठ्या शहरात रहाणाऱ्या माणसाने भेट देणे, म्हणजे मोठी हलवणारी घटना होती. तरीही जितक्या मित्रत्वाच्या आवाजात बोलता येईल तितक्या आवाजात तिने मला हॉलमध्ये एक मिनिट थांबायला सांगितले आणि आत अदृष्य झाली. मी काही कुजबुज ऐकली आणि मग पुरुषी, बसका, मोठा आवाज ऐकला. “बर्लिनहून आलेला प्रसिध्द जुन्या मूल्यवान वस्तूंचा पारखी, मिस्टर रेकनर असे म्हणते आहेस का? अर्थात मला त्याला भेटायला आवडेल.” मग मगाचची म्हातारी बाई परत आली व मला आत बोलावले. मी माझा मोठा कोट काढून, तिच्या मागोमाग गेलो. गरीब पद्धतीने सजवलेल्या खोलीच्या मध्यभागी एक मनुष्य माझ्या स्वागतासाठी उभा होता. मोठ्या मित्रत्वाने तो हात पसरून उभा होता. हे उस्फूर्त हावभाव असले, तरी त्याचा दृष्टीकोन त्याविरुध्द, कडक वाटत होता. तो पुढे आला नाही. तेव्हा मला सक्तीने (मी थोडा चिडलो, हे कबूल केले पाहिजे.) त्याच्यापर्यंत जावे लागले. तो हात पुढे करेना. तो मी तसे करण्यासाठी थांबला होता. बऱ्याच वेळाने मला अंदाजाने कळले, की तो आंधळा होता.

लहानपणापासून मी आंधळयांच्या संगतीत अस्वस्थ होतो व खजिल होतो. जिवंत असून सगळया जाणीवा पूर्णपणे वापरू न शकणाऱ्यांबरोबर संवाद साधायला, मला थोडी भीती व लाज वाटते. त्यांचे खिळलेले पण दृष्टीहीन डोळे बघून मला असे वाटत रहाते, की मी त्यांचा अवाजवी गैरफायदा घेतो आहे. पण त्या आंधळया माणसाने मला फार वेळ असे बेचैन ठेवले नाही. तो मोठ्या आनंदाने हसत उद्गारला, “मोठा भाग्याचा दिवस आहे. बर्लिनमधील एका महान माणसाने इथे यावे हे माझे भाग्य आहे. तुझ्यासारखा रत्नपारखी इथे येतो तेव्हा आमच्यासारख्या गावाकडील अडाणी माणसांना काळजीपूर्वक वागावे लागते. आमच्या येथे एक म्हण वापरतातः ‘जिप्सी आले तर तुमची दारे व खिसे बंद करा’ तुम्ही इथे यायचा त्रास का घेतलात, याबद्दल मी तर्क करू शकतो. व्यवसाय वाढत नाही. माझा संग्रह आहे. तुझ्या व्यवसायात विकत घेणारे कोणी राहिले नाही. असलेच तर अगदी थोडे असतील. म्हणून तुम्ही मंडळी आता जुन्या गिऱ्हाईकांकडे

वळला आहात. मला वाटते, तुझी निराशा होणार आहे. आम्ही निवृत्त लोक अजून आम्हाला मिळणाऱ्या पावावर समाधानी आहोत. माझ्या काळात मी कलेक्टर होतो. पण आता मी त्यातून बाद झालो. माझे खरेदी करायचे दिवस संपले.”

तो मला समजून घ्यायला चुकतो आहे. मी काही विकायच्या इराद्याने इथे आलेलो नाही, असे सांगायची मी घाई केली. एके काळी प्रसिध्द जर्मन कलेक्टर असलेल्या व आमचा खूप काळ गिऱ्हाईक असलेल्या माणसाला मान द्यावा म्हणून मी इथे जवळपासच होतो तर भेटावे म्हणून आलो होतो. मी एवढे बोलतो आहे तोच, त्या म्हाताऱ्याचा चेहऱ्यावरचे हावभाव बदलले. तो ठामपणे खोलीच्या मध्यभागी उभा राहिला पण त्याचा चेहरा उजळला. त्याची मुद्रा झरझर बदलून अभिमानी दिसू लागली. त्याची बायको आहे असे त्याला वाटत होते त्या दिशेला वळून त्याने मान हलवून जणू काही म्हटले, “अग, तू ऐकलेस का?” नंतर पुन्हा माझ्याकडे वळत तो बोलण्यातली असंबद्धता सोडत, पहिल्या तोऱ्यात कोमल आवाजात म्हणाला, “हा तुझा चांगुलपणा आहे -- तुझ्या भेटीचा उद्देश फक्त माझ्यासारख्या जुन्या गिऱ्हाईकाला भेटून ओळख वाढवणे, एवढाच असेल तर मी तुझी माफी मागतो.

“तसेही माझ्याकडे तुला बघण्यासारखे काही आहे -- तुला बर्लिनला, अल्बर्टीनाला किंवा व्हिएन्नाला दिसणार नाही असे काही! लूव्हर (पॅरीसला देवाचा शाप असल्याने) संग्रहालयातही बघायला मिळणार नाही, असे काही! पन्नास वर्षे आपल्या कामात चोख असणाऱ्या व रस्त्यावर इकडेतिकडे कुठेही मिळेल असा माल नव्हे तर चोखंदळपणे ज्याने खजिना जमा केला आहे, असा माणूस मी आहे. लिस्बेथ, मला कृपया कपाटाची किल्ली दे.”

आता एक विचित्र गोष्ट घडली. आतापर्यंत आमचे संभाषण शांतपणे ऐकत उभी असलेली ती एकदम चमकली. माझ्याकडे दयेची याचना करत असल्यासारखे हात करत तिने डोके हलवले. ती काय सांगायचा प्रयत्न करते आहे, याचे मला कोडेच पडले. मग ती तिच्या नवऱ्याजवळ गेली व त्याच्या खांद्याला हात लाऊन बोलली, “फ्रांझ डार्लिंग, तू आपल्या पाहुण्याला विचारायला विसरलास, की त्याने अजून कुणाला भेटायची वेळ दिलेली आहे का. आणि तसेही आता जेवायची वेळ झाली आहे –- माझा नाईलाज आहे.” ती माझ्याकडे बघत बोलत

राहिली, “अनपेक्षित आलेल्या पाहुण्याला जेवायला थांबा, असे म्हणण्याइतके आपण श्रीमंत नाही. तुम्ही खानावळीत जेवाल, असे मी समजते. जर त्यानंतर तुम्ही एक कप कॉफी आमच्याबरोबर घेणार असाल, तर आम्हाला आवडेल. आमची मुलगी ॲना हिला कपाटातील वस्तूंबद्दल, माझ्यापेक्षा जास्त चांगली माहिती आहे”

अजून एकदा तिने दयार्द्र नजरेने माझ्याकडे पाहिले. हे सरळ कळत होते की मला लगेच कपाटातील संग्रह दाखवायचे, ती टाळत होती. यावरून मी काय ते समजलो व म्हणालो, “मला खरे तर -- ठिकाणी एकाबरोबर जेवणासाठी भेटायचे आहे. पण त्यानंतर तीन वाजता मिस्टर क्रॉनफेल्ड्चा संग्रह बघायला माझ्याकडे भरपूर वेळ असेल. सहापर्यंत मला परत गेले तरी चालेल.”

आवडत्या खेळण्यापासून वंचित झालेल्या मुलाप्रमाणे, मला मिस्टर क्रॉनफेल्ड रागावलेला वाटला.

तो गुरगुरला, “मला माहिती आहे, की तुम्ही बर्लिनचे मोठे लोक नेहमी वेळाने बांधले गेलेले असता. तरी मला वाटते, माझ्याबरोबर काही तास घालवण्याचे कष्ट तुम्ही घ्याल. मला तुम्हाला फक्त दोनतीन गोष्टी दाखवायच्या नाही आहेत, तर तर सत्तावीस कलाकारांचा अमूल्य ठेवा असलेल्या फाइली दाखवायच्या आहेत. आणि प्रत्येक फाइल भरभरून वाहणारी आहे. जर तुम्ही तीन वाजता आलात, तर आपले सहापर्यंत सर्व काही बघून होईल.”

त्याची बायको मला बाहेरपर्यंत सोडायला आली. हॉलचे दार उघडण्यापूर्वी ती कुजबुजली, “जर तुम्ही परतण्यापूर्वी, ॲना मारिया तुम्हाला हॉटेलवर भेटायला आली तर चालेल का? मी आत्ता सांगू शकत नाही, अशा अनेक कारणांसाठी ते बरे पडेल.”

“अर्थात आनंदाने. खरे तर मी एकटाच जेवणार आहे. तुमचे जेवण झाल्यावर तुमची मुलगी आली तरी चालेल.”

सुमारे तासाभराने माझे जेवण झाल्यावर जेवणघरातून मी बाहेर पडत असतांना, ॲना मारिया क्रॉनफेल्ड आली. साधे कपडे घातलेली, वयाने मोठी व सुरकुत्या पडलेली अशी ती, माझ्याकडे लज्जित होऊन बघत राहिली. मी तिचा संकोच कमी करायचा प्रयत्न केला. जरी उशीर

झाला होता तरी , तिचे वडील वाट बघत असतील, म्हणून तिच्याबरोबर परत जाण्याची तयारी दाखवली. यावर ती फारच शरमिंदी होऊन, गोंधळून तिला काही बोलायचे आहे असे म्हणाली.

मी बोललो, “बसा आणि तुम्हाला काय बोलायचे आहे ते बोला.”

तिला सुरवात करणे कठीण जाऊ लागले. बराच वेळ तिचे हात व ओठ थरथरत राहिले. “माझ्या आईने मला पाठवले आहे. तुमची कृपा आम्हाला हवी आहे. तुम्ही परत आलात, तर माझ्या वडिलांना तुम्हाला त्यांचा वस्तुसंग्रह दाखवायचा आहे. तो संग्रह -- तो संग्रह -- त्यातील अगदी थोडाच आता राहिलेला आहे.”

ती धापा टाकत होती. हुंदके देत होती. धापा टाकत ती बोलली, ‘मला मोकळेपणे बोलले पाहिजे -- तुम्हाला माहिती असेल, सध्या आम्ही फार अडचणीतून जात आहोत. माझी खात्री आहे की तुम्ही समजून घ्याल. युध्द सुरु झाल्यावर लगेचच माझे वडील पूर्णपणे आंधळे झाले. त्यांचे डोळे आधीच हळूहळू अधू होऊ लागले होते. काळजी व उदासी यामुळे कदाचित ते वाढत गेले. अनेक वर्षांपूर्वी एकदा ते युद्धात लढलेले असल्याने, त्यांचे वय सत्तरच्या पुढे असूनही त्याना लढाईवर जायचे होते. मग सैन्य पुढे कूच करू लागले तसे त्यांनी ती गोष्ट फारच मनावर घेतली. तेव्हा डॉक्टरांना पुढे येणाऱ्या आंधळेपणाची चाहूल लागली असावी. तुमच्याही लक्षात आले असेल की बाकी सर्व बाबतीत ते दणकट आहेत. १९१४ पर्यंत ते लांबवर फिरायला जात असत व बंदुकीचा सरावही करत असत. डोळे गेल्यापासून त्याना फक्त त्यांच्या संग्रहात आनंद उरला आहे. ते तो रोज बघतात. त्याना काही दिसत नाही तरी ते ‘बघतात’ असे मी म्हणते आहे. रोज दुपारी ते सर्व काही काढून बसतात व एकेक वस्तू बोटाने चाचपत बसतात. इतके वर्षांची ते सर्व ठेवायची पद्धत तीच असल्याने त्यांना सर्व काही सापडते. दुसऱ्या कशातच त्यांना रुची नाही. लिलावाचे अहवाल ते मला वाचायला लावतात. जितक्या किंमती जास्त, तितके ते अधिकाधिक उत्साही बनतात.

फार वाईट परिस्थिती आहे. वडिलांना महागाईबद्दल काहीही माहिती नाही. त्यांचे महिन्याच्या निवृत्तीवेतनाचे पैसे खायलाही पुरत नाहीत. मग आम्हाला कुणाकुणाची मदत घ्यावी लागते. माझ्या बहिणीचा नवरा वर्डूनला मारला गेला आणि तिला चार मुले आहेत. हे काही

आम्ही त्यांना सांगत नाही. आम्ही जितकी काटकसर करता येईल तितकी करतो. पण तरीही हिशेबाची दोन्ही टोके जुळत नाहीत. मग आम्ही त्यांच्या लाडक्या वस्तू सोडून, पदके, नेकलेस अशा काही शोभेच्या वस्तू विकायला सुरवात केली. पण अशा वस्तू काही फार नव्हत्या कारण वडिलांनी आधीच लाकडाचे कोरीवकाम, पितळयावरील नक्षीकाम व असे बरेच काही विकले होते. कलेक्टरचे खूळ! शेवटी सगळे सांगायचा उद्देश काय, तर आम्ही त्यांचा खजिना विकावा, की त्याना उपाशी ठेवावे एवढाच प्रश्न होता. त्या संग्रहाचा काय उपयोग होता? कितीही महाग असले, तरी जेवायला तर लागतेच. पण त्याना याची सुतराम कल्पना नाही. जर्मनीचा पराभव झाल्याचे त्यांना माहितीदेखील नाही. आम्ही तसल्या प्रकारच्या बातम्या त्यांना वर्तमानपत्रातून वाचून दाखवत नाही.

आम्ही विकलेली पहिली वस्तू खूप महाग होती, रेम्ब्रा या प्रसिध्द युरोपियन चित्रकाराचे ठसेकाम असलेले चित्र. घेणाऱ्याने आम्हाला त्याची चांगली किंमत दिली, काही हजार मार्क्स! आम्हाला वाटले, हे आम्हाला बरीच वर्षे पुरतील. पण १९२२ व १९२३ मध्ये महागाई कशी वाढत होती, ते तुम्हाला माहिती आहे. आमच्या तात्पुरत्या गरजा भागल्यावर, आम्ही ते पैसे बँकेत ठेवले. पण दोन महिन्यात ते संपले. आम्हाला त्यानंतर एकेक वस्तू विकत सुटावे लागले. हे मंदीच्या वाईट काळात घडले. विकत घेणारा जी किंमत कबूल करे, त्याच्या एक दशांश किंवा एक शंभरांशसुद्धा देत नसे. आम्ही लिलावाच्या ठिकाणी जाऊन बघितले. तिथेही आमची फसवणूक झाली. जरी किंमत वाढून लाखांची बोली झाली, तरी तरी त्या नोटा आमच्या ताब्यात येईपर्यंत कवडीमोल झालेल्या असत. अशा तऱ्हेने तो संग्रह हळूहळू रोजच्या गरजेसाठी वापरला जाऊ लागला.

त्यामुळे आज अचानक तुम्ही आल्यावर आई गांगरून गेली. जर खजिना उघडला गेला, तर आमची चोरी वडिलांच्या लक्षात येईल. त्याना प्रत्येक गोष्ट हाताने स्पर्श करून माहिती आहे. आम्ही जे जे कागदपत्र विकले ते ते त्याच आकाराचे व जाडीचे पण कोरे, परत तिथे ठेवले. त्यामुळे ते जेव्हा ते बघतात तेव्हा त्यांना ते तिथे असल्यासारखेच वाटतात. ते परत परत चाचपून व मोजून त्यांना एक प्रकारचा आनंद मिळतो. ते इथल्या कोणालाच तो कधी दाखवत नाहीत. तेवढे जाणकार व रसिक येथे कुणी नाही. पण ते हाताळण्यात त्यांना इतका कमालीचा आनंद मिळतो,

की आम्ही काय केले ते त्याना कळले, तर ते मोडूनच पडतील. एक पितळयावरील नक्षीचा जाणकार माणूस आला होता व त्याला त्यांनी त्यांच्या वस्तू दाखवल्या ते शेवटचेच. तो मनुष्य वारला, त्यालाही अनेक वर्षे झाली.

"मी तुम्हाला विनवणी करते." तिचा आवाज कातर झाला. "कृपया त्यांचा आभास तोडू नका. त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नका. तो खजिना ते वर्णन करतील तसा तिथे आहे, असे समजा. त्या खजिन्याची हानी, ते सहन करू शकणार नाहीत. कदाचित आम्ही त्यांना फसवले आहे. पण आम्ही काय करू शकत होतो? प्रत्येकाने जगले पाहिजे. निराधार मुलांनी जगणे, हे जुन्या वस्तू जपत रहाण्यापेक्षा जास्त महत्वाचे आहे. त्यांच्या काल्पनिक संग्रहाच्या हाताळणीत रोज दुपारी त्यांचे तीन तास जातात आणि तेच त्यांचे आयुष्य व आनंद आहे. प्रत्येक नमुन्याशी एखाद्या मित्राप्रमाणे ते बोलत रहातात. आज एका प्रसिध्द जाणकाराला त्यांचा खजिना दाखवण्याची संधी त्याना मिळणार आहे. जर तुम्ही माझी अट कबूल केलीत तर -- "

हे सर्व ऐकून मी गार पडलो. मी तुम्हाला सांगू शकत नाही, की ही अट किती दुःखदायक होती. मी माझ्या व्यावसायिक आयुष्यात कितीतरी लबाडीचे, नितीमत्ता सोडून केलेले, अप्रामाणिक चढउतार पाहिले होते पण त्या बाईने सांगितलेल्या प्रकाराने मी गोठून गेलो. ती गोष्ट माझ्या जिव्हारी लागली. हे सांगण्याचे काही कारण नाही की मी ती सांगत असलेल्या पद्धतीने, त्या म्हाताऱ्याची फसवणूक करायला सिध्द झालो.

आम्ही तिच्या घरी एकत्र गेलो. वाटेत मला समजले की किती कमी किमतीला विचित्र पद्धतीने या अज्ञानी पण दयाळू बाईने, खजिन्यातील मौल्यवान व दुर्मिळ गोष्टी विकल्या. यामुळे मला शक्य असलेली सर्व मदत, मी त्याना करायचे ठरवले. आम्ही जिना चढत असताना एक आमोदपूर्ण आवाज ऐकला. "या. या." आंधळयाच्या तिखट कानांनी, तो ज्याची आतुरतेने वाट बघत होता, तो आमचा पदरव ऐकला.

"फ्रान्झ सहसा जेवणानंतर एक डुलकी काढतो, पण आज तो भलताच खुषीत असल्याने उत्तेजित होऊन झोपला नाही." आम्हाला आत घेत म्हातारी बाई हसून म्हणाली. तिने तिच्या

मुलीकडे एक कटाक्ष टाकून, सर्व ठीकठाक असल्याची खात्री केली. टेबलावर खजिना होता. आंधळयाने मला हाताला धरून माझ्यासाठी तयार ठेवलेल्या एका खुर्चीत बसवले.

“आपण लगेच सुरवात करू. बघण्यासारखे खूप आहे आणि वेळ कमी आहे. सगळा गठ्ठाच आहे आणि सर्वात चांगला! प्रचंड नमुने आहेत. तुम्ही स्वतः बघून काय ते ठरवा.”

त्याने म्हटल्याप्रमाणे, एकेक वस्तू दाखवायला सुरवात केली.

“आपण अर्थात ॲपोकालॅप्से मालिकेपासून सुरवात करुया.”

त्याने नाजूकपणे व सफाईने (आपण चटकन फुटणाऱ्या व मूल्यवान वस्तू ज्या काळजीने हाताळतो तशा प्रकारे) फोटो फिल्म असलेला पहिला कोरा कागद उचलला आणि माझ्या डोळस डोळयांपुढे व त्याच्या आंधळया डोळयांपुढे धरला. त्याचा कौतुकभरला चेहरा बघून असे वाटत नव्हते, की याला दिसत नाही आहे, ही नुसती कल्पना आहे. हे माहिती असूनही, त्याच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरील तेज बघून, मला त्यावर विश्वास ठेवणे कठीण जात होते.

“तुम्ही यापेक्षा चांगले फोटो कुठे पाहिले आहेत? प्रत्येक बारीकसारीक गोष्ट किती ठळक आणि स्पष्ट आहे बघा.” मी ड्रेस्डेन मधील एका फोटोशी त्याची तुलना करून बघितली. “संशयातीतपणे चांगला आहे. पण थोडा पुसट वाटतो.” मी म्हणालो. मग मी सगळे फोटो बघितले.

खात्रीलायक रीत्या व सहजपणे त्याने पान उलटले. मी त्यावरील नसलेला मजकूर वाचण्यासाठी पुढे वाकलो.

“हा निग्लरच्या संग्रहातील आहे आणि त्यानंतरचा रेमी आणि एस्डेलच्या संग्रहातील आहे. माझ्यापूर्वीच्या प्रसिध्द रसिकांना कल्पनाही नसेल, की हा खजिना इथे माझ्याकडे आहे.”

मी शहारलो. पण त्या अजिबात संशय न आलेल्या उत्साही स्तुतीपाठकाने, तो कागद नीट गुंडाळून ठेवला. त्याने त्याचे बोटाचे नख जेव्हा बरोबर त्या नसलेल्या खुणांवर एका विशिष्ट जागी ठेवले, तेव्हा मी अस्वस्थ झालो फोटोतील माणसांची त्याने घेतलेली नावे ऐकून मला वाटले, ती माणसे त्यांच्या थडग्यातून उठून आली आहेत व इथे त्यांचे आत्मे वावरत आहेत. काळजी

करणाऱ्या क्रॉनफेल्डची बायको व मुलीचे चेहरे बघितल्यावर, माझी जीभ टाळयाला चिकटली. मग मी भानावर येऊन, माझे ठरलेले नाटक चालू ठेवले. अगदी मनापासून मी बोललो, “तुमचे अगदी बरोबर आहे, हा नमुना अद्वितीय आहे.”

खुषीने त्याच्या अंगावर मूठभर मास चढले.

त्याने पुढे चालू ठेवले, “हे काहीच नाही. खोलवर उदास भाव असलेला एक व वासनेची लखलखीत प्रत असलेला हा दुसरा बघा. दुसरा प्रश्नातीतपणे वरचढ आहे. रंगांच्या मिसळणीचा जिवंतपणा बघा. हे बघून तुमचे बर्लिनमधील सहकारी व सार्वजनिक चित्रप्रदर्शनांचे प्रवर्तक, हेवा वाटून लालपिवळे होतील.

मी तुम्हाला त्याच्या खोलवर माहितीत नेऊन कंटाळा आणत नाही, असे हे स्तुतिगान, दोन तासांपेक्षा जास्त वेळ चालू राहिले. तो एकामागून एक फायली उघडत राहिला. ते दोनतीनशे कोरे कागद हाताळत रहाणे, हा विचित्र व घाबरवणारा उद्योग होता. योग्य वेळी त्या त्या वस्तूचे गुणगान करणे, हे त्या आंधळया कलेक्टरसाठी इतके खरेखुरे होते, की तो पुन्हा पुन्हा ते करत होता. ( मी क्षणाक्षणाने खचत होतो. ) त्याच्या माझ्यावरच्या विश्वासाने, माझा विश्वास बेचिराख होत होता.

एकदाच संकट आले होते. तो मला अमूल्य किमतीचे रेम्ब्रांने काढलेले चित्र “दाखवत” होता. ते संशयातीतपणे विकले गेले होते. परत तो त्या चित्राच्या, ठळकपणे जिवंत भासणाऱ्या दर्जाबद्दल बोलला. पण त्यावर हात फिरवतांना त्याला काही ओळखीच्या खुणा तिथे नसल्यासारखे वाटले. त्याचा चेहरा उतरला. तोंड थरथरू लागले. तो बोलला, “नक्की, नक्की हा काळवीटच आहे ना? या चित्राला मी सोडून कुणीच हात लावत नाही. मग मला नेहमीच्या खुणा का सापडत नाहीत?”

मी त्याच्या हातातून ते चित्र काढून घ्यायची घाई करत म्हणालो, “हो. हो. तो काळवीटच आहे, मिस्टर क्रॉनफेल्ड. मी त्या कोऱ्या कागदावरील चित्राचे मला आठवत होते त्याप्रमाणे हुबेहूब वर्णन करून जादू केली.

त्याचा घाबरटपणा कमी झाला. मी त्या चित्राची जितकी स्तुती करत गेलो तितका त्याचा चेहरा उजळत गेला. शेवटी तो खूप आनंदाने त्या दोन महिलांना म्हणाला, “या माणसाला खरी पारख आहे. तुम्ही नेहमी माझ्या या अफलातून संग्रहावर मी केलेल्या खर्चिकपणाबद्दल, मला दूषणे देत असता. मी गेली पन्नास वर्षे मला बिअर, वाईन, तंबाखू, प्रवास, सिनेमे बघणे व पुस्तके यापासून स्वतःला दूर ठेवले आहे. तुम्ही ज्याचा दुस्वास करता, तो माझा संग्रह मला विकत घेता यावा, म्हणून मी हा त्याग केलेला आहे. हे किमतीचे कोष्टक माझे म्हणणे खरे असल्याचे तुम्हाला सांगेल. जेव्हा माझा अंत होईल, तेव्हा तुम्ही गावातील कुणाहीपेक्षा श्रीमंत असाल. ड्रेस्डेनमधील कुणाही श्रीमंताइतकेच श्रीमंत असाल. माझ्या विक्षिप्तपणाला तेव्हा तुम्ही दुवा द्याल. पण मी जिवंत आहे तोपर्यंत, हा संग्रह आहे तसा ठेवायला हवा. मला पुरल्यावर हा पारखी मनुष्य किंवा इतर कुणी तुम्हाला तो विकायला मदत करतील. ते तुम्हाला करावेच लागेल कारण मी मेल्यावर माझे पेन्शन बंद होईल.”

तो बोलत असताना त्याची बोटे, त्याचा अमूल्य खजिना कुरवाळत होती. ते फार भयंकर व मनाला लागणारे दृष्य होते. कुणाही जर्मनाच्या चेहऱ्यावर १९१४ पासून गेल्या कित्येक वर्षात, मी इतका आनंद पाहिला नव्हता. त्याची बायको व मुलगी त्याच्याकडे, अश्रूभरल्या डोळयांनी बघत होत्या.

पण त्या माणसाला मी केलेली स्तुती पुरेशी वाटली नसावी. माझे बोलणे ऐकत, तो दमेपर्यंत कागदामागून कागद, फाइलीमागून फाइली दाखवतच राहिला. जेव्हा त्याने सर्व पसारा आवरून ठेवला व टेबल कॉफी आणण्यासाठी रिकामे केले, तेव्हा मी सुटकेचा निःश्वास सोडला.

माझा यजमान जास्तच उत्साही दिसत होता. त्याने त्याचा विविध प्रकारचा खजिना कसा गोळा केला, त्याच्या गोष्टी त्या त्या वस्तू परत दाखवून तो मला सांगत राहिला. मी, त्याची बायको व मुलगी पण त्याला आग्रहाने सांगत राहिलो की मी आता अजून जर थांबलो, तर माझी गाडी चुकेल, तेव्हा तो फार रागावला --

शेवटी त्याने मला जाण्याची परवानगी दिली व मी निघालो. त्याने माझे दोन्ही हात हातात घेतले. आंधळयाला स्पर्शाचे महत्व असल्याप्रमाणे, गहिवरून ते कुरवाळले व थरथरत्या

आवाजात बोलला, “तुमच्या भेटीमुळे मला खूप आनंद झाला. शेवटी एकदाचा मला माझा खजिना, त्याचे महत्व असणाऱ्या एखाद्या जाणकाराला दाखवण्यातील मजा घ्यायला मिळाली. तुम्ही एका आंधळया म्हाताऱ्या माणसाला भेट देऊन, मला उपकृत केले आहे. त्याबद्दल मी तुम्हाला काही देऊ इच्छितो. तुमच्यावर विश्वास ठेऊन, माझ्या इच्छापत्रात मी असे लिहितो, की तुमच्या जुन्या किमती वस्तूंच्या, नावाजलेल्या, तुम्ही प्रामाणिकपणे चालवत असलेल्या दुकानाला मी माझ्या खजिन्याचा लिलाव करण्याची संधी देतो.”

त्याने प्रेमाने त्याचा हात त्याच्या खजिन्यावर ठेवला. “मला वचन द्या की तुम्ही त्याची सुंदर सूची तयार कराल. माझे याहून जास्त चांगले स्मारक होऊ शकणार नाही.”

मी त्या दोन महिलांकडे नजर टाकली. म्हाताऱ्याच्या तिखट कानांवर पडू नयेत, म्हणून त्या दोघींनी त्यांचे हुंदके दाबून ठेवले होते. मी त्या अशक्य गोष्टीचे वचन दिले व त्याने उत्तरादाखल माझा हात प्रेमभराने दाबला.

त्याची बायको व मुलगी मला दारापर्यंत सोडायला आल्या. त्यांच्या गालावरून अश्रू ओघळत होते. त्या काही बोलू शकल्या नाहीत. त्यांच्यापेक्षा माझी अवस्था थोडी बरी होती. मी कलात्मक वस्तूंचा दुकानदार म्हणून काही व्यवहार करायला आलो होतो. त्याऐवजी त्या घटनेप्रमाणे, मी चांगल्या नशिबाचा देवदूत ठरलो. एका म्हाताऱ्याला आनंदी ठेवायचे जे काम त्याची बायको व मुलगी करत होत्या, त्या खोट्या कामात त्याना मदत करायच्या बाबतीत, लाज वाटत असूनही, एखाद्या तुकडीतील सैनिकाप्रमाणे अडकलो. पण मी खोटे बोललो ते बरे झाले. या दुःखाच्या व मंदीच्या काळात, मी कुणामध्ये तरी आनंदाचा बहर फुलवू शकलो, हे समाधान मला लाभले. मी रस्त्यावर आलो, तेव्हा एक खिडकी उघडल्याचा आवाज आला व मला हाक मारली गेली. जरी म्हातारा मला बघू शकत नव्हता, तरी मी कुठल्या दिशेने जाणार, हे त्याला माहिती होते. त्याचे न दिसणारे डोळे त्या बाजूला वळले होते. त्याची काळजी घेणारे लोक त्याला वाकू देत नव्हते, तरी जास्तीत जास्त वाकायचा प्रयत्न करून एक रुमाल हलवत त्याने म्हटले, “तुमचा प्रवास सुखकर होवो.”

एखाद्या मुलाप्रमाणे त्याचा आवाज आला. मी तो आनंदी चेहरा कधीच विसरू शकणार नाही. रस्त्यावरील लोकांच्या काळजीयुक्त चेहऱ्यापुढे तो एकदम वेगळेपणे गंभीर भासत होता. मी जो आभास निर्माण केला, त्यामुळे त्याला त्याचे जीवन आनंदी ठेवायला मदत झाली होती.

How Much Land Does A Man Require?

By Leo Tolstoy

# एका माणसाला किती जमीन लागते?



शहरातून मोठी बहीण लहान बहिणीला भेटायला आली. तिने एका व्यापाऱ्याशी लग्न केले होते व धाकटीने एका शेतकऱ्याशी. दोघी चहा घेऊन बोलत बसल्या. मोठी बहीण तिच्या शहरी जीवनाबद्दल बढाया मारू लागली -- ती कशी आरामात व सुखात रहाते, तिच्या मुलांना छान कपडे घालते, खायला प्यायला त्यांच्याकडे कशा चांगल्या गोष्टी असतात, ते बर्फावर घसरायला जातात, फिरायला जातात व सिनेमागृहात जातात.

धाकटी बहीण तिचे वक्तव्य ऐकून चिडली व सणसणीत उत्तर दिले, " तू मला शहरी आयुष्याची कितीही भुरळ घालायचा प्रयत्न केलास, तरी मी माझ्या गावाकडील आयुष्याचीच भलावण करीन."

ती पुढे म्हणाली, "माझ्याबाबतीत म्हणशील तर, मला तुझ्याबरोबर आयुष्य बदलायला काही अडचण नाही. त्या बदल्यात तू माझे शांत आयुष्य जग. आमच्या येथे खळबळजनक काही घडत नाही. तरीपण तू तुझ्या छान आयुष्यात, प्रचंड मोठा व्यापार केला पाहिजेस, नाहीतर मग गाळात गेले पाहिजेस. तुला ही म्हण माहिती असेलः नुकसान हा लाभाचा मोठा भाऊ आहे. तू कदाचित आज श्रीमंत असशील पण उद्या कदाचित रस्त्यावर येशील. आम्ही त्यापेक्षा इथे गावात बरे आहोत. शेतकऱ्याचे पोट चपटे असेल पण ते लांब आहे. म्हणजेच तो श्रीमंत नसेल तरीही त्याच्याकडे नेहमी पोटभर खायला असेल."

मोठ्या बहिणीने लगेच चिडून उत्तर दिले, "खरे का? बास बास -- तुझी भिकार डुकरे आणि वासरे! छान कपडे नाहीत. छान सोबत नाही. तुझ्या नवऱ्यानी कितीही कष्ट केले, तरी तुम्हाला चिखलातच रहावे लागते आणि तुम्ही त्यातच मरणार. हो. आणि तुमच्यानंतर तुमची मुलेही."

धाकटी म्हणाली, "मुळीच नाही. आमचे असे असले, आम्ही कष्टप्रद आयुष्य जगत असलो, तरी निदान जमीन आमची आहे. आम्हाला कुणापुढे वाकायची व हांजी हांजी करायची पाळी येत नाही. तुम्ही शहरात नसत्या भानगडी करत रहाता. आज तुमचे सगळे छान असेल. पण पण उद्या तुमचे नशीब फिरू शकते. तुझा नवरा जुगाराच्या किंवा दारुच्या नादी लागू शकतो आणि तुमचे पूर्ण कुटुंब धुळीला मिळू शकते. नाही का?"

शेगडीजवळ पाखोम, धाकट्या बहिणीचा नवरा ऐकत होता.

तो म्हणाला, "खरे आहे. मी लहानपणापासून भूमातेशी संधान बांधून आहे. माझ्या डोक्यात कधी मूर्ख विचार येत नाहीत. पण मला एक दुःख आहे. माझ्याकडे फार कमी जमीन आहे. मला जमीन द्या. मग मी कोणाला घाबरत नाही, सैतानालाही नाही."

दोघी बहिणींचा चहा व गप्पा संपल्या व त्या सर्व आवरून झोपायला गेल्या. यावेळी सैतान शेगडीमागे बसलेला होता. त्याने सर्व काही ऐकले होते. जेव्हा शेतकऱ्याच्या बायकोने तिच्या नवऱ्याला, पाखोमला, बढाई मारायला प्रवृत्त केले तेव्हा त्या सैतानाला आनंद झाला. अशी बढाई की एकदा मनाएवढी जमीन मिळाली की मग सैतानसुद्धा त्याच्याकडून ती काढून घेऊ शकणार नाही.

सैतानाने विचार केला, "छान! मी तुझी फजितीच करून दाखवतो. मी तुला खूप जमीन देतो आणि ती परत काढून घेतो."

त्या शेतकऱ्याजवळ एक साडेतीनशे एकर जमिनीची मालकीण रहात होती.

पहिल्यांदा तिचे शेतकऱ्यांबरोबर चांगले संबंध होते आणि तिचे हक्क कधी डावलले गेले नाहीत. पण आता तिने एक निवृत्त सैनिकाला त्यावर अधिकारी म्हणून नेमले. त्याने शेतकऱ्यांकडून दंड वसूल करायला सुरवात केली. पाखोमने कितीही काळजी घेतली तरी, त्याचा एक घोडा तिच्या ओटच्या शेतात शिरे, गाय तिच्या बागेत शिरे किंवा वासरे तिच्या कुरणात शिरत. या सर्वासाठी त्याच्याकडून दंड वसूल केला जाई.

पाखोम तो दंड भरे व मग त्याच्या घरातल्यांना शिवीगाळ करे. त्या अधिकाऱ्याबरोबर त्याची खडाजंगी चाले. उन्हाळयात त्याने त्याच्या गुरांना त्या बाईच्या कुरणात चरू देण्याची परवानगी मागितली व त्याबद्दल उतराई होऊन पैसे भरले.

त्याचे पैसे गेल्याबद्दल त्याला खंत वाटली. पण गुरांना चारा मिळून काळजी तर मिटली.

त्या हिवाळयात अशी अफवा पसरली की बॅरीना, जमीन मालकीण, तिची जमीन विकणार आहे आणि तो अधिकारी तिची जमीन विकत घेणार आहे.

आत्ता बॅरीनाच्या ताब्यात जमीन असताना, तो अधिकारी आपल्याला एवढा त्रास देतो आहे, मग जमीन त्याच्या मालकीची झाल्यावर तर किती त्रास देईल; असा विचार सर्वांनी केला आणि असे ठरवले की आपण सर्व त्या जमिनीच्या आसपास रहातो, तर आपणच ती जमीन ताब्यात घेतली पाहिजे. म्हणून गावसभेचा पुढारी बॅरीनाला भेटायला गेला. त्याने तिला अशी विनंती केली की तिने तिची जमीन त्या अधिकाऱ्याला विकू नये. पण तसे करण्यासाठी तो जी किंमत देणार होता, त्याहून अधिक किंमत देण्याची तयारी त्यांनी दाखवावी, असा सल्ला तिने त्यांना दिला. मग गावसभेने तिची सगळी जमीन विकत घेण्याची तयारी चालवली. दोनतीन सभा घेतल्या पण त्यातून काही निष्पन्न होईना. त्यातली मेख अशी होती की त्यांचे एकमत होईना.

मग शेतकऱ्यांनी असे ठरवले की प्रत्येकाने आपापल्या कुवतीप्रमाणे जमिनीचे तुकडे खरेदी करावे. हा बेतही बॅरीनाला पसंत पडला. एक दिवस पाखोमने ऐकले की एका शेजाऱ्याने साठ एकर जमीन खरेदी केली व बॅरीनाने त्याला अर्ध्या रकमेसाठी एक वर्षाची मुदत दिली. पाखोमला त्याचा हेवा वाटू लागला. त्याने विचार केला असेच जर सगळे तिची जमीन घेत सुटले तर मला घ्यायला काही शिल्लकच रहाणार नाही. मग त्याने बायकोचा सल्ला घेतला. तो म्हणाला, ‘प्रत्येकजण काही जमीन विकत घेतो आहे. तर आपण देखील तीस एकर जमीन खरेदी करू. पण आत्ता चालू आहे तसेच असेल, तर आपल्याकडे काही पैसे उरतच नाहीत कारण तो अधिकारी आपल्याकडून दंड वसूल करतो.” त्यामुळे आता जमीन कशी खरेदी करावी याचा विचार ते पतीपत्नी करू लागले.

एकूण रक्कम त्यांच्या दृष्टीने फार होती. मग त्यांनी त्यांचा छोटा घोडा वगैरे काही प्राणी व अर्ध्या मधमाशा विकायचे ठरवले. शिवाय असेही ठरवले की त्यांच्या मुलाला कुठेतरी नोकरीला लावावे. असे करून ते कशीबशी अर्धी रक्कम उभी करू शकले. मग त्याने पंचेचाळीस एकर जमीन व एक छोटा सागाची झाडे लावलेला जमिनीचा तुकडा निवडला. सौदा करण्यासाठी बाखोम बॅरीनाकडे गेला. हातमिळवणी झाली. पाखोमने अनामत रक्कम दिली. मग त्याने शहरात जाऊन खरेदीखत पूर्ण केले. ( अर्धे पैसे आत्ता द्यायचे व उरलेले दोन वर्षात. ) आणि ओहो, पाखोम जमिनीचा मालक झाला. त्याने त्याच्या साडूकडून काही पैसे उसने घेऊन बीबियाणे खरेदी केली. ती नवीन शेतात पेरली. सुंदर पीक आले. त्यामुळे एक वर्षात तो बॅरीना व त्याचा साडू या दोघांचे पैसे परत करू शकला. तो आता खरा उद्योजक झाला. ती त्याची स्वतःची जमीन होती व तो स्वतः पेरणी करे, स्वतः पीक काढे, स्वतःच्या झाडांचे लाकूड काढून जळणासाठी वापरे व त्याची स्वतःची गुरे तिथे चरत. जेव्हा तो स्वतःच्या मालकीच्या जमिनीवरून पेरण्यासाठी, पिकावर व कुरणावर लक्ष ठेवण्यासाठी, फेरफटका मारे, तेव्हा त्याला अतिशय आनंद होई. त्याच्या कुरणातले गवत व उमललेली फुले त्याला इतरांपेक्षा वेगळी वाटत. तो फेरफटका मारत असताना त्याला असे वाटले, की आधी ही जमीन होती व आताही ही जमीन आहे, पण आता ही वेगळी जमीन आहे.

अशा तऱ्हेने पाखोम खूप काळ जगला व आनंदी झाला. खरच जर इतर शेतकऱ्यांनी त्याचे पीक व कुरण आहे तसे ठेवले असते, तर त्याचे छान चालले असते. तो परतपरत बळजबरीने त्याच्या कुरणात घुसणाऱ्या गुरांना व रात्री शेतात घुसून पीक खाणाऱ्या घोड्यांना, हाकलत राहिला. काही वेळा त्याकडे दुर्लक्ष केले.  पण शेवटी त्याचा तोल सुटला. शेवटी त्याने जिल्हा कोर्टात तक्रार गुदरली. इतर शेतकऱ्यांकडे पुरेशी जमीन नसल्यामुळे, असे झाले. त्यांनी द्वेषामुळे असे केले नाही. तरीही असे करायला परवानगी नव्हती कारण ते जागा व्यापत होते. त्याना धडा शिकवणे जरुरीचे होते. त्यामुळे त्याने त्यांच्यातील पहिल्याला कोर्टात धडा शिकवला. दुसऱ्याकडून दंड वसूल केला. त्यामुळे इतर शेतकरी त्याचा रागराग करू लागले. त्याच्या शेजाऱ्यांनी त्याचे पीक चोरायचे ठरवले. एकजण रात्री त्याच्या शेतात घुसला आणि त्याने निदान दहा तरी लिंबांच्या झाडांचे बुंधे चोरले. तिकडून चक्कर मारताना पाखोमने ते पाहिले. त्याला धक्का बसला. तो जवळ गेला. त्याला दिसले की झाडाच्या साली कापून आसपास फेकून दिलेल्या आहेत व बुंधे तोडले आहेत. त्या पापी माणसाकडून फक्त एका झाडाचा बुंधा शिल्लक राहिला होता. पण सर्व फांद्या कापल्या गेल्या होत्या. पाखोम रागावला. त्याने विचार केला, “मला जर कळले की हे कुणी केले, तर मग त्याची काही धडगत नाही. तो कोण असेल असा विचार तो मनाशी करत बसला. जर कुणी असेल तर तो सेम्काच असणार. म्हणून तो त्याच्याकडे गेला पण तो काही कबूल करेना. पाखोम शिव्या खाऊन परत आला. पण तरी त्याची खात्री झाली की हे कृत्य सेम्काचेच आहे. पाखोमने त्याच्याविरुद्ध तक्रार केली. दोघांनाही कोर्टात बोलावण्यात आले. पुराव्याआभावी सेम्काला सोडून देण्यात आले. यामुळे पाखोम आणखीनच चिडला. त्याने गावाचा पुढारी व न्यायाधीश दोघांनाही शिव्या दिल्या. “तुम्ही न्यायाधीश मंडळी त्या चोरांना मिळालेले

आहात. जर तुम्ही प्रामाणिक असतात तर सेम्काला सोडले नसते” पखोम न्यायाधीशावर व शेजाऱ्यांवर फार चिडला होता. तो सगळ्यांशी फटकून राहू लागला व गावसभेलाही हळूहळू जाईनासा झाला.

त्याच वेळेस अशी अफवा उठली की काही शेतकरी गाव सोडून चालले आहेत. पाखोम विचार करू लागला. “मला माझी जमीन सोडायचे काय कारण आहे? जर काहीजण गाव सोडून गेले तर उलट मला अजून जागा मिळेल. मी त्यांची जमीन विकत घेईन व माझ्या मालकीच्या जागेभोवती कुंपण घालेन. मग मी अजून आरामात राहीन. आत्ता मी जरा अडचणीतच रहातो आहे.” नंतर लगेचच एक दिवस, पाखोम घरी बसला असताना, एक प्रवासी शेतकरी तिथे आला. पाखोमने त्याला जेवण व रात्रीसाठी आसरा दिला. मग बोलताबोलता त्याला विचारले की तो इथे कशासाठी आला आहे. त्यावर त्या शेतकऱ्याने उत्तर दिले की तो नदीच्या खालील भागाकडून, व्होल्गा नदीच्या पलीकडून, आला आहे आणि तिथे तो नोकरी करत होता. मग तिथे कशी वस्ती होते आहे हे तो सांगू लागला. त्या परिसरात रहाणाऱ्यांना कशी २८ एकर जमीन गावाच्या सभेकडून मिळते आहे. त्या जमिनीत राय नावाचे धान्य काढता येते. ते इतके उंच असते की एखादा घोडाही त्यात लपू शकेल आणि इतके दाट असते की पाच मुठींची एक पेंढी होऊ शकते. तिथे फक्त स्वतःचे काम करण्यायोग्य हात घेऊन आलेला व त्याच्याजवळ काही नसलेला एक शेतकरी आता त्याच्या १४० एकर जमीनीत गव्हाचे पिक काढतो. फक्त गव्हामधून गेल्या वर्षी त्याने ५००० रुबल्स मिळवले.

हे ऐकून पाखोम चमकून उठला. तो विचार करू लागला, असे छान आयुष्य मला कधी जगायला मिळेल? मी येथील घर व शेती विकून टाकतो व त्या पैशाने तिथे घर व शेती घेतो. इथे चोरांच्या राज्यात फार त्रास आहे. काही झाले तरी एकदा तिथे जाऊन बघितले पाहिजे.”

मग जेव्हा उन्हाळा आला, तेव्हा तो तयार होऊन बाहेर पडला. त्याने सामारापर्यंत व्होल्गातून आगबोटीने प्रवास केला व नंतर अनेक मैल पायी चालत तो एका ठिकाणी आला. ती जागा त्या पाहुण्याने वर्णन केल्यासारखी होती. तिथे प्रत्येक शेतकऱ्याला तीस एकर जमीन फुकट मिळत होती व ते मजेत रहात होते. गावाने त्याचे स्वागत केले. शिवाय त्याला असे कळले की तिथे पैसे घेऊन येणारा कायमसाठी कितीही जमीन विकत घेऊ शकतो. एका एकराला एक रुबल या भावाने कितीही जमीन घेता येत होती. हे सर्व माहिती करून घेऊन पाखोन उन्हाळ्यानंतर घरी परतला. त्याने सरळ शेत व घर विकायला काढले. दोन्ही विकून, भरपूर पैसे कमावून त्याने त्या गावातून आपले नाव कमी केले. नंतर वसंत ऋतु आल्यावर कुटुंबासह त्या पहाणी करून आलेल्या गावी प्रयाण केले.

तिथे पोचल्यावर पाखोमने तेथील गावात नाव घातले. (अर्थात तेथील अधिकारी लोकांना पैसे चारून आणि आवश्यक ती कागदपत्रे देऊन.) मग त्याला दीडशे एकर जमीन बहाल करण्यात आली, त्यातील तीस एकर कुटुंबातील प्रत्येकासाठी होती व काही गुराढोरांसाठी कुरण

असलेली होती. जुन्या जागी त्याच्याकडे जेवढी जमीन होती त्याच्या दुप्पट जमिनीचा तो आता मालक झाला. तिथे त्याने घर बांधले. ती मका पिकवायची जमीन होती. तो जिथून आला त्यापेक्षा येथील आयुष्य दहापट चांगले होते. त्याच्याकडे पीक काढायची व कुरणाची अशा दोन्ही प्रकारच्या जमीनी होत्या. तो वाट्टेल तितकी गुरे पाळू शकत होता. पहिल्यांदा घर बांधताना व सामान जमवताना त्याला सर्व छान वाटले. पण नंतर जेव्हा तो तिथे स्थिरस्थावर झाला तेव्हा त्याला परत बेचैन वाटू लागले. इतर अनेकांप्रमाणे त्याला त्याच्या शेतात पांढरा तुर्की गहू पिकवायचा होता. पण त्याच्या एवढ्या जमिनीपैकी फार थोडी जमीन गहू पिकेल अशी होती. गवताळ, नवीन किंवा एकदम सुपीक जमिनीतच गव्हाचे पीक घेणे शक्य होते. एक वर्ष पीक घेऊन पुढची दोन वर्षे ती जमीन नुसती आहे तशी ठेवणे भाग होते. तरच परत गवत तेथे उगवले असते. त्याच्याकडे शेतजमीन भरपूर होती पण त्यात फक्त रायचेच पीक घेता येऊ शकत होते. अशी मऊ जमीन गव्हासाठी योग्य नव्हती. गव्हाला कडक जमीन व इतर अनेक गोष्टींची जरुरी होती. तशी जमीन तिथे मिळणे शक्य नव्हते. शिवाय अशा जमिनीवरून भांडणे होत. श्रीमंत शेतकरी स्वतःच्या शेतात गहू पेरत. पण गरिबांना व्यापाऱ्यांकडून कर्ज घ्यावे लागे. पहिल्या वर्षी पाखोमने कर्ज घेऊन तशी जमीन घेतली व गहू पेरला व अमाप पीक आले. पण पुढची दोन वर्षे ती जमीन तशीच ठेवणे त्याला शक्य नव्हते. मग त्याने व्यापाऱ्यांकडून भाड्याने एक वर्षासाठी गहू पेरण्यासाठी जमीन घेतली. त्यात पेरणी करून भरपूर गव्हाचे पीक काढले. दुर्दैवाने ती जमीन त्याच्या घरापासून बरीच लांब होती. पीक आणण्यासाठी दहा मैल अंतराची गाडी करावी लागे. याउलट श्रीमंत शेतकरी तेथेच असलेल्या घरात रहात. मग त्याने विचार केला, “अजून जमीन तेथे भाड्याने घेऊन त्यांच्यासारखे तेथेच घर का बांधू नये? मग मी तिथे योग्य ठिकाणी असेन.” त्यामुळे त्याने त्या दिशेने विचार सुरु केला.

अशा तऱ्हेने पाखोमाने पाच वर्षे काढली. सतत तो जमीन घेऊन गहू लावत राहिला. सर्व वर्षी चांगले पीक आले. पैसा येत राहिला. तरीही सतत तसेच जगत रहाणे कंटाळवाणे होते. दर वर्षी शेत वेगळ्या ठिकाणी भाड्याने घ्यायला व सर्व सामग्री तिथे न्यायला पाखोम कंटाळून गेला. जिथे चांगली जमीन असेल तिथे ती घेण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी असे. ती भाड्याने घेऊन त्यात गहू पेरण्याचा विचार करण्यापूर्वीच ती बरेच वेळा भाड्याने दिली जाई. एकदा त्याने एका व्यापाऱ्याकडून थोडी जमीन भाड्याने घेऊन त्यात नांगरणी केली. मग ती जमीन तो व्यापारी कोर्टात हरला. आणि पाखोमचे श्रम वाया गेले. जर ती जमीन त्याची स्वतःची असती तर ती त्याला कुणाला द्यावी लागून त्रास झाला नसता.

मग तो तशी इस्टेट मिळवायच्या दृष्टीने प्रयत्न करू लागला. त्याला एक नुकसान झालेला व त्यामुळे थोड्या स्वस्त किमतीत जमीन विकणारा शेतकरी भेटला. पाखोमने त्याच्याशी बोलणी सुरु केली आणि बऱ्याच चर्चेनंतर १००० रुबल्समध्ये सौदा तोडला गेला. त्यातील अर्धे लगेच द्यायचे होते. अशा तऱ्हेने व्यवहार ठरल्यावर एक दिवस एक व्यापारी त्याच्या घोड्यांना खायला घालण्यासाठी पाखोमच्या घरी आला त्यांनी चहा घेतला व बोलत बसले. व्यापारी

म्हणाला की तो खूप लांबून, बाश्किरहून आला आहे  व तेथे त्याने फक्त १००० रुबल्समध्ये १५००० एकर जमीन खरेदी केली आहे. पाखोम त्याला प्रश्न विचारत गेला व व्यापारी उत्तर देत गेला. व्यापारी म्हणाला, “मी काय केले तर तेथील बड्या लोकांना शंभर रुबल्स खर्च करून फक्त काही नजराणे दिले. (लांब कोट, गालिचे आणि चहाचा अर्क.) आणि ज्यांना हवी होती त्यांना दारू दिली. पाच पेनीना एक एकर जमीन या भावाने मला जमीन दिली गेली. त्याने पाखोमला ते खरेदीखत दाखवले. ती जमीन नदीकिनारी असून गवताळ आहे. पाखोमने त्याला अजून प्रश्न विचारले.

अजून एक वर्षाने तुला अशी जमीन मिळणार नाही. बाश्किरची सर्व जमीन अशीच आहे. शिवाय तिथले लोक शेळीसारखे गरीब आहेत. तुला काही न करता त्यांच्याकडून वस्तू मिळतील.’

“पाखोमने विचार केला, “हे चांगले दिसते आहे. फक्त १००० रुबल्समध्ये १५००० एकर जमीन मिळत असेल तर काय वाईट आहे? इथे कर्जफेड करत बसण्यापेक्षा तिथे मी कदाचित तेवढ्याच पैशात मोठा उद्योजक बनेन.”

पाखोमने व्यापाऱ्यांला विचारले की बाश्किरला कसे पोचायचे आणि तो पाहुणा गेल्याबरोबर तो बायको मुलांना घरी ठेऊन व एका नोकराला बरोबर घेऊन, प्रवासासाठी तयार झाला. प्रथम शहरात जाऊन व्यापाऱ्याने केलेल्या उपदेशाप्रमाणे, चहाचा अर्क, दारू व इतर भेटवस्तू आणल्या. नंतर ते तीनशे मैल अंतर पार करून सातव्या दिवशी बाश्किरला पोचले. सर्व काही त्या व्यापाऱ्याने सांगितल्याप्रमाणे होते. तेथील लोक उतरत्या छपराच्या गाड्यांमध्ये रहात. त्या गाड्या गवताळ प्रदेशातून वाहणाऱ्या नदीशेजारी असत. ते शेत नांगरत नसत व मका खात नसत. तिथे घोडेस्वारांचे घोडे व गाईगुरांचे कळप हिंडत असत. गाड्यांना मागे घोड्यांचे खाणे लटकवलेले असे. आणि घोड्याना तो तोबरा दिवसातून दोन वेळा दिला जाई. घोडीच्या दुधावर तेथील लोक गुजराण करत. त्यापासून स्त्रिया क्युमीस नावाचे पेय तयार करत व ते चीजमध्ये मिसळत. खरे तर बाश्किरच्या लोकांना दोनच पेये माहिती होती. एकतर क्युमीस किंवा चहा. त्यांचे खाणे मटण हे होते आणि मनोरंजन म्हणजे बासरी हे होते. तरीही ते आनंदी व चमकदार दिसत. सबंध वर्ष ते सुट्टीसारखे घालवत. शिक्षणात ते दुर्दैवाने मागे होते. त्याना रशियन येत नसे. पण ते दयाळू व आकर्षक लोक होते.

त्यांनी पाखोमला पाहिल्याबरोबर ते गाडीतून बाहेर आले व त्याला गराडा घातला. दुभाष्याला शोधले गेले. पाखोमने सांगितले की तो जमीन घ्यायला आला आहे. लोकाना आनंद झाला. त्यांनी त्याला एका ऐटदार गाडीत नेले. त्याला मऊ रगांच्या  ढिगावर बसवले. त्याला चहा व क्युमीस देण्याची तयारी चालवली. एक बकरी मारून तिचे मटण त्याला जेवायला दिले. पाखोमने  त्याच्या गाडीतून त्यांच्यासाठी आणलेल्या भेटी काढल्या. त्या सगळयांना वाटल्या.

चहाचा अर्कही त्याने सर्वांना दिला. नंतर ते बाश्किरचे लोक आपापसात काही वेळ बोलले व मग त्यांनी दुभाष्याला बोलायला सांगितले.

दुभाष्या म्हणाला, “त्याना तू आवडलास व तू दिलेल्या भेटींचा आदर करून ते त्यांच्या पद्धतीप्रमाणे, तुझी प्रत्येक इच्छा पूर्ण करतील.”

पाखोमने उत्तर दिले, “मला जमीन हवी आहे. मी आलो तिथे पुरेशी जमीन व पुरेसे पीक नव्हते. तुमच्याकडे मी कधी पाहिली नाही, अशी चांगली जमीन आहे.

दुभाष्याने ते बोलणे बाश्किरच्या लोकांना सांगितले. त्यांनी आपापसात काही चर्चा केली. जरी पाखोमला त्यांची भाषा समजत नसली तरी ते आनंदी स्वरात मोठमोठ्याने काही बोलले व जोरात हसले एवढे त्याला कळले. शेवटी ते थांबले व पाखोमशी दुभाष्या बोलू लागला, “मी तुला असे सांगतो, की तुझ्या दयाळूपणामुळे आम्ही तुला कितीही जमीन विकायला तयार आहोत. तू हाताने फक्त खूण कर आणि मग तेवढी जमीन तुझी.”

परत ते लोक आपापसात बोलू लागले. काही वादाचा मुद्दा दिसत होता. काय चालले आहे असे पाखोमने विचारल्यावर दुभाष्या म्हणाला, “त्यांच्या मते स्टार्शींना याला प्रथम विचारले पाहिजे. पण काहीजणांना वाटते की त्याची काही जरुरी नाही.”

असे ते लोक भांडत असताना अचानक, तिथे आलेल्या एका गाडीतून कोल्हयाच्या कातडीची टोपी घातलेला माणूस आला. त्याबरोबर सगळेजण उठून उभे राहिले. दुभाष्या म्हणाला, “हाच स्टार्शींना स्वतः आहे.” ताबडतोब पाखोमने सर्वात चांगला लांब कोट काढला व पाच पौंड चहाच्या अर्काबरोबर त्याला भेट दिला. स्टार्शींनाने त्या भेटी स्विकारल्या व तो मानाच्या जागेवर बसला. त्याला ते लोक काही समजावून सांगू लागले. त्याने खूप वेळ ऐकून घेतले. मग तो हसला. नंतर पाखोमशी तो रशियनमधून बोलू लागला.

“छान. तुला हवी तिथे तू जमीन घे आमच्याकडे पुष्कळ जमीन आहे.”

पाखोमने विचार केला, “मग मला हवी तितकी जमीन मी घेऊ शकतो तर! पण तरीही हा व्यवहार मला हुशारीने पार पाडायला हवा. आत्ता ते म्हणत आहेत की जमीन तुझी आहे पण नंतर कशावरून काढून घेणार नाहीत?”

तो मोठ्याने म्हणाला, “तुमच्या दयाळू बोलण्याबद्दल मी आभारी आहे. तुमच्याकडे पुष्कळ जमीन आहे मला त्यातील थोडीच हवी आहे. यातली कुठली जमीन माझी होऊ शकेल हे तुम्ही मला सांगा. आपण ती व्यवस्थित मोजू. मग ती तुम्ही मला द्या. जन्ममरण सगळे देव ठरवतो. तुम्ही चांगले लोक आहात व मला जमीन देत आहात पण तुमची मुलेबाळे माझ्याकडून ती कशावरून परत काढून घेणार नाहीत?”

स्टार्शीना हसला व म्हणाला, जमीनीचा व्यवहार झाला आहे. ही आत्ताची सभा त्यावर शिक्कामोर्तब करण्यासाठीच आहे. ही काही गुप्त गोष्ट नाही."

पाखोम म्हणाला, "पण तुमच्याकडून जमीन घेतलेला एकजण मला अलीकडेच भेटला होता व त्याला तुम्ही त्याला जमिनीचे खरेदीखत दिले. त्यामुळे, कृपा करून मलाही तसे द्या."

आता स्टार्शीनाला समजले.

तो उत्तरला, "ठीक आहे. आमच्याकडे एक लेखनिक आहे. तो गावात जाऊन आवश्यक ते शिक्के वगैरे घेऊन येईल."

पाखोमने विचारले, "पण जमिनीची किंमत काय आहे?"

स्टार्शीना म्हणाला, "आमची किंमत दिवसाला १००० रुबल्स आहे."

पाखोमला हा दिवसाचा दर काही समजला नाही. त्याने विचारले, "पण त्यात किती एकर जमीन येईल?'

स्टार्शीना म्हणाला, "आम्ही तसे मोजत नाही. आम्ही दिवसाचा हिशेब करतो. म्हणजे तुम्ही त्यादिवशी जेवढे चालू शकाल तेवढी जमीन तुमची. आमची अशी पद्धत आहे. किंमत १००० रुबल्स."

पाखोम आश्चर्यचकित झाला. तो म्हणाला, "मनुष्य एका दिवसात खूप धाऊ शकेल."

स्टार्शीना परत हसला व म्हणाला, "असे बघा, हे आता तुमच्यावर अवलंबून आहे. पण आमची एकच अट आहे की तुम्ही कितीही अंतर चाला, पण तुम्हाला दिवसभरात त्या जागी परत यायला पाहिजे. जर तुम्ही असे करू शकला नाही, तर ती जमीन तुमची होणार नाही.'

पाखोमने विचारले, "पण कुठून सुरवात करायची हे तुम्ही कसे ठरवणार?"

"जिथून तू सुरवात करशील ते ठिकाण आम्ही आरंभबिंदू म्हणून धरणार. मी व माझी माणसे इथे थांबणार. तू कुठपर्यंत जाऊन परत यायचे ते ठरवू शकतोस. तुझ्या मागोमाग आमची काही माणसे, जमिनीत खांब रोवत येणार. नंतर त्या खांबांवर नांगर फिरवला जाईल. तुला कशी फेरी मारायची आहे, हे तू ठरव. फक्त जिथून सुरवात करशील तिथे सूर्यास्ताच्या आत परत आले पाहिजे. तू जेवढी फेरी मारशील तेवढी जमीन तुझी."

पाखोमने या अटी मान्य केल्या. दुसऱ्या दिवशी लवकर धावायला सुरवात करायचे ठरले. मग ते लोक परत एकमेकांशी बोलले, परत क्युमीस प्यायले. अजून मटण खाल्ले. रात्र पडेपर्यंत त्यांच्या गप्पाटप्पा चालू राहिल्या. दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी नदीच्या पलीकडे ते हजर राहतील असे सांगून ते गेले. पाखोम त्यांनी दिलेल्या अंथरुणावर झोपला.

पाखोमला झोप लागेना. आपल्याला आता येथील जमिनीवर शेती करायची आहे, हा विचार त्याच्या डोक्यातून जात नव्हता.

तो स्वतःशीच विचार करत होता, “उद्या मला खूप मोठी जमीन मिळवली पाहिजे. माझ्या मालकीची जमीन! मी एका दिवसात निदान तीस मैल धाऊ शकेन व तेवढी जमीन मी मिळवेन. मग मला कोणाचे वर्चस्व मानायची गरज नाही. मी बैलजोडी व दोन गुलाम खरेदी करेन. मी ती उत्तम जमीन नांगरेन व बाकीच्याचे कुरण बनवेन.

पूर्ण रात्र पाखोमच्या डोळयाला डोळा लागला नाही. पहाटे थोडीशी डुलकी लागली. तेवढ्यात त्याला एक स्वप्न पडले. तो त्याच्या गाडीत बसून बाहेरच्या कुणाचे बोलणे ऐकतो आहे. कोण बोलते आहे ते बघण्यासाठी तो बाहेर जातो. तिथे स्टार्शीना जमिनीवर बसलेला असतो व आनंदाने हसत गडाबडा लोळत असतो. मग पाखोम त्याच्याजवळ जाऊन तो का हसतो आहे असे विचारतो. त्याच्या लक्षात येते की तो स्टार्शीना नसून त्याच्याकडे येऊन त्याला माहिती देणारा व्यापारी असतो. मग तो त्या व्यापाऱ्याला विचारतो, “तो थोडे दिवसापूर्वीच माझ्या घरी तू आलेला नव्हतास का?” तर तो व्यापारी एकदम व्होल्गाच्या पलीकडील शेतकऱ्यात बदलतो, ज्याला त्याने जुन्या गावातील घरी बोलावलेले असते. शेवटी पाखोमला आढळते की तो, त्याला वाटत असलेला शेतकरी नसून प्रत्यक्ष सैतान आहे. त्याला शिंगे व खूर आहेत. तो कुठेतरी टक लावून बघत हसतो आहे. मग पाखोमने स्वतःशी विचार केला, “तो कशाकडे बघतो आहे? आणि एवढा का हसतो आहे?” स्वप्नातच ते बघायला म्हणून तो थोडा बाजूला वळतो आणि एका पायात चपला नसलेल्या माणसाला पाहतो. त्याच्या अंगात फक्त शर्ट व गुडघ्यापर्यंत पँट असते. तो पाठीवर झोपलेला असून त्याचा चेहरा पांढराफटक पडलेला असतो. अजून लक्ष देऊन बघितल्यावर पाखोमला कळते की तो माणूस म्हणजे तो स्वतःच आहे.

त्याने एक जांभई दिली व उठला -- ते स्वप्न खरे असल्यासारखे त्याला वाटले. मग त्याने उजाडले का ते पाहिले, तर पहाट जवळ आल्याचे त्याला कळले.

त्याने विचार केला, “मला चालणे सुरु केले पाहिजे. त्या लोकांना उठवले पाहिजे.”

पाखोम उठला. घोडागाडीत झोपलेल्या लोकांना उठवले. आसपास जाऊन बाश्किरच्या लोकांना उठवले. कारण गवताळ प्रदेशात जाऊन चालायला किंवा धावायला सुरवात करायची वेळ झाली होती. मग ते उठून तयार झाले. त्यांनी क्युमीसची न्याहारी केली. ते पाखोमला चहा देऊ लागले पण तो थांबू शकत नव्हता.

तो म्हणाला, “चला. जायचे असेल तर निघायला हवे. वेळ झाली आहे.” त्या लोकांनी घोडागाडी जोडली व निघाले. काहीजण घोड्यावर व काहीजण घोडागाडीत, तर पाखोम त्याच्या छोट्या गाडीने त्याने त्याच्याबरोबर आणलेल्या माणसाला घेऊन निघाला. पहाट होताहोता ते गवताळ प्रदेशाशी येऊन पोचले. तिथे एक टेकाड होते त्याला तेथील लोकांच्या भाषेत शिचान

म्हणत. तिथे सगळेजण एकत्र झाले. स्टार्शीना आजूबाजूला त्याच्या हाताने पाखोमाला मुलुख दाखवत म्हणाला, “तू आजूबाजूला जी जमीन बघतो आहेस ती आमची आहे पण तू तुला कुठल्या दिशेने जायचे आहे, ते ठरव.” पाखोमाचे डोळे चमकले. सर्व जमीन गवताळ होती व त्याच्या तळहातासारखी सपाट होती. त्यावर काळी झुडुपे उगवली होती. फक्त खोल दरी असलेल्या ठिकाणी गवत छातीएवढे उंच होते. स्टार्शीनाने त्याची टोपी काढली आणि ती टेकाडाच्या बरोबर मध्ये ठेवली. तो म्हणाला, “ही खूण आहे. यात तुझे पैसे ठेव. तुझा नोकर तू परत येईपर्यंत इथे थांबेल. इथून तू सुरवात कर व इथेच परत ये. तू जिथपर्यंत जाशील तेवढी सगळी जमीन तुझी होईल.”

पाखोमने त्याचे पैसे काढले. ते टोपीत भरले. मग त्याने त्याचे कपडे घातले. कोट घातला कमरपट्टा घट्ट केला. पाठीवरील पिशवीत पाव टाकला. पाण्याची बाटली खांद्याला अडकवली. त्याचे लांब बूट घातले व चालायला तयार झाला. तो बराच विचार करून बोलला, “सगळीकडे मला सारखेच दिसत असल्याने मी आता उगवत्या सूर्याच्या दिशेने चालायला सुरवात करतो.” त्याने तिकडे तोंड केले व सूर्योदयाची वाट बघू लागला. त्याने विचार केला, “मला वेळ फुकट घालवता कामा नये. अजून हवा थंड आहे तोवर मी जास्तीत जास्त चालू शकतो.”

टेकाडावर चढलेले बाश्किरचे लोक खाली उतरून पाखोमच्या मागे चालू लागले. क्षितिजावर सूर्याचे पहिले किरण पडताच पाखोम गवतातून चालू लागला. त्याच्यामागून घोडेस्वार येत राहिले.

तो फार सावकाश नाही व फार घाईनेही नाही, असा चालला होता. साधारण अर्धा पाऊण मैल गेल्यावर तो थांबला व त्याने एक खांब रोवला. मग परत चालू लागला. त्याचा पहिला दम गेला होता आणि त्याची चाल मंदावली होती. तो परत थांबला व अजून एक खांब रोवला. आता सूर्य माथ्यावर येऊन तळपत होता. त्याने वर पाहिले. लोक आसपास उभे होते त्याने अंदाज केला की त्याने तीन सव्वातीन मैल अंतर कापले असेल. त्याला आता उन्हाचे चटके बसत होते. त्याने कोट काढला व कमरेचा पट्टा घट्ट केला. मग अजून तीन मैल गेला व थांबला. आता फारच उकडत होते. त्याने परत सूर्याकडे पाहिले. त्याची जेवायची वेळ झाली होती. त्याने विचार केला, “एक टप्पा पार पडला. पण अजून बराच दिवस बाकी आहे एवढ्यात वळायला नको. परंतु मी माझे बूट काढून टाकतो.” मग तो बसला. बूट काढले व परत चालू लागला. आता चालणे सोपे झाले. “अजून तीन मैल गेलो की मग मी मागे फिरतो.” ती वळायची जागा त्याने निश्चित केली. “मी जितका पुढे जातो तेवढी जमीन जास्त चांगली वाटते.” असा विचार करून तो चालत राहिला. आता ते सुरवातीचे टेकाड दिसत नव्हते. त्यावरील लोक काळया मुंग्यांसारखे दिसत होते.

अजून बरेच अंतर गेल्यावर त्याने विचार केला, मी खूपच चाललो. आता वळायला हवे.” त्याला खूप घाम आला होता व तहान लागली होती. त्याने पेय प्यायले व एक खांब रोवला. मग डावीकडे वळला. उंच गवतातून व चढत्या उन्हातून तो चालत राहिला. आता तो दमला.

सूर्याकडे बघून त्याने संध्याकाळच्या जेवणाची वेळ झालेली पाहिली. त्याने विचार केला, “आता थोडी विश्रांती घ्यावी.” त्याने थांबून पण न बसता थोडा पाव खाल्ला. तो स्वतःशीच बोलला, “जर मी बसलो तर आडवा होईन व मला झोप लागेल. त्यामुळे थोडा वेळ थांबून तो परत चालू पडला. प्रथम त्याला चालणे थोडे सोपे वाटले कारण खाऊन शक्ती आली होती. आता सूर्य कलला होता. आता पाखोम फारच थकून गेला होता. पण त्याने विचार केला, “एक तासाचे कष्ट आणि पदरात फळ पडेल इष्ट”

या वळणाने तो तीन मैल गेला. आता तो पुन्हा डावीकडे वळणार होता तेव्हा त्याला समोर दरीसारखा जमिनीचा छान भाग दिसला. हा भाग सोडणे मूर्खपणा ठरेल. “इथे जवसाचे पीक उत्तम येईल.” त्याने विचार केला. त्यामुळे वळण्याऐवजी तो त्याच दिशेने चालत राहिला. तिथे काठी रोवली व मग वळला. त्या टेकाडाकडे पाहताना लोक जवळजवळ ओळखू न येण्याइतके लहान दिसत होते. ते नक्कीच नऊ साडेनऊ मैलांपेक्षा जवळ नव्हते. त्याने विचार केला, “मी आत्तापर्यंत खूप चाललो. आता काहीतरी जवळचा मार्ग निवडला पाहिजे.” त्यामुळे त्याने परत जोमाने चालायला सुरवात केली. परत एकदा त्याने सूर्याकडे पाहिले. आता संध्याकाळच्या जेवणाची वेळ झाली होती आणि त्याने फक्त एक मैल अंतर काटले होते. सुरवात जिथून केली ती जागा अजून आठ मैल लांब होती. “आता मला घाई केली पाहिजे. मार्ग खडतर असला तरी आता सरळ चालत सुटायला हवे. आता मी पुरेसा चाललो आहे.” तो स्वतःशी बोलला. तो टेकाडाच्या दिशेने भरभर चालू लागला.

पण आता त्याला चालायला त्रास होऊ लागला. त्याचे पाय फार दुखू लागले. ते अती घासले गेले होते व थोड्या जखमाही झाल्या होत्या. तो अगदी हळू चालत होता. आता विश्रांती घेता आली तर किती छान होईल, असे त्यास वाटत होते पण सूर्यास्तापूर्वी टेकाडाशी पोचायचे असेल, तर थांबून चालणार नव्हते. सूर्य काही थांबणार नव्हता. तो जणू सतत त्याला हाकलत होता. आता तो अडखळत चालत होता. परत त्याच्या डोक्यात विचारचक्र सुरु झाले, “माझे काही मोजायला चुकले तर नाही ना? मला परत सुरवातीच्या जागी जाता येणार नाही इतका, मी फार जास्त चाललो का? मी आता काही झाले तरी ते टेकाड गाठू शकणार नाही का? अजून खूपच अंतर उरले आहे. असे तर होणार नाही ना, की माझे सर्व पैसे व श्रम वाया जातील? आता मला काही करून, पराक्रम केला पाहिजे.”

पाखोमने मोठा श्वास घेऊन धावायचा प्रयत्न केला. त्याच्या पायातून रक्त येऊ लागले. तरीही तो चालत राहिला. चालत राहिला. धावत राहिला. पुढे पुढे धावत राहिला. टोपी, कोट. पाण्याची बाटली, बूट; सर्व काही त्याने फेकून दिले. “ओहो, मी जे बघितले त्यामुळे मी फारच खूष झालो. पण आता तेलही गेले, तूपही गेले आणि हाती राहिले धुपाटणे. मी सूर्यास्तापूर्वी काही सुरवातीच्या टेकडीशी पोचू शकत नाही.” त्याच्या भीतीमुळे तो अधिकच दमून कोलमडायला आला. तरीही तो धावत राहिला. त्याचे शर्ट व पँट घामाने निथळले. तोंड वासले गेले. लोहाराच्या

भात्यासारखी छाती धपापू लागली. हृदयाला जणू हातोड्याचे घाव बसू लागले. पाय तुटून त्याचे नसल्यासारखेच वाटू लागले. आता त्याच्या डोक्यातील जमिनीबद्दलचे सर्व विचार थांबले. अति दमल्यामुळे मृत्यू येतो आहे काय व तो कसा थांबवावा हा एकच विचार डोक्यात होता. मरणाची भीती वाटत असूनही तो थांबू शकत नव्हता. त्याने विचार केला, "आता एवढे आलो आहोत तर थोडेसे जाऊन थांबू. नाहीतर ते मला मूर्ख ठरवतील." आता लांबून त्याला बाश्किरच्या लोकांचे प्रोत्साहनपर ओरडणे व किंकाळया ऐकू येत होत्या. त्या ऐकून त्याला उभारी आली. त्याच्या शेवटच्या दमश्वासाने तो सूर्य अस्ताला जाईपर्यंत तो धावणार होता. आता तो त्याच्या गंतव्य स्थानाच्या अगदी जवळ होता. टेकाडावरुन लोक त्याला हात करताना दिसत होते. ते त्याला घाई करायला सांगत होते. त्याला कोल्हयाच्या कातडीची टोपी तिथे पडलेली दिसली. त्यात त्याचे पैसे होते. स्टार्शीना बाजूला जमिनीवर हात टेकून बसला होता. अचानक पाखोमला त्याचे स्वप्न आठवले. त्याने विचार केला, "आता माझ्याकडे खूप जमीन आहे. फक्त त्यावर रहाण्यासाठी देवाने मला सुखरूप ठेवायला हवे. पण माझे हृदय मला इशारा देते आहे, की मीच मला मारले आहे."

तरी तो धावतच होता. त्याने शेवटचेच सूर्याकडे पाहिले. तो मोठा आणि लाल दिसत होता. पृथ्वीला टेकला होता. क्षितिजाखाली बुडायला आला होता. तो अगदी बुडत असताना पाखोम टेकाडाशी पोचला. तो दुःखाने ओरडला, "आहा" कारण त्याला वाटले सगळे ओम फस झाले. अचानक त्याला कळले की त्याला सूर्य दिसत नसला तरी अजून टेकाडावरील लोकांना तो दिसत होता. तो उतरणीवरुन घसरत निघाला. तो ठेचकाळत जात असताना त्याला अजून ती टोपी दिसत होती. पडता पडता त्याने त्याचे हात टोपीकडे वळवले व तिला स्पर्श केला.

स्टार्शीना ओरडला, "अरे तरुण माणसा, तू खरेच खूप जमीन मिळवली आहेस."

पाखोमाचा नोकर त्याच्याकडे धावला व त्याला उचलायचा प्रयत्न केला. पण त्याचा तोंडातून रक्त वहात होते. पाखोम तिथे मरून पडला. नोकर दुःखाने किंचाळला. स्टार्शीना त्याचे हात बाजूला ठेऊन हसत तिथे बसून राहिला.

बऱ्याच वेळाने तो उठला. जमिनीवरून फावडे घेउन ते नोकराकडे फेकले. तो एवढेच म्हणाला, "त्याला पुरा."

बाश्किरचे लोक जमले व निघून गेले एकटा नोकर राहिला. त्याने पाखोमच्या टाचेपासून डोक्यापर्यंतच्या लांबीचा खड्डा खणला -- साधारण चारपाच फूट लांबीचा -- आणि त्याला पुरले.

The Moose And Rusty Jones

By

Sir Charles Douglas Roberts

# काळवीट आणि रस्टी जोन्स



त्या वसाहतीतील जुन्या वयस्क लोकांनाही आठवत नव्हते, की एकदा फार कडक थंडी पडली होती. ओटानुन्सीसच्या आसपासचा देश आणि क़्वॅहडॅविक तळे, थंडीचा ऋतु सुरु होण्यापूर्वीच पडू लागलेल्या बर्फाने जवळजवळ आत गाडले गेले होते. असे म्हटले जात होते, की पूर्वी इतकी हाडात खिळणारी व असहनीय थंडी कधीच पडली नव्हती. एकावर एक हिमवादळे येत होती व जमिनीवरील सर्व खाणाखुणा विस्कटून टाकत होती. छोट्याशा सुनसान लाकडी केबिन्सची छपरे उडून जात होती. रस्त्यांवरील बर्फ बाजूला करायचे प्रयत्न, थंडीचा अर्धा ऋतू संपण्यापूर्वीच, तेथे रहाणाऱ्या विखुरलेल्या लोकांनी सोडून दिले होते. पायात बर्फात वापरायचे

बूट घालूनच त्यांची सर्व येजा चालली होती. जमिनीवर सात, आठ, नऊ, दहा फुटावरून बर्फातून त्यांचे रस्ते तयार झाले होते. लहानसहान झाडे दृष्टीसमोरून नाहीशी झाली होती. विसरली गेली होती. स्पृस व फरची उंच झाडे बर्फाळ घुमटांमधून माना वर काढत होती. काही ठिकाणी जोराच्या वाऱ्याने फांद्या वाकवून त्यावरील बर्फाचे असह्य ओझे कमी केले होते आणि काही ठिकाणी बर्फावर त्या पडून त्यांचा पूर्ण नाश होत होता.

जंगलामधील रानटी प्राण्यांसाठी ही लांबलेली दुःखांतिका होती. पण काही सुदैवी प्राणी, बर्फापासून खूप आत खोल अशा बिळात, दीर्घ निद्रेत जाऊ शकतात. मग मरणाची थंडी त्याना काही करू शकत नाही. काही मोठे प्राणी जंगलात त्यांच्या थंडीच्या घरात आश्रय शोधतात. बर्च, पॉप्लर व मेपलच्या झाडांच्या ढोल्यांभोवती फांद्या व सालींपासून घट्ट कुंपणे तयार करून घरात जायचे दार अगदी अरुंद ठेवतात. थंडी वाढत जाते, तसे ते त्यांचे खाणे असलेल्या पानेवाल्या फांद्या जवळ आणून ठेवतात. तेव्हा त्यांच्या आश्रयस्थानाचे दार, ते जवळजवळ बंद करून टाकतात. बर्फातून भटकत खाणे शोधणे, फार त्रासदायक ठरते. असे बंदिस्त झालेले काळवीटाच्या कुटुंबातील काही प्राणी, अन्नशोधन मोहिमेत थोडेफार यशस्वी होतात, ते निदान जगतात. पण काही प्राणी उपासमारीने मरण ओढवून घेतात.

अशा तऱ्हेने गंभीर थंडी लांबत लांबत शेवटी वसंताच्या आगमनाकडे वळते.

स्मिथच्या दुकानाबाहेर ब्रिनेच्या कोपऱ्याला जिथे पोस्टऑफीस आहे, तिथे तरुण रस्टी जोन्स पाकीटे, ओटच्या पिशव्या, दगडाचा मोठा विटकरी रंगाचा दाट रस भरलेला जग आणि केरोसिनचे डबे त्याच्या जीपमध्ये सुरक्षित रहावेत म्हणून दोरीने बांधत होता. त्याच्या छोट्या, कडक, टोकेरी केसांवरून त्याला रस्टी हे टोपण नाव बहाल करण्यात आले होते. बांधाबांधीची समाधानकारक कारवाई झाल्यावर त्याने त्याचे निळे, घरी विणलेले हातमोजे चढवले. त्याचे मऊ पाय त्याने बर्फात चालायच्या काळवीटाच्या कातड्यापासून बनवलेल्या, सपाट बुटात घातले व दुकानात रेंगाळणाऱ्या लोकाना अच्छा केला. त्याने शेताकडे जाणारा चार मैलाचा रस्ता काटायला सुरवात केली. उशीर झाला होता. आत्ताच सूर्यास्त होत होता. तो खरे तर निघणार होता त्यापेक्षा त्याला एक तास उशीर झाला होता. तो डाक घेण्यासाठी थांबला. मागील

आठवड्याच्या (आठ दिवसांनी निघणाऱ्या) वर्तमानपत्रात, एक गोष्ट आली होती. ती वाचायला तो उत्सुक होता. घरच्या कामांचा विचार त्याच्या डोक्यात आला. घरी जाऊन जेवण झाल्यावर वाचण्यापूर्वी कुठले काम त्याला निपटायचे आहे, याचा विचार तो करू लागला.

रस्त्यावरून एक मैल गेल्यावर, त्याला एक कल्पना सुचली. दरीपलीकडे जाऊन, डाव्या बाजूला, वळल्यास एका मैलाचे अंतर वाचले असते. इतर ॠतुंमध्ये असे करायची काही गरज नव्हती. पण आत्ता बर्फाचे ढिगारे व एकदम उतार यामुळे मधील रस्ता फार खराब झालेला होता. आता त्याच्या लक्षात आले की या रस्त्याने प्रवास करणे सोपे आहे. असा विचार यापूर्वी न करणे, हा त्याचा मूर्खपणा होता. भरलेली जीप जंगलातून सहजतेने चालवतांना, तो चुकून लांबच्या वळणाच्या रस्त्याला लागला. तो जरी मुलगाच असला तरी त्याची जंगलातील दिशांची जाण व तेथील जमिनीची ओळख चांगली असल्याने, तो त्याच्या गंतव्य स्थानी नक्की पोचला असता.

उंच सूचीपर्णी व विषारी हेमलॉक झाडांच्या शांत ओळींमधून तो वाट काढत होता. उंच, बारीक, पांढऱ्या बर्च झाडांच्या गर्दीतून तो कडेकडेने चालला होता. त्याच्या अनुभवी नजरेला दिसणारे बर्फाचे ढिगारे व फक्त शिखर बर्फाचे असलेले उंचवटे टाळत, तो चालला होता. कारण त्यात त्याचे बूट अडकायची शक्यता होती. नंतर थंड, निळसर करड्या व भुतासारख्या संधीप्रकाशात त्याला बर्फातले एक खोलगट भुयार दिसले. हेमलॉक झाडांच्या फांद्यांनी ते अर्धवट झाकले गेले होते. अचानक त्याला तो काळवीटांच्या कळपाच्या गर्दीत उभा असल्याचे जाणवले. त्याच्या आसपास दहा बारा मैलात काळवीट असतील अशी कल्पनाही त्याने केली नव्हती. तरीही इथे दरीशेजारील ओबडधोबड भागात काळवीट कुटुंबाने थंडीत रहाण्यासाठी आसरा शोधला होता. त्या वेड्यावाकड्या पसरलेल्या खोलगट भागात त्या महाकाय करड्या तपकिरी नर काळवीटाने, लहानशा मादीने व दोन छोट्या बछड्यांनी वस्ती केली होती. ते तिथे बसलेले होते. पण एका छोटारड्याने त्याच्या शेजारी असलेल्या, अर्थातच मेलेल्या, प्राण्याच्या थंड मासावर कसाबसा त्याचा पाय टाकला. इतरजण त्याच्याकडे फार घाबरलेले व दुःखी असल्यासारखे, कणवेनी निराशापूर्ण नजर टाकत होते. पण आता तो महाकाय नर काळवीट आक्रमक पवित्र्यात त्याच्या पायांवर उभा राहिला. सर्व शत्रूंमध्ये महाभयंकर असलेल्या माणसाशी टक्कर घेण्यासाठी

तो पवित्रा घेत होता. जोन्सला कळून चुकले की अशा धोकादायक प्राण्यासमोर तो हताश होऊन उभा आहे. मागे मागे होत तो लांब, दाट लपायची जागा शोधू लागला. त्याचे दयाळू, करडे डोळे सहानुभूतीने भरले. तो पुटपुटला. “यू. यू. गरीब बिचारे उपाशी प्राणी! उपाशीच दिसत आहेत.” त्याने आठवणीने जींपमधील दोरी सोडून उतारावरील काही शे यार्डावरून आणलेली बर्चच्या फांद्यांची मोळी बाहेर काढली. त्याच्या कमरपट्ट्यात खोचलेला दुमडलेला लांब सुरा बाहेर काढून त्याने काळवीटांच्या आवडत्या एक बचकाभर सुगंधित फांद्या बाहेर काढल्या.

जेव्हा त्याने त्याच्या हातातील माल काळवीटांचे वस्तीस्थान असलेल्या खोलगट भागात टाकला, तेव्हा तो नर काळवीट उत्सुकतेने खर्जात ओरडला. जसे काही नवे आयुष्य संचारल्यासारखी, भुकेलेली मादी व पिल्ले उठून उभी राहिली आणि मेजवानीवर तुटून पडली. जोन्सने अजून एक बचकाभर फांद्या काढण्यासाठी घाई केली.

जोन्सने धापा टाकत जीपमधील दोरी परत होती तशी आवळून बांधली व बोलला, “आजसाठी एवढे खाणे तुम्हाला बास होईल. उद्या सकाळी परत येताना मी तुमच्यासाठी छानसे गवत आणतो.”

जेव्हा मुलगा खूप उशिरा घरी पोचला, तेव्हा त्याच्या उशीर होण्याची गोष्ट ऐकून त्याच्या आईवडिलांना त्याच्याबद्दल सहानुभूती वाटली. पण त्याच्या गवत आणण्याचा वचनाला त्यांनी हरकत घेतली.

त्याची आई ठरवून म्हणाली, “आपल्या कुरणातील गवत आपल्या गुरांनाच जेमतेम पुरते. पण तुझे वडील कदाचित तुला, कणसांमधील धान्य काढल्यावर उरलेला वाळका भाग न्यायला परवनगी देतील. तसले काही त्या काळवीटांसाठी पुरेसे आहे.”

दणकट, गावठी व जंगलाचा माणूस असलेला वाकलेला बॉब जोन्स, सर्व वसाहतीत लाल बॉब म्हणून ओळखला जात होता. तो हसरा व चांगल्या स्वभावाचा होता.

"रस्टी, या हिवाळयात जंगलातील काळवीटांना व इतर भुकेलेल्या प्राण्यांना खायला घालायचा तुझा आग्रह असेल, तर तुला बर्च व पॉप्लर झाडांच्या फांद्या तोडाव्या लागतील. तेच त्यांचे नैसर्गिक खाणे आहे."

त्याच्या मक्याच्या गरम पॅनकेकच्या चळतीवर भरपूर पाक ओतून घेत रस्टी आनंदाने म्हणाला, "ठीक आहे. मी सकाळी ते तोडून त्यांच्यासाठी घेऊन जाईन. काळजी करू नका. मी त्यांच्याकडे लक्ष देईन. ते प्राणी किती दयनीय दिसतात, हे तुम्ही दोघांनी जर पाहिले असते तर तुम्हालाही माझ्यासारखेच वाटले असते. पण तुम्ही जे सांगत आहात, ते बरोबर आहे. आपल्याकडे आपल्या गुरांना लागते त्याहून फार जास्त नाही आहे."

त्यानंतर पुढचे काही आठवडे एक दिवसाआड रस्टी नेमाने हेमलॉकच्या झाडाखालील काळवीटांच्या वस्तीस्थानाकडे, हातात कुऱ्हाड घेऊन जीपमधून जात राहिला आणि गंभीरपणे त्यांचा पोशिंदा बनून, त्यांना दोन दिवस पुरेल एवढा फांद्या व डहाळयांचा पुरवठा त्याना करत राहिला. त्याच्या प्रयोगात त्याला असे आढळून आले की त्यांना त्याने एकदा नेलेल्या युरेशियन गवतापेक्षा, हा कच्चा कडबा खूप जास्त आवडतो. तिसऱ्या वेळी जेव्हा तो तिथे गेला, तेव्हा नर व बछड्यांनी त्याच्याजवळ येऊन त्याच्या हातातून त्यांचे खाणे घेण्यासाठी, त्यांचे गिळंकृत करणारे तोंड पुढे आणले. इतक्या कमी अवधीत ते पाळीव जनावरासारखे झाले. मादी थोडी संशयी व मत्सरी होती. तिला जिंकणे थोडे अवघड होते. पण एकदा जिंकल्यावर ती रस्टीला फारच रुळली व रस्टीने मोठ्या पिशव्यांमधून आणलेले खाणे इतरांपेक्षा जास्त हिरीरीने खाण्यासाठी पुढे येऊन इतरांना ढकलू लागली. सर्व नैसर्गिक गोष्टींचा अभ्यासक व निसर्गप्रेमी असल्याने काळवीटांच्या रुचीचा अभ्यास करणे रस्टीला आवडू लागले. त्याच्या लक्षात आले की पाव व पचपचीत, गार मक्याची रोटी त्यांना आवडते. जितक्या या गोष्टी शिळया व कडक तितक्या जास्त त्यांना त्या आवडतात. तर तोंडाला पाणी सुटणारी आल्याची रोटी ते उद्दामपणे धिक्कारतात. साखर त्यांना नको असे. पण खारे पदार्थ ते जिभल्या चाटत खात व त्याची अजून मागणी करत, त्याच्या मागे हिंडत. त्याने त्यांना टिनच्या ताटलीत ओटचे धान्य द्यायचा प्रयत्न केला. पण नराने ते हुंगले व नाकाच्या मोठ्या भोकांद्वारे जोराच्या शिंकेने बाहेर सर्वत्र उडवले. ओटचे धान्य महाग व दुर्मिळ होते. त्यामुळे ते परत द्यायचा विचार रस्टीने केला नाही. परंतु काळवीटांच्या आसपास वावरणारे

छानशी पिसे असलेले, रस्टी ज्यांना काळवीट पक्षी म्हणे ती उत्साही जोडी पटापट ते टिपू लागली. त्यामुळे ते धान्य फुकट गेले नाही. त्यांच्या बेछूट, तेजस्वी बोलक्या डोळयातून, ते लहानसे असले तरी, एकही कण सुटणे शक्य नव्हते.

मध्यंतरीच्या काळात ते मेलेले वातड दयनीय जनावर त्या खड्ड्याच्या मध्यभागी दुर्लक्षितपणे पडले होते. शेवटी रस्टीचे तिकडे लक्ष गेले. त्याने ठरवले की हा छानशा दृष्यावरील धब्बा आहे. ते नाहीसे करण्यासाठी त्याचे मागचे पाय दोरीने बांधून ओढत नेऊन त्याने ते कडेला नेले. ते ज्या मादीचे पिल्लू होते ती मादी रागाने हंबरत चाल करून आली. दचकून रस्टीने तिच्या नाकावर एक ठोसा लगावला व एखाद्या नर काळवीटाच्या अधिकाराने तिच्या अंगावर ओरडला. “मूर्ख” मादीने माघार घेतली. त्यात आणखी भर म्हणून रस्टीला एखाद्या इमानी कुत्र्यासारख्या चिकटलेल्या धूर्त, शहाण्या काळवीटाने त्या मादीवर त्याची फांद्या फुटलेली शिंगे रोखून ढुशी देण्याचा पवित्रा घेतला. ती मादी अस्वस्थतेने गोंधळून तिचे कान हलवत, उभी राहिली रस्टीने ते मेलेले धूड मोठ्या कष्टाने काही यार्ड ओढत नेऊन पांढऱ्या झुडुपामागे बर्फाच्या ढिगाऱ्यावर फेकून दिले. त्याच्या नजरेला आता खुपणार नाही, म्हणून त्याने ते साध्य केले.

मग तो परत काळवीटांच्या खोलगट वस्तीस्थानाशी आला व नर काळवीटाला थोपटले. त्याचे कान खाजवले व त्याच्याशी बोलू लागला. त्याच्या विश्वासार्हतेबद्दल त्याला मीठाचा मोठा वाटा दिला. पिल्लू मागणी करत पुढे आले. त्याला लहान वाटा दिला. मग मादी तिचा राग विसरून आली व तिचा वाटणीचा हक्क सांगू लागली. पण अजून रस्टीचा राग गेला नव्हता त्याने तिला त्याच्या तळहातावरील राहिलेले शेवटचे काही कण चाटायला दिले.

तो कडकपणे म्हणाला, “आता तू शिकशील की जास्त आखडूपणा करू नये.”

रस्टीच्या त्या जागेच्या दोन दिवसानंतरच्या पुढच्या भेटीत, आसपासच्या बर्फावर रानटी प्राण्याच्या खूप पाऊलखुणा बघून, पहिल्यांदा तो आश्चर्यचकीत झाला. त्यात जास्त खुणा कोल्ह्यांच्या दिसत होत्या आणि निमुळत्या खुणा मुंगुसाच्या होत्या. पण ठळकपणे दिसणाऱ्या मोठ्या खुणा रानमांजराच्या होत्या. रस्टीने काही वेळ त्यांची नीट परीक्षा केली. तो झुडुपामागे दडून मेलेल्या पिल्लाकडे बघू लागला. भुकेलेल्या रानटी प्राण्यांमध्ये ही बातमी लवकरच पसरली.

ते अर्धे प्रेत पळवले गेले. कुठे मेजवानी चाललेली दिसते आहे का, हे बघण्यासाठी रस्टीने त्याचे लाल डोके विचारपूर्वक खाजवले. गाडल्या गेलेल्या स्पृसच्या छोट्या झाडापासून तीस चाळीस पाऊलांवर ते पांढऱ्या बर्फातून उठून दिसत होते. त्याने ते निरखून बघितले. हिरव्या झाडीमधून त्याला निःश्चेष्ट पडलेले लाल कोल्हयासारखे काहीतरी दिसले.

काही सेकंदात ते त्या कोल्ह्याच्या लक्षात आल्याने, तो उभा राहून रस्टीकडे जणू त्याचे लक्ष नसल्यासारखा रोखून बघू लागला. त्याने जांभई देऊन मागील पायाने कान खाजवला. शेंदरी/विटकरी झुबकेदार शेपटी हलवली आणि जणू काही असे म्हणत दिसेनासा होईपर्यंत निघून गेला की, "ते तुझ्यासाठी आहे." रस्टी कोल्ह्यांना ओळखून होता. जीव वाचवण्यासाठी तो वाऱ्याच्या वेगाने पळून गेला.

रस्टी पुटपुटला. "ओहो, तो लाल भिकारडा ढुंगणाला पाय लाऊन पळून गेला. त्याची किंमत किती डॉलर्स असेल याचे तो नवल करत राहिला. तो मोठ्या रानमांजराच्या पाऊलखुणांचा माग काढत राहिला. ते पळून गेल्याने काय होईल याचे तो आश्चर्य करत राहिला. त्या मृत पिल्लाभोवती प्राण्यांना पकडण्यासाठी पिंजरे लावले तर कसे काय? पण डुकराच्या ओरडण्याला नाक मुरडून, त्याने असा विचार केला की पिंजरे लावायची कल्पना मला कधीच रुचली नव्हती. मग त्याने बंदुकीचा विचार केला -- मुख्यत्वे तो ती कोंबडीच्या पिल्लांमागे येणाऱ्या ससाण्यांची शिकार करण्यासाठी वापरत असे.

त्याने विचार केला, "त्या काळवीटांच्या तथाकथित घरात घुसण्याइतका तो लाल कोल्हा धीट व तरतरीत आहे तरी मी त्याची शिकार सहज करू शकेन." त्याला त्या प्राण्याचा गर्विष्ठ अपमानकारकपणा जरासा आवडला. शत्रूच्या देखत इतका शूरपणा दाखवण्याची धाटणी प्रशंसनीय होती.

तो स्वतःशीच पुटपुटला, "शेवटी, मला वाटते, मी जास्त त्रास करून घेऊ नये. ते सगळेच एवढे भुकेलेले असतांना, त्याना मृत पिल्लाजवळ येऊ न देणे, हे मी जे करतो आहे ते तितकेसे बरोबर नाही. ते अजून खराब होत नाही तोपर्यंत, त्यांना त्याला खाऊन त्यांची भूक शमवू दे. आणि तसेही मी जर बंदुकीचा बार उडवला, तर काळवीटसुद्धा फार घाबरून जातील."

असा विचार करून त्याने नापसंतीदर्शक हास्य करत काळवीटांच्या जागेकडे पाठ फिरवली. पण वडिलांना कळले, तर ते मला मूर्ख ठरवतील. आणि कदाचित त्यांचे बरोबर असेल.

शेवटी, खूप वेळाने शेवटी, अचानक असह्य थंडीचा जोर कमी झाला. सूर्य झळकू लागला. बर्फ वितळू लागला. गूढ रीत्या कोमट पावसाचे पाणी त्यावर पडू लागले. जमिनीखालील दीर्घ झोपेत गेलेले काळे व फुगलेले प्राणी त्यांच्या खोल जागेतून वर येऊ लागले. दरीत एकच गर्दी उसळली. आता काळवीट त्यांचे अन्न शोधत फिरू शकत होते. आता हेमलॉकच्या झाडाखालील खोलगट जागी रस्टीच्या फेऱ्या कमी झाल्या. खरच, आता त्यांची जरुरी राहिली नाही. पण त्याला त्या प्राण्यांचा, विशेषतः त्या शहाण्या, समंजस वयस्क नर काळवीटाचा लळा लागला होता. त्याना स्वतःच्या जीवनातून हद्दपार करणे त्याला जड जात होते. पण तरीही तसे करणे भाग होते. शेवटी तसेच झाले.

एका सकाळी खूप प्रयत्नपूर्वक तो ओल्या, उदास अवस्थेत हेमलॉकच्या झाडाखालील त्या खोलगट ठिकाणी आला, तेव्हा त्याला काळवीटाची मादी व पिल्ले गायब झालेली दिसली. पण त्याच्या अपेक्षेप्रमाणे विश्वासू नर काळवीट तिथे होता. त्याला माहिती होते की ही रस्टीची येण्याची वेळ आहे. रस्टीचे खिसे मक्याच्या कोरड्या चपातीने व मिठाने भरलेले होते. नर काळवीटाने मध्येमध्ये त्याच्या स्पर्शज्ञानोत्सुक वरील ओठाने रस्टीला हळूच घासल्यासारखा स्पर्श करत, ते मोठ्या आवडीने भरभर खाल्ले. शेवटी मोठ्याने हसत रस्टीने त्याचे बाहू फैलावून त्या प्राण्याच्या मानेभोवती टाकले व पुटपुटला, “अरे वयस्क प्राण्या, अच्छा. स्वतःची काळजी घे. पुढच्या हिवाळयात मी येईपर्यंत शिकाऱ्यांपासून दूर रहा. ओहो, तुझ्या मोठ्या डोक्यावर किती छान शिंगांची जोडी आहे.”

तो जरा घाईनेच बाजूला झाला. आणि तो आला होता त्यापेक्षा थोड्या लांबच्या पण कमी गर्दीच्या वाटेने, घराकडे चालू पडला.

काही पाऊले जातो न जातो तोच त्याला त्याच्या खांद्यावर व मानेवर जिभेचा काही स्पर्श जाणवला. एखाद्या मांजराप्रमाणे हळूच नर काळवीट त्याच्या मागे आला होता. भारावून जाऊन, पण काय करावे ते न कळून रस्टीने प्रेमाने त्या एकनिष्ठ प्राण्याला कुरवाळले आणि जाऊ

लागला. मोकळी शेतजमीन संपेपर्यंत, नर काळवीट त्याच्याबरोबर चालत राहिला. तेथील शेतकरी विहिरीत बादली सोडत होता. आणि त्याच्या साखळीचा स्पष्ट आवाज उन्हाळी हवेत घुमला. अवाढव्य काळापांढरा शेतातील कुत्रा उतारावरून जोराने भुंकत रस्टीच्या स्वागताला आला. काळवीट त्याचे मोठे कान हलवत थांबला.

रस्टी बोलला, “आता पळ. काळजी घे. अच्छा.” आजूबाजूला न बघता तो त्या भुंकणाऱ्या कुत्र्याकडे धावला. काळवीटाची वयस्क, गडद आकृती सावलीप्रमाणे पुसट होत झाडांमध्ये अदृष्य झाली.

Taking The Veil

By Katherine Mansfield

# जोगीण होणे



अशा सुंदर सकाळी कोणी दुःखी असेल असे मानणे अशक्य होते. फक्त एडनाशिवाय कोणीच तसे नव्हते. घरातील खिडक्या सताड उघड्या होत्या. त्यातून पियानोचे सूर येत होते. लहानसे हात पुढेमागे होत, त्यावर सराव करत होते. बागेतील वसंत ऋतूतील फुलांनी लगडलेली सूर्यप्रकाशित झाडे डोलत होती. रस्त्यावरील मुले शीळ घालत होती. छोटा कुत्रा भुंकत होता. जाणारेयेणारे लोक इतके वेगवान गतीने चालले होते की त्याना आता धावायला सुरवात करायची आहे, असे वाटत होते. आता तिला थोड्या अंतरावर ते लालसर पिवळे छत्रीसारखे फूल दिसले. त्या ऋतूतील पहिले!

कदाचित एडनासुद्धा तिला वाटत होते, तितकी दुःखी दिसत नव्हती. जेव्हा तुमची तब्येत छान असते, तेव्हा ओठ, गाल व डोळे चमकत असतात. वय वर्षे अठराला दुःखी दिसणे सोपे नाही. आणि सर्वात वरकडी म्हणजे तुम्ही निळा फ्रेंच झगा व कडेला कणीसफुले लावलेली खास उन्हाळी टोपी घातली असेल तर, मग ते अवघडच आहे. भीतीदायक काळया चामड्याच्या वेष्टनाचे पुस्तक तिने तिच्या हाताखाली धरले होते, हे खरे होते. ते वाचनालयातले साध्या बांधणीचे पुस्तक होते. निव्वळ अपघाताने त्या पुस्तकात कदाचित एक पुसट चिठ्ठी आली होती. वाचनालयात येणे हा घरातून बाहेर पडण्यासाठी शोधलेला एडनाचा बहाणा होता. खरोखर काय झाले आहे त्याचा अंदाज घेऊन, आता काय करावे हे ठरवण्यासाठी तिला वेळ हवा होता.

एक भयानक गोष्ट घडली होती. काल रात्री सिनेमागृहात जेव्हा ती व जिमी ड्रेस सर्कल मध्ये शेजारी शेजारी बसले होते, तेव्हा अगदी अचानक, एकाही क्षणाच्या सूचनेशिवाय -- खरे तर तिने बदामाचे चॉकलेट नुकतेच खाऊन संपवले होते व त्याचा डबा त्याला परत दिला होता -- ती त्या नटाच्या प्रेमात पडली होती. पण --प्रेमात -- पडली --

ती भावना तिने पूर्वी कधीही कल्पना न केलेली अशी होती. ती जरासुद्धा आनंददायी नव्हती. ती उत्कंठावर्धकही नव्हती. अति भयानक निराशादायक गूढ, दुःखी, रागीट व दयनीय अशी ती भावना होती, असे म्हणणे योग्य ठरले असते. जिमी टॅक्सी आणायला बाहेर गेलेला असतांना जर तो नट तिला व्हरांड्यात भेटला असता, तर त्याच्या एका इशाऱ्यावर वा एका खुणेवर, ती त्याच्याबरोबर जगाच्या पाठीवर कुठेही गेली असती. तिच्या आईवडिलांचा, जिमीचा, सुखी घराचा किंवा अगणित मित्रांचा जराही विचार तिने केला नसता --

सिनेमाची सुरवात खूप सुखकारक होती. ती बदाम चॉकलेटची अवस्था होती. मग नायक आंधळा होण्याचा भयंकर क्षण होता. ती इतकी रडली, की तिला जिमीचा छान दुमडलेला, मऊ रुमाल घ्यावा लागला. त्या रडण्याचे एवढे काही नाही. सबंध ओळच रडत होती. पुरुष माणसेही मोठ्याने मुसुमुसु करत नाक ओढत होती आणि सिनेमा बघण्याऐवजी आजूबाजूला बघत होती. नशिबाने जिमीचे डोळे कोरडे होते. त्याच्या रुमालाशिवाय एडनाने काय केले असते? -- त्याने तिचा रिकामा असलेला हात पकडून म्हटले, “प्रिय मुली, जरा हस बघू.” आणि मग त्याला खूष करण्यासाठी तिने शेवटचे बदामाचे चॉकलेट घेऊन, त्याला त्याचा डबा त्याला परत दिला. मग नायकाचे संधीप्रकाशाच्या वेळचे सुनसान खोलीतील भीतीदायक दृष्य सुरु झाले. बाहेर बँड वाजत असतो. रस्त्यावरून आरडाओरडा ऐकू येत असतो. किती कष्टाने, प्रयत्नपूर्वक, दयनीय रीत्या तो झुंजतो असतो. तो चाचपडत खिडकीशी जातो. शेवटी तो यशस्वी होतो. तिथे पडद्याला धरून तो उभा रहातो. तिथून एक प्रकाशकिरण, एकच प्रकाशकिरण, त्याच्या उंचावलेल्या निर्विकार चेहऱ्यावर पडतो. आणि मग पुसट होत जातो --

तो खरच -- अगदी खरच – ओहो, सर्वात जास्त -- त्या क्षणापासून एडनाला समजले, की आयुष्य सतत बदलत असते. ती जिमीच्या वाकलेल्या पाठीवरून तिचा हात काढून घेते. मागे होऊन चॉकलेटचा डबा एकदाचा बंद करते. शेवटी ते प्रेम असते! एडना व जिमीचे लग्न ठरले आहे. गेले दीड वर्ष ती त्यासाठी प्रयत्न करत होती आणि गेले वर्षभर जाहीर रीत्या तिचे लग्न ठरले आहे. पण ते लहानपणी त्यांच्या नोकराणींबरोबर बागांमध्ये फिरत होते, गवतावर बसत होते, पेय पीत होते व बिस्किटे खात होते, तेव्हापासून त्यांना माहिती होते की पुढे ते लग्न करणार आहेत. ही इतकी गृहीत धरली गेलेली गोष्ट होती की एडनाने शाळेपासूनच बोटात नेहमी साखरपुड्याची आश्चर्यकारक, छानशी, खोटी अंगठी घालायला सुरवात केली होती.

पण आता ते संपले होते. जिमीला ते कळत नाही आहे, यावर विश्वास ठेवणे तिला कठीण जात होते. ती शहाणपणे व दुःखाने हसली. चर्चच्या बागेत वळून टेकडी रस्त्याला लागली. लग्न

होऊन नंतर असे होण्यापेक्षा, आधीच त्याना, खरे तर फक्त तिला, ते समजले ते बरे झाले. आता अशी शक्यता होती की जिमी परत आग्रह करेल. नाही. तिला स्वतःला फसवून काही उपयोग नव्हता. त्याने ते कधी कबूल केले नसते. त्याचे आयुष्य मोडून पडले होते. खलास झाले होते. ते होणारच होते. पण तो तरुण होता -- काळ! लोक नेहमी म्हणतात, काळ हे औषध ठरू शकते. अगदी थोड्या प्रमाणात. चाळीस वर्षात तो जेव्हा म्हातारा होईल तेव्हा तो तिच्याबद्दल शांतपणे विचार करू शकेल -- कदाचित. पण ती -- तिच्या भविष्याचे काय?

एडना रस्त्याच्या चढाच्या टोकावर पोचली. तिथे नवीन पाने फुटलेल्या झाडाला पांढऱ्याशुभ्र फुलांचे झुबके लटकले होते. ती तेथील एका हिरव्या बाकावर बसली व चर्चमधील फुलांच्या ताटव्यावर नजर टाकली. तिच्या जवळील ताटव्यात नाजूक रंगीत फुले उमलली होती. त्यांना निळी कडा होती व एका कोपऱ्यात अजून वेगळया प्रकारची छानशी फुले बागेची शोभा वाढवत होती. कबुतरे उंच विहार करत होती. गाणे शिकवणाऱ्या अग्नेस जोगिणीचा आवाज तिला येत होता. आह-मे  असे ती म्हणत होती व पाठोपाठ प्रतिध्वनी उमटत होता -- आह-मे --

जर तिने जिमीशी लग्न केले नसते, तर कुणाशीच केले नसते. ती ज्याच्या प्रेमात पडली होती तो प्रसिध्द नट -- एडनाला इतके सामान्य ज्ञान होते की त्याच्याशी लग्न करणे कधीच शक्य नाही. ते अशक्य होते. ते तिलाही नको होते. त्यासाठी तिचे प्रेम फारच गाढ होते. ते अबोलपणेच करायचे होते. ते तिला त्रासदायक होत होते. तिच्या मते ते त्या प्रकारचेच प्रेम होते.

जिमी ओरडला, “पण एडना, तू कधीच बदलणार नाहीस का? मी कधीच तुझी आशा धरु शकणार नाही का?”

दुःखाने का होईना पण मला असे म्हणावेच लागेल की “नाही जिमी, मी कधीच बदलणार नाही.”

एडनाने डोके झुकवले आणि तिच्या मांडीवर एक लहानसे फूल पडले. अग्नेस जोगिणीचा आवाज आला, “ओहो, नाही.” प्रतिध्वनी आला, “ओहो, नाही.”

त्या क्षणी भविष्यकाळ उघड झाला. एडनाने तो पूर्णपणे बघितला. तिला नवल वाटले. प्रथम तिचा श्वास रोधला गेला. पण तसेही, हे नैसर्गिकच नव्हते का? ती चर्चमध्ये जाणार होती. तिच्या आईवडिलांनी तिने तसे करू नये, म्हणून जीवाचा आटापिटा केला, पण व्यर्थ! जिमीच्या मते मनाच्या अशा अवस्थेत, विचार करता येत नाही. त्याना कसे समजत नाही? जग दुष्ट आहे. फारच दुष्ट! शेवटी तिने तिचे सर्व दागिने इत्यादी तिच्या जिवलग मैत्रिणीला देऊन टाकले -- ती इतकी शांत होती आणि ते हृदयभंग झाल्यामुळे झालेले होते. ती चर्चमध्ये चालली. नाही. एक क्षण. त्या दृष्यातील विलीन बंदरावरील शेवटची संध्याकाळ. त्याला एका विचित्र निरोप्याकडून एक खोके मिळते. त्यात पांढऱ्याशुभ्र फुलांचे झुबके होते का? पण त्यावर नाव नाही की कार्ड

नाही. काहीच कसे नाही? हो. गुलाबांखाली एका शुभ्र हातरुमालात एडनाचा शेवटचा फोटो व त्यावर असे लिहिलेले होतेः

*जग विसरत आहे. जग विसरले.*

एडना एका झाडाखाली शांत बसली आहे. तिने काळे पुस्तक तिच्या हातात घट्ट धरले आहे. चर्चमध्ये प्रार्थनेच्या वेळी वाचले जाणारे, असे ते तिचे पुस्तक आहे. ती जोगीण अँजेलाचे नाव ती घेते आहे. करकर! तिचे सुंदर केस कापले गेले. एक बट जिमीला पाठवायची परवानगी, तिला मिळेल का? हे काही करून, मुद्दाम घडवून आणले आहे. निळया गाउनमध्ये पांढरा केसपट्टा लाऊन अँजेला नन चर्चमधून प्रार्थनाखोलीत जाते आहे. तिच्या उदास डोळयात काही अपार्थिव भाव घेऊन ती प्रार्थनाखोलीतून पुन्हा चर्चमध्ये जाते आहे. तिच्याकडे धावत येणाऱ्या मुलांना ती स्मितहास्य बहाल करते आहे. एक संत! मेणाचा वास येणाऱ्या थंड पॅसेजमधून चालत जाताना तिला ती कुजबुज ऐकू येते. इतर आवाजांपेक्षा प्रार्थनाखोलीत येणाऱ्या पाहुण्यांना नव्या तरुण, सुंदर, जोगिणीबद्दल, तिच्या करुण, असफल प्रेमाबद्दल सांगितले जात आहे, तो आवाज जास्त जोरात ऐकू येतो आहे. “गावात एक मनुष्य आहे त्याचे आयुष्य उध्वस्त झाले आहे -- “

अंगावर फर असलेली एक मोठी, सोनेरी मधमाशी रंगीत फुलझाडाच्या नाजूक फुलावर वाकते, ते हलवते, झोके घेते. ती जेव्हा उडून जाते, तेव्हा ती जणू काही हसते आहे, अशी फडफड करते.

अँजेला जोगीण तिच्याकडे बघून म्हणते, “आता थंडी सुरु झाली.” एका रात्री तिच्या गार खोलीत पहुडलेली असतांना तिला रडण्याचा आवाज येतो. कुणी भटक्या कुत्रा बागेत आलेला असावा. मांजराचे पिल्लू, मेंढी -- किंवा जो कुणी छोटा प्राणी असेल तो! त्याच्या आवाजाने, झोप न येणारी जोगीण उठते. पांढऱ्या बर्फात थंडीने थरथरत पण न घाबरता, बाहेर जाऊन ती त्या प्राण्याला आत आणते. दुसऱ्या दिवशी सकाळच्या प्रार्थनेची घंटी वाजते, तेव्हा तिला ताप भरलेला आढळतो -- अस्वस्थ मनाने -- आणि ती कधीच बरी होत नाही. तीन दिवसात सर्व काही संपते. तिला जोगीणींसाठी असलेल्या राखीव जागी पुरले जाते. लाकडी क्रॉस लावला जातो. जोगीण अँजेलाला चिरशांती लाभो --

आता संध्याकाळ झाली आहे. दोन म्हातारे लोक एकमेकांवर रेलून, सावकाश चालत दफनभूमीकडे येत आहेत. ते हुंदके देत, गुडघ्यात वाकून बसतात. “आमची मुलगी! आमची एकुलती एक मुलगी!” मग तिथे काळया कपड्यातील दुसरा एकजण सावकाश येतो. तो तिथे येऊन त्याची काळी टोपी काढतो, तेव्हा एडना थक्क होऊन बघते. तो केस पूर्ण पांढरे झालेला जिमी असतो. फार उशीर! फार उशीर! त्याच्या डोळयातून अश्रू वहात आहेत. आता तो रडतो आहे. फार उशीर! फार उशीर! चर्चच्या अंगणातील पर्णरहित झाडे वारा हलवतो आहे. तो एक भयानक करूण किंकाळी फोडतो.

बागेतील वाटेवर एडनाच्या हातातील काळे पुस्तक, मोठा आवाज करत पडते. ती उडी मारते. तिचे हृदय धडधडते आहे. माझा प्रियकर! नाही, अजूनही फार उशीर झालेला नाही. ती सर्व चूक होती. एक दुःस्वप्न होते. ओहो, ते पांढरे केस! तिने ते असे केले असतील का? नाही. तिने हे केलेले नाही. अरे देवा! किती हा आनंद! ती तरुण, स्वतंत्र आहे. कुणालाच तिचे गुपित माहिती नाही. जिमी व तिच्यासाठी अजून सर्व काही शक्य आहे. त्यांनी ठरवलेले घर बांधणे, अजूनही शक्य आहे. तो पाठीमागे हात गुंफून उभा असलेला प्रामाणिक मुलगा, अजूनही झुडुपाला गुलाबपुष्पे येण्याची आशा करतो आहे. त्याची छोटी बहीण तिथे थडग्यात चिरनिद्रा घेत असलेली! -- एडनाने तिचे दोन्ही हात पसरले, जणू काही हवेतून लहानसे प्रेम तिच्याकडे उडत आले. बागेकडे, झाडांवरील दंवाच्या थेंबांकडे, निळया आकाशात उडणाऱ्या निळया कबुतरांकडे आणि चर्चच्या अरुंद खिडक्यांकडे बघत तिला समजले, की आता शेवटी तिच्या आयुष्यात पहिल्यांदाच –- हे काय होते आहे? तिने अशी भावना कधीच अनुभवली नव्हती. तिला कळले की प्रेमात पडणे म्हणजे काय असते –- फक्त प्रेमात!

The Nechlace by

Guy de Maupassant

# नेकलेस



ती अत्यंत देखण्या व मोहक मुलींपैकी एक होती. पण नशिबाच्या फटकाऱ्याने अशा कुटुंबात जन्माला आली होती, की ज्याना नेहमी दुय्यम स्थान होते.

तिला समजून घेईल व तिच्या प्रेमात पडून लग्न करेल, असा कुणी पैसेवाला व प्रतिष्ठीत माणूस तिला मिळायची आशा नव्हती. कारण तिच्याकडे हुंड्यासाठी पैसा नव्हता. त्यामुळे फार अपेक्षा ठेवणे शक्य नव्हते. मग तिने सरकारी कार्यालयात लहानसा कारकून असलेल्या माणसाशी लग्न करणे पसंत केले.

भपकेबाज ड्रेस घालणे परवडणारे नसल्याने, ती साध्या ड्रेसमध्ये असायची. पण असे लग्न केल्याने ती सारखी दुःखी असे. स्त्रिया त्यांच्या जातीवर किंवा पूर्वजांवर अवलंबून नसतात. त्याऐवजी सौदर्य, मोहकता व डौलदारपणा हे त्याची जागा घेतात. त्यांच्या बाबतीत, नैसर्गिक नाजुकपणा, जन्मजात नीटनेटकेपणा आणि स्वतःला बदलण्याची क्षमता असल्यामुळे, त्या उच्चभ्रू अभिजनांमध्ये व खानदानी स्त्रियांमध्ये सामील होऊ शकतात. तिचा जन्म चैनीसाठी व आयुष्य उपभोगण्यासाठी झालेला आहे, अशी तिची पूर्ण खात्री होती. तिच्या घराच्या तुटक्या फुटक्या, खराब भिंती, जुने फर्निचर, लोंबकळणारे कपडे व गबाळा परिसर पाहून, तिला दुःख होई. तिच्या परिस्थितीतील इतर बायकाना जे जाणवत नसे, ते खूप काही तिच्या लक्षात येत असे व त्यामुळे ती असमाधानी होऊन चिडचिड करे. तिच्या स्वतःच्या घरात नोकराणीसारखी कामे करताना,

उदास होऊन मनातल्या मनात कुढे. तिच्या दोन खोल्यांच्या घरात ती असे सुखस्वप्न रंगवे, की झकपक गालीचे, ब्रॉन्झचे मोठे दिवे, आरामशीर झोपण्यासाठी मऊमऊ गाद्यागिरद्या, सुबक खुर्च्या, गरम शेकोटी, मोठ्या खोल्या, रेशमी पडदे, सुंदर टेबले, त्यावर ठेवलेले किंमती दागिने, ह्या सर्व गोष्टींनी तिचे घर सजले आहे. प्रत्येक बाई हेवा करेल, असे तिचे घर असेल. तिचे लक्ष विचलित करतील असे उल्लेखनीय देखणे पुरुष व जवळच्या मैत्रीणींबरोबर गप्पा मारण्यासाठी, राखून ठेवलेली तिची स्वतंत्र, सुवासिक खोली असेल.

ती जेवायच्या गोल टेबलावर बसे, त्याचे आच्छादन तीन दिवसात धुतलेले नसे. तिचा नवरा समोर बसे आणि सूपच्या भांड्याचे झाकण काढून ओरडे, “काय चविष्ट सूप आहे! माझे अत्यंत आवडते.” पण तिचे विचार महागड्या जेवणाचे, चकाकणाऱ्या चांदीचे, सुबक पडद्यांच्या भिंतींचे, असत. आनंदी उंची व्यक्तिमत्वांनी व परीच्या जंगलातील पक्ष्यांनी भरलेले असत. नवलपूर्ण थाळीत वाढलेले चविष्ट पदार्थ, हळूवार हास्य उमलवणारे कुजबुजलेले बोलणे, ट्राऊटचे गुलाबी मास किंवा गलेलठ्ठ कोंबडीचा पंख असलेले गंमतशीर जेवण तिला दिसे.

तिच्याकडे उंची गाऊन नव्हते, दागदागिने नव्हते. काहीच नव्हते. हे सोडून तिला अजून काही नको असे. तिचा जन्म असल्या वस्तूंसाठी आहे असे तिला वाटे बायकांनी तिचा हेवा करावा, पुरुषांनी तिच्यासाठी तरसावे, असे मोहक व आकर्षक आपण असलो तर किती मजा येईल, असे तिला वाटे. तिला तिच्या शाळेतील एक श्रीमंत मैत्रिण होती. पण काही काळानंतर ती तिला भेटायचे टाळू लागली कारण प्रत्येक भेटीनंतर तिला त्रास होई. अश्रू, खंत, दुःख व निराशा यात ती दिवसभर बुडून राही.

एका संध्याकाळी तिचा नवरा मोठ्या विजयी मुद्रेने हातात एक मोठे पाकीट घेऊन आला. तो ओरडला, “हे बघ. तुझ्यासाठी काय आणले आहे.”

तिने घाईने पाकीट फोडले व एक कार्ड बाहेर काढले. त्यावर असे छापलेले होतेः

‘जनसंपर्क मंत्री व जॉर्ज रामपोनेऊ बाईसाहेब हे, मिस्टर लॉयझेल व मॅडम लॉयझेल याना सोमवारी १८ जानेवारीला, त्यांच्या घरी येण्याचे आग्रहाचे आमंत्रण देत आहेत.’

तिच्या नवऱ्याला वाटले, की ती हे बघून खूष होईल पण तिने ते कार्ड टेबलावर भिरकावले व ओरडली,

“याचा मला काय उपयोग आहे?”

“का बर प्रिये, मला वाटले तुला तिथे जायला आवडेल. तू कधीच कुठे जात नाहीस, आणि ही तुझ्यासाठी सुवर्णसंधी आहे. ती मिळवायला मला किती श्रम पडले. प्रत्येकजण त्यासाठी

धडपडत होता. कारकून मंडळींना अगदी थोडी आमंत्रणे होती. तुला तिथे सगळे ऑफीसर्स दिसतील.”

तिने त्याच्याकडे रागाने पाहीले व तक्रारीच्या सुरात म्हणाली, “अशा समारंभासाठी मी काय घालावे, अशी तुझी अपेक्षा आहे?” त्याने त्याचा विचार केला नव्हता. पण तो घाईघाईने बोलला, “तू नेहमी सिनेमाला जाताना घालतेस, तो ड्रेस मला खरच चांगला वाटतो -- “

अकस्मात त्याने पाहिले की त्याची बायको रडत होती. तिच्या गालावरून अश्रू ओघळत होते. तो दुःखी होऊन मोडून पडला. धापा टाकत विचारता झाला, “काय झाले तरी काय?”

तिने आक्रमक होत भावना आवरल्या आणि गाल पुसत थंडपणे म्हणाली, “काही नाही. फक्त एवढेच की माझ्याकडे चांगले कपडे नाहीत. त्यामुळे मी येऊ शकणार नाही. ज्याच्या बायकोकडे माझ्यापेक्षा चांगला ड्रेस असेल, त्या तुझ्या कुणा मित्राला ते कार्ड दे.”

तो फार नाराज झाला.

“आपण बघू, माटील्डा. चांगल्या कपड्याना काय किंमत पडेल, हे मी बघतो. असा ड्रेस, की तो नंतर इतर प्रसंगीपण घालता आला पाहिजे.”

काही क्षण ती विचार करत राहीली. मनात काही हिशेब करत राहीली. छोट्याशा कारकुनाच्या हिशेबाच्या जाणीवांना धक्का लागणार नाही व त्याचा रागावून दिलेला ठाम नकार मिळणार नाही, अशी किती मोठ्यात मोठी रक्कम ती सांगू शकते, असा विचार ती करत होती.

संशयी सुरात ती शेवटी म्हणाली, “मला फारसे माहिती नाही. पण बहुधा चारशे फ्रँक्समध्ये मी भागवू शकेन.”

तो थोडा फिका पडला. येत्या उन्हाळयात रविवारी मित्रांबरोबर, नॅनटेरेच्या जंगलात नेमबाजीला जाण्यासाठी त्याने चारशे फ्रँक्स जमवून ठेवले होते, बरोबर तेवढीच रक्कम ती मागत होती.

पण तो उत्तरला, “ठीक आहे मी तुला चारशे फ्रँक्स देतो. पण तू अगदी छान ड्रेस आण.”

त्या समारंभाचा दिवस जवळ आला. ड्रेस खरेदी झाली. तरी मॅडम लॉयझेल अजून उदास व असमाधानीच होती. एका संध्याकाळी तिच्या नवऱ्याने विचारले, “गेले तीन दिवस तू स्वस्थ दिसत नाहीस. काय झाले आहे?”

ती उत्तरली, “मला काळजी वाटते आहे की मला घालायला काही दागिने नाहीत. साधे पदकही नाही. मला फारच गरीबासारखे वाटेल. त्यापेक्षा तिथे न आलेलेच बरे.”

"तू ताजी फुले माळ. सध्या त्यांची फॅशन आहे. दहा फ्रॅँक्सना ताजी टवटवीत गुलाबाची फुले मिळतात."

तिला पटले नाही.

"नको. श्रीमंत बायकांच्या गर्दीत, गरीबासारखे जाणे म्हणजे अगदी लाजिरवणे ठरेल."

तिचा नवरा ओरडला, "तू किती मूर्ख आहेस! तुझी मैत्रिण मॅडम फॉरेस्टीअरला, तू दागिने उसने देण्यासाठी का विचारत नाहीस? तुला माहिती आहे, की तिच्याकडे नक्की बरेच दागिने असतील."

तिने आनंदाने आरोळी मारली.

"हो. नक्कीच. मला हे सुचले नाही."

दुसऱ्या दिवशी तिने मैत्रिणीला भेटून अडचण सांगितली.

मॅडम फॉरेस्टीअरने कपाटातून दागिन्यांची पेटी काढून तिच्यासमोर धरली.

"माझ्या प्रिय मैत्रिणी, तूच तुला यातील कुठले काय हवे, ते निवड."

मॅडम लॉयझेलने एक मोत्याची माळ, बांगड्या असे काही दागिने आरशासमोर घालून पाहीले.

"तुझ्याकडे अजून काही नाही का?" ती विचारत राहीली.

"हो आहेत की. हे बघ व पसंत कर."

शेवटी तिने काळया मखमली पेटीतील हिऱ्याचा नेकलेस निवडला. तिचे हृदय काळजीने व आनंदाने धडधडू लागले. थरथरत्या हातांनी तिने तो बाहेर काढला. स्वतःच्या गळयात घातला व फार समाधानाने बघत राहीली.

मग शंका घेऊन ती म्हणाली, "तू मला हा नेकलेस उसना देशील का? बाकी काहीही मला नको."

"हो. नक्की."

तिने प्रेमाने उतराई होऊन, मैत्रिणीच्या गळयाभोवती हात टाकले आणि लगेच तो खजिना घेऊन, निघून गेली.

समारंभाचा दिवस उजाडला. मॅडम लॉयझेलचा पूर्ण विजय झाला होता. तिच्या नवीन झगमगत्या ड्रेसमुळे, हास्याने व डौलदारपणाने, ती समारंभातील सर्वात सुंदर स्त्री ठरत होती. ती

आनंदाने फुलून गेली होती. पुरुष तिच्याकडे वळून वळून बघत होते व तिचे नाव काय असे विचारत होते. तिच्याशी ओळख करून घ्यायला धडपडत होते. जोडीने नृत्यासाठी देखील तिला आमंत्रणे मिळत होती. खुद्द मंत्रीमहाशयांचे लक्ष तिने वेधून घेतले.

स्वतःच्या सौदर्याची नशा अनुभवत, जिंकल्याच्या आविर्भावात उजळून व  मौजमजा करत, तिने आनंदाने स्वतःला नाचात झोकून दिले. स्वप्नात असल्यासारखे सुखात न्हाऊन तिचे अंग लवत होते. तिला मान मिळत होता. तिच्यावर स्तुतीचा वर्षाव होत होता. तिच्या सर्व इच्छा शमल्या. बाईच्या हृदयाला अत्यंत प्रिय असलेला पूर्ण विजय तिने प्राप्त केला.

चारच्या सुमाराला ती त्यातून बाहेर पडली. एका निवांत खोलीत इतर तीन माणसांबरोबर तिचा नवरा डुलक्या घेत होता. त्या तीनजणांच्या बायकापण नाचात रंगून गेल्या होत्या.

त्याने तिच्या खांद्यावर थंडीचा कोट टाकला. तो समारंभाच्या ड्रेसपुढे एकदम गबाळा दिसू लागला. स्वतःच्या साध्या कोटाकडे इतर नखरेल बायकांचे लक्ष जाऊ नये म्हणून, मॅडम लॉयझेल प्रयत्न करू लागल्या.

“मी टॅक्सी आणतो. तोपर्यंत तू आत थांब. तुला थंडीवारा लागून सर्दी होईल.” पण त्याचे न ऐकता ती धाडधाड जिना उतरली. ते रस्त्यावर आले पण टॅक्सी दिसेना. लांबवरून हात करत राहीले. शोध घेत राहीले. थंडीने कुडकुडत ते कसेबसे नदीशी आले. शेवटी त्याना पॅरीसमध्ये फक्त रात्री दिसणारी एक जुनी गाडी मिळाली. जसे काही त्या गाड्या दिवसाच्या उजेडात ओंगळ दिसतील, म्हणून बाहेर पडत नसत. त्या गाडीने त्याना रु डे मारट्यर येथील त्यांच्या घरापर्यंत नेले. झोपेच्या अंमलाखाली ते जिना चढून गेले. तिच्यासाठी सगळे संपले होते. तो विचार करत होता. दहापर्यंत ऑफिसात पोचायचे आहे.

तिने नटलेल्या रूपातील स्वतःकडे एक शेवटचा दृष्टीक्षेप टाकला. आरशासमोर कपडे बदलले. पण अचानक ती किंचाळली. हिऱ्याची माळ तिच्या गळयात नव्हती.

अर्धवट कपडे काढताना नवरा बोलला, “ओरडायला काय झाले?”

ती भयानक चेहऱ्याने त्याच्याकडे वळली. “मी – मी -- मॅडम फॉरेस्टीअरचे हिऱ्याचे नेकलेस हरवले.”

त्याने दुःखाने तिच्याकडे पाहीले. “काय? नेकलेस हरवले? अशक्य.”

त्यांनी तिच्या ड्रेसच्या चुण्यांमध्ये, खिशात, सर्व ठिकाणी शोधले पण व्यर्थ.

“नाच संपला, तेव्हा ते तुझ्या गळयात होते का?”

“होते. मी बाहेर आले तेव्हाही होते.”

“त्या रस्त्यावर ते पडले असते, तर आवाज आला असता. नक्की ते टॅक्सीत पडले असेल.”

“हो. मलाही तसेच वाटते आहे. तू टॅक्सीचा नंबर घेतला होतास का?”

“नाही, तू घेतलास का?’

“नाही.”

उदास होऊन दोघांनी एकमेकांकडे बघितले. मिस्टर लॉयझेलने परत कपडे घातले.

“आपण जिथून चालत आलो, तिथे जाऊन बघतो.

तो गेला. अंथरुणापर्यंत जायची व विचार करायचीही ताकद न उरल्याने, ती तिच्या संध्याकाळच्या कपड्यात, शेकोटीच्या उबेशिवाय तिथेच खुर्चीवर लवंडली. सात वाजता तिचा नवरा हात हलवत, परत आला.

त्याने पोलिसांकडे तक्रार गुदरली. वर्तमानपत्रात जाहिरात देऊन नेकलेस सापडवून देणाऱ्यास बक्षिस जाहीर केले. सर्व गाडीवाल्याना विचारले. आशा वाटेल त्या सर्व जागांना, त्याने भेट दिली.

त्याच्या बायकोने दिवसभर तशाच वाईट अवस्थेत, संकटाच्या छायेखाली काढला.

गालफडे आत गेलेला लॉयझेल संध्याकाळी घरी आला. त्याचे सगळे प्रयत्न वाया गेले होते.

तो म्हणाला, “तुला तुझ्या मैत्रिणीला लिहून कळवले पाहीजे. तू असे लिही की त्या नेकलेसचा फासा तुटल्याने ते दुरुस्तीला टाकले आहे. त्यामुळे आपल्याला विचार करायला थोडा अवधी मिळेल.”

त्याने सांगितल्याप्रमाणे, तिने पत्र लिहिले.

एक आठवडा गेल्यावर, त्यांच्या सर्व आशा संपल्या. पाच वर्षाने म्हातारा दिसणारा लॉयझेल म्हणाला, “हिरे भरून देण्यासाठी, आपल्याला काही करावे लागेल.

दुसऱ्या दिवशी नेकलेसची रिकामी पेटी घेऊन ते. ज्याचे नाव पेटीच्या झाकणावर होते, त्या सराफाकडे गेले, सराफाने त्याची नोंदवही तपासून बघितली.

“नेकलेस इथून खरेदी केले नव्हते. मी फक्त पेटी विकली होती.”

हुबेहूब हरवलेल्या नेकलेससारखे नवीन नेकलेस मिळेल, या आशेने ते या सराफाकडून त्या सराफाकडे फिरत राहीले. दोघेही दुःखाने आजारल्यासारखे दिसू लागले.

शेवटी एका दुकानात त्याना हुबेहूब तसे हिऱ्याचे नेकलेस सापडले. त्याची किंमत चाळीस हजार फ्रँक्स होती. सराफाने त्याना ते छत्तीस हजारात देण्याची तयारी दाखवली. त्यांनी सराफाला तीन दिवस ते कुणाला न विकण्याची, विनंती केली. त्यांनी असे करारपत्रक करून घेतले की त्यांचे हरवलेले मूळ नेकलेस फेब्रुवारीपर्यंत मिळाल्यास ते सराफाने त्यांच्याकडून चौतीस हजार फ्रँक्सला विकत घ्यावे.

लॉयझेलकडे वडीलांनी मागे ठेवलेले अठरा हजार फ्रँक्स होते. बाकी उरलेली रक्कम त्याने कर्ज म्हणून घेण्याचा विचार केला. एक हजार फ्रँक्स एका माणसाकडून, पाचशे दुसऱ्याकडून, पाच सोन्याची नाणी इकडून, तीन अजून कुठून, चढ्या व्याजदराने प्रॉमिसरी नोटा, असे काय काय करून पैसे उभे केले. सावकारांशी, पतपेढ्यांशी करार केले. तो या सगळयाची परतफेड कशी करणार हे माहिती नसताना, त्याने त्याचा भविष्यकाळ पणास लावला. भविष्यात होणाऱ्या त्रासाने, दिवाळे वाजण्याच्या भीतीने, त्याचे धाबे दणाणले. रोजच्या गरजेच्या वस्तूंपासून वंचित रहावे लागणे, नैतिक छळ होणे, ही दृष्येही त्याच्या डोळयांपुढे तरळली. अशा तऱ्हेने कसेबसे जमवलेले छत्तीस हजार फ्रँक्स सराफाला देऊन, त्याने नवीन नेकलेस आणले.

जेव्हा मॅडम लॉयझेलने मॅडम फॉरेस्टीअरला नेकलेस परत केले तेव्हा ती म्हणाली, “मला ते कदाचित घालायला लागणार होते, त्यामुळे तू ते दिलेस ते बरे झाले.” पण तिने ती पेटी उघडलीसुद्धा नाही. जर तिने ती उघडली असती तर ती काय म्हणाली असती? कदाचित तिने चोरीचा आरोप केला असता का?

आता मॅडम लॉयझेलला गरीबीचे चटके बसू लागले. तिने ते मुकाट्याने मान्य करून, तिचा वाटा उचलला. इतके भरमसाठ कर्ज फेडायचे होते आणि ती ते फेडणार होती. नोकरांना कामावरून काढून टाकले. ती जागा सोडून ते लहानशा उंचावरील जागेत रहायला गेले. ती घरची सर्व कामे करू लागली. अगदी भांडी घासण्यापासून सर्व काही. कपडे भांडयांच्या कामाने तिची गुलाबी नखे खराब झाली. रस्त्यावरून पाणी भरून आणताना दम लागून, ती प्रत्येक मजल्यावर थांबे. वाणी, भाजीवाला यांच्याशी भावावरून हुज्जत घालून, ती माल घरी आणे. दर महिन्यात काही कर्ज फिटत गेले. काहींची मुदत वाढवून घ्यावी लागली. तिचा नवरा संध्याकाळी, कुण्या व्यापाऱ्याचे हिशेब लिहिण्याचे काम करू लागला. प्रत्येक रात्री कागदांच्या नकला करून देण्याचे काम करून, काही पैसे मिळवू लागला. असे दहा वर्षे चालू राहीले.

शेवटी, सावकारांकडून चढ्या दराने घेऊन फुगत गेलेली व इतर सर्व कर्जे फेडली गेली.

मॅडम लॉयझेल आता म्हातारी दिसू लागली होती. ती आता खरीखुरी गरीब माणसाची बायको शोभत होती, गचाळ, ओबडधोबड व कष्टकरी. कपडे जीर्ण झाले होते. केसांची रया गेली

होती. हात लाल झाले होते. आवाज नाजूक राहीला नव्हता. ती जोर लाऊन फरशी घासत होती. पण तिचा नवरा ऑफिसात असे, तेव्हा ती खिडकीशी बसून, सतत दूर दिसणाऱ्या एका संध्याकाळच्या वेळेचा तिच्या सौदर्याचा व विजयाचा विचार करत असे.

जर आपल्या हातून नेकलेस हरवले नसते, तर आज आपण कशा असतो, काय माहिती? आयुष्य हे किती विचित्र व बदलणारे असते. एखादी गोष्ट तुमचा विनाश होण्यास किंवा प्रगती करण्यास, कशी कारणीभूत होऊ शकते!

आठवड्याच्या कष्टप्रद कामानंतर ती एकदा सहज म्हणून फिरायला गेली. आणि तिला मुलासकट, एक बाई दिसली. तिने मॅडम फॉरेस्टीअरला ओळखले. ती नेहमीसारखी तरुण, सुंदर व आकर्षक दिसत होती. मॅडम लॉयझेलच्या भावना दाटून आल्या. आपण तिच्याशी बोलावे का? का नाही? आता कर्ज फिटले होते. आता तिला सगळी हकीगत का सांगू नये? ती तिच्या जवळ गेली.

“शुभ सकाळ, जिनी.” तिच्या मैत्रिणीने तिला ओळखले नाही. तिला इतक्या जवळीकेने हाक मारणारे कोण आहे, याचे तिला आश्चर्य वाटले.

ती हो नाही करत म्हणाली, “मला वाटते मी तुम्हाला ओळखत नाही. तुमची काहीतरी चूक होत असावी.”

“नाही. मी माल्टीडा लॉयझेल.”

तिची मैत्रीण किंचाळली, “ओहो, माझी गरीब बिचारी माल्टीडा. तू किती बदलली आहेस!”

मी तुला शेवटचे बघितल्यापासून मी खूप हालअपेष्टा सोसल्या. त्याना काही अंतच नव्हता. आणि हे सर्व तुझ्यामुळे.”

“माझ्यामुळे? तुला काय म्हणायचे आहे?”

“तू मला घालायला दिलेले हिऱ्याचे नेकलेस आठवते आहे?”

“हो. मग?”

“ते माझ्या हातून हरवले.’

“मला समजत नाही. ते तू मला परत केलेस.’

“मी तुला परत केले, ते बरोबर त्याच्यासारखे दुसरे होते. आणि गेली दहा वर्षे आम्ही त्याचा त्रास काढत आहोत. आमच्यासारख्या गरीब लोकांना, हे सोपे नाही. पण आता ते सगळे

पार पडले. आता आमच्या डोक्यावरचे ओझे उतरल्याने, मला अगदी सुटका झाल्यासारखे वाटते आहे."

मॅडम फॉरेस्टीअर अवाक झाली.

"म्हणजे तुला असे म्हणायचे आहे की तू मला हिऱ्याचे नेकलेस आणून दिलेस?'

ती दिमाखात निरागसतेने हसत म्हणाली, "आणि तुला ते कधी कळले नाही? ती दोन्ही खूपच एकसारखी होती."


मॅडम फॉरेस्टीअरने तिचे दोन्ही हात करुणेने हातात घेतले. "अग माझ्या आवडत्या गरीब बिचाऱ्या माल्टीडा, माझे नेकलेस तर खोटे होते, हिऱ्याचे नव्हते. त्याची किंमत फार तर पाचशे फ्रँक्स असेल.!"

Leiningen Versus Ants

By Carl Stephenson

# लेइनिन्गेन विरुद्ध मुंग्या





“त्यांनी त्यांचा बेत बदलला नाही, आणि तसे करायचे काही कारण नाही, तर त्या दोन दिवसात तुझ्या लागवडीवर येतील.”

लेइनिन्गेनने शांतपणे रागावलेल्या जिल्हा कमिशनरच्या प्रश्नाला उत्तर न देता, त्याच्याकडे रोखून बघत, कणसाच्या आकाराच्या सिगरेटचा काही सेकंद जोरात झुरका मारला. मग सिगरेट ओठातून काढून तो थोडासा पुढे वाकला. त्याच्या लहान, टोकेरी, करड्या केसांनी, नाकाच्या भोपळयानी व बोलक्या डोळयांनी तो घाणेरड्या म्हाताऱ्या गरुडासारखा दिसत होता.

तो पुटपुटला, “हा तुझा चांगुलपणा आहे. केवळ मला सूचना देण्यासाठी तू एवढे अंतर सायकल मारत आलास. पण तू जेव्हा म्हणतोस, की मी खड्डे खणले पाहिजेत, तेव्हा अर्थात तू माझी चेष्टा करतो आहेस. या माझ्या लागवडीपासून डायनोसर्ससुद्धा मला हाकलून देऊ शकणार नाहीत.”

ब्राझीलियन माणसाने त्याचे नखे वाढलेले वाकडे हात सुजलेल्या बोटांसकट, बेंगरूळपणे हवेत पसरले. तो ओरडला, “लेइनिन्गेन, तू मानसिक रुग्ण आहेस. ते त्यांच्याशी मारामारी करण्यासारखे प्राणी नाहीत -- ते प्राथमिक स्वरूपाचे प्राणी आहेत. ती ‘देवाची करणी’ आहे. दहा मैल लांब व दोन मैल रुंद मुंग्या! मुंग्याच मुंग्या! त्यातील प्रत्येक मुंगी म्हणजे नरकातून आलेला राक्षस. तुम्ही तीनदा थुंकायच्या आत त्या मोठ्या म्हशीला खाऊन तिची फक्त हाडे ठेवतील. मी तुला सांगतो आहे की तू त्याना लवकरात लवकर साफ करून हाकलले नाहीस तर, तुझ्या लागवडीइतकाच स्वच्छ असलेला तुझा सांगाडा सोडून, काहीही शिल्लक रहाणार नाही.”

लेइनिन्गेन मोठ्याने हसला. “देवाची करणी म्हणे! मी काही म्हातारी बाई नाही. त्या माझ्या मार्गातील प्राथमिक स्तरावरील प्राणी असल्या, तरी मी त्यासाठी काही करणार नाही, असा विचार करू नकोस. मी काही मूर्ख नाही. ए म्हाताऱ्या, मी माझी बुद्धी वापरतो. माझ्या मते मेंदू, हा काही दुसरे आंधळे पोट नाही. मला तो कशासाठी आहे ते कळते. जेव्हा मी तीन वर्षांपूर्वी या लागवडीचे आदर्श शेत उभारले, तेव्हा त्यात कायकाय अडचणी येऊ शकतील, याचा विचार केला होता. आता मी प्रत्येक गोष्टीसाठी, अगदी कशाहीसाठी तयार आहे -- तुझ्या मुंग्यांसाठीदेखील.”

ब्राझीलियन जड पाऊलांनी उभा राहिला. सुस्कारा टाकत तो म्हणाला, “माझ्याकडून मी प्रयत्न केला. तुझा हट्ट केवळ तुझ्यासाठीच नाही, तर तुझ्या चारशे कामगारांसाठीही धोकादायक आहे. तुला या मुंग्या माहिती नाहीत!”

लेइनिन्गेन नदीपर्यंत त्याच्याबरोबर गेला. तिथे सरकारी बोट उभी होती. ती निघाली. प्रवाहाच्या खालील दिशेने ती चालू पडल्यावर काळजीने हात हलवले जाऊ लागले. त्याच्या उद्गारांची भीती लेइनिन्गेनला वाकुल्या दाखवू लागली. वळणावर बोट दिसेनाशी होईपर्यंत लेइनिन्गेनला वाटत होते की अजून त्याला विनवणी करणारा हळूवार आवाज ऐकू येतो आहे. “तुला या मुंग्या माहिती नाहीत, मी तुला सांगतो आहे! तुला या मुंग्या माहिती नाहीत.”

पण त्या शेतकऱ्याला हा शत्रू काही नवीन नव्हता. शेती करण्यापूर्वी तो ज्या देशात राहिला होता, तिथे त्याने या भुकेने वखवखलेल्या प्राण्यांना त्यांची अन्न मिळवण्याची मोहीम राबवतांना पाहिले होते. त्याने त्यापासून संरक्षण करायचे उपाय अंमलात आणले होते. त्याची खात्री झाली होती की गंभीर धोक्यापासून बचाव करायला ते अगदी योग्य होते.

तीन वर्षांच्या शेतीच्या अनुभवातून, लेइनिन्गेनने कोरडा पावसाळा व दुष्काळ, पूर व प्लेग पाहिला होता. आणि त्याच्यावर ओढवलेल्या अनेक 'देवाच्या करणी' पाहिल्या होत्या. त्याच्याबरोबर तिथे रहाणारे लोक अशा संकटांविरुद्ध अगदी थोडेच उपाय योजत असत. किंवा काहीच उपाय योजत नसत. लेइनिन्गेनचे आयुष्याचे घोषवाक्य होतेः काही टाळता न येणाऱ्या संकटांवर मात करण्यासाठी, मानवी मेंदू सक्षम असतो, फक्त ती त्याच्या नीट लक्षात यायला हवीत. त्याचे हे तत्व पाळून त्याने अखंड यश मिळवले होते. मूर्ख माणसे अजाणतेपणी व ध्येयहिनतेने खड्ड्यात अडकून पडतात. जेव्हा अचानक परिस्थिती बदलते, अति वेगवान होते किंवा मध्ये अडथळयाच्या भिंती उभ्या रहातात तेव्हा लोक कितीही बुद्धिमान असले तरी गांगरून जातात. आळशी माणूस प्रवाहाबरोबर वहात जाऊन भोवऱ्यात अडकतो. पण अशी संकटे लेइनिन्गेन तरून जातो. बुद्धिमत्ता योग्य दिशेने वळवल्यास, नक्की मनुष्याला त्याच्या नशिबाचा स्वामी बनवते, हे त्याचे विधान खरे होते.

'न धरी शस्त्र करी, गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' अशा कृष्णोक्तीने लेइनिन्गेन आयुष्याशी नेहमी झुंज घेत आला होता. इथे सुद्धा या ब्राझीलियन जंगलात, त्याच्यावर चालून आलेल्या प्रत्येक संकटावर व अडचणीवर त्याच्या मेंदूने मात केली होती. सुसूत्रतेने व लबाडीने, त्याने प्राथमिक अडचणींशी सामना केला होता. मग त्याने आश्चर्यकारक रित्या जोमदार पीक येण्यासाठी, आधुनिक शास्त्रांमधील स्त्रोतांची माहिती करून घेऊन मदत घेतली. आणि आता त्याला विश्वास होता की या विरोध करण्यास अवघड अशा, मुंग्यांच्या संकटातूनही तो तरून जाईल.

तरीही त्याच संध्याकाळी लेइनिन्गेनने त्याच्या कामगारांना जमवले व त्यांच्या कानावर इतर कुणाकडून मुंग्यांच्या संकटाबद्दल जाण्यापूर्वीच, त्याबद्दल सर्व काही सांगितले. बहुतेकजण तिथेच जन्मलेले होते. 'मुंग्या येत आहेत' ही घोषणा त्यांच्यासाठी त्या क्षणी महत्वाची होती. त्याना घाबरवून, आयुष्यापासून पळ काढायला लावणारी होती. पण त्या लोकांचा लेइनिन्गेनवर, त्याच्या शब्दावर, त्याच्या शहाणवर, दृढ विश्वास होता. त्यांनी त्या भयानक लढ्यासाठीच्या त्याच्या कडक सूचना व आज्ञा, त्यांच्या स्वभावातील शांतपणे पाळल्या. लेइनिन्गेनने त्याना समजाऊन सांगितल्याप्रमाणे, जसे काही एक नवा खेळ किंवा शिकार सुरु होते आहे अशा रितीने, ते न घाबरता सज्ज राहिले. मुंग्या खरच शक्तिमान होत्या, पण त्यांच्या मालकाइतक्या नाही. त्याना येऊ दे!

दुसऱ्या दिवशी दुपारी त्या आल्या. स्थिर अथवा त्यावर स्वार असलेल्या घोड्यांमध्ये रानटी अस्वस्थता दिसू लागल्याने, त्या आल्याचे समजले. लांब अंतरावरूनही घोड्यांमधील भीतीचा गंध जाणवत होता. एकाच वेळी अनेक प्राण्यांचे भीतीदायक, रानटी आवाज आले व ते एकमेकांमध्ये मिसळून गर्दी करू लागले. आता शिकार करेनासे झालेले, पण एकमेकांचीच शिकार करू बघणारे महाकाय टापीर, चित्ते, प्युमा, रानमांजरे, चपळ हरिणे, किंकाज्यूंचे कळप, कानात वारे भरलेली गुरे, हे सर्व माना खाली घालून, नाकपुड्या फेंदारत, लोंबकळणाऱ्या माकडांच्यामधून भीतीने ग्रासून जाऊन, ओरडत होते. नंतर गवतांवरचे व झुडूपांवरचे सरपटणारे व उडणारे प्राणी, उंदीर, खारी, पाली व सापही त्यांना येऊन मिळाले.

पाण्याने भरलेल्या खड्ड्यांच्या उजवीकडे व डावीकडे गोंधळलेले हे सर्वजण टेकडीखालून शेताकडे निघाले. पुढे नदीच्या दिशेनी घुसाघुशी करत जात जात, शेवटी नदीच्या काठावर दिसेनासे झाले.

हे पाणी भरलेले खड्डे म्हणजे, लेइनिन्गेनने फार पूर्वीच करून ठेवलेली, मुंग्यांच्या आक्रमणाविरुद्धची उपाययोजना होती. शेताच्या तीन बाजूला त्यांची योजना केलेली होती. ते खड्डे बारा फूट रुंद पण जास्त खोल नाही, असे होते. ते कोरडे होत तेव्हा ते मनुष्याला किंवा प्राण्याला फक्त थोडा अडथळा करत. खड्डयांची सुटी टोके नदीला जाऊन मिळत. नदी म्हणजे उत्तरसीमा होती. ती शेताची चौथी बाजू होती. शेताच्या मध्ये असलेल्या घराजवळ लेइनिन्गेनने धरण बांधले होते जेणेकरून, नदीचे पाणी वहात येऊन खड्डे पाण्याने भरले जात.

त्यामुळे आता धरण उघडले की तो शेताच्या तीन बाजू पाणी असलेल्या खड्ड्यांनी तर चौथी बाजू नदीमुळे तो संरक्षित करू शके. जशी काही ती शेतजमीन म्हणजे मध्यपूर्व काळातील भोवती तटबंदीचे खंदक असलेले गावच होते. लेइनिन्गेनने विचार केला, “मुंग्या पूल बांधण्याइतक्या हुशार असतील तरच त्याना शेतातील पिकाजवळ जाता येईल.”

बारा फूट रुंद खड्डा सुरक्षितता पुरवत होता. पण मुंग्या यायच्या आत लेइनिन्गेनने त्यात अजून सुधारणा केली. खड्ड्यांची पश्चिम बाजू चिंचेच्या झाडांनी व्यापलेली होती. आणि झाडांच्या काही लांब फांद्या खड्ड्यांतील पाण्यापर्यंत पोचत होत्या. लेइनिन्गेनने त्या अशा वाकवल्या की मुंग्याना शेतात प्रवेश करता येणार नाही. हल्लेखोर मुंग्या परत जाईपर्यंत, नदीवरील बोटींमधून बायका, मुले व गुरांचे कळप शिपायांच्या मदतीने दुसऱ्या तीरावर सुरक्षितपणे हलवले गेले. ते असुरक्षित होते असे वाटल्याने नव्हे, पण लढणाऱ्यांचा जोम वाढावा म्हणून लेइनिन्गेनने असे केले. त्याने स्पष्टीकरण दिले, “बैल आणि बायका घाबरून आरडाओरडा करू लागतात, तेव्हा बिकट परिस्थिती संकटात बदलते.”

मग त्याने आतील भागाची काळजीपूर्वक पहाणी केली. शेतघर, कोठार व घोड्यांचे तबेले उभे असलेल्या टेकाडाभोवती सिमेंटने बांधून काढलेला लहानसा खंदक होता. त्यात तीन

पेट्रोलच्या टाक्यांमधून पेट्रोल येण्यासाठी पाईप आलेले होते. काही चमत्कार होऊन मुंग्या पाणी ओलांडून आल्याच, तरी ही पेट्रोलची भिंत ओलांडणे त्यांच्यासाठी अशक्य होते, असे निदान लेइनिन्गेनचे मत होते.

त्याने पाणी भरलेल्या खड्डयांजवळ थोड्याथोड्या अंतरावर त्याच्या माणसांना उभे केले होते. ती पहिली संरक्षक फळी होती. लांबवर दक्षिणेकडे मुंग्या आलेल्या दिसत आहेत, असा निरोप एक शिपाई घेऊन येईपर्यंत, तो आरामात त्याच्या दोरीच्या झुल्यात बसून झोपाळूपणे पाईप ओढत होता.

त्याच्या मालकाचा स्पर्श झाल्याबरोबर त्याची अस्वस्थता विसरणाऱ्या घोड्यावर, लेइनिन्गेन स्वार झाला व घाबरवणाऱ्या मुंग्यांच्या दिशेने सावकाश चालू पडला. दक्षिणेकडील वरच्या बाजूवरील पाण्याच्या खड्ड्यांची ओळ -- सुमारे तीन मैल लांब होती. त्याच्या मध्यभागापासून, सबंध मुलुखाची टेहेळणी करता येत असे. वीस चौरस मैल पसरलेल्या आयुष्यविनाशक मुंग्या व लेइनिन्गेनची बुद्धी, यांच्यातील युद्धाला तोंड फुटण्याचा प्रसंग समोर उभा ठाकण्याची वेळ आलेली दिसत होती.

कुणालाच कधी विसरता येणार नाही असे ते दृष्य होते. जेवढे लांबवर दिसेल तेवढ्या टेकड्यांवर, लांबरुंद गडद हेम घातल्यासारखी मुंग्यांची रांग उतारावरून पूर्वेकडून पश्चिमेकडे व मग खालीखाली, मगरुरपणे, भरभर येत होती. सगळी हिरवी झुडुपे पसरलेल्या सुखावणाऱ्या दृष्यावर, पीक कापणाऱ्या अजस्त्र धारदार यंत्राची सावली पडल्यासारखे दिसत होते. ती झरझर वाढून गडद होत होती व जवळजवळ येऊ लागली होती.

पाण्याच्या अडथळ्यामागे लेइनिन्गेनची माणसे बराच काळ अपेक्षित असलेले संकट प्रत्यक्ष येतांना बघत होती. ती जोराने किंकाळ्या मारत होती व शापवाणी उच्चारत होती. परंतु जसजसे दोघांमधील अंतर कमी होऊ लागले, तसतसे ते गप्प झाले. ते संकट आणणारे सैन्य जवळ येऊ लागलेले पाहून त्यांची त्यांच्या मालकाच्या शक्तीवरील श्रद्धा ढासळू लागली.

लेइनिन्गेन स्वतःलाही काळजी व दुःख करण्यापासून, वाचवू शकत नव्हता. पण न घाबरता शांतपणे, त्या लोकांचे हृदय भंग पावण्यापासून वाचवण्यासाठी, अगदी वेळेत तिथे येऊन दाखल झाला होता. त्याला गिळू पहाणारा भीतीदायक जबडा, त्याच्यापासून फक्त काही अंतरावर होता. एक छोटा, अरुंद खड्डा तो आणि त्याच्या माणसांमध्ये होता. 'तुम्ही तीन वेळा थुकण्यापूर्वी' तुमचा हाडापर्यंत चावा घेतला जाऊ शकत होता.'

तो हे संकट सहज पार करू शकेल, असे त्याच्या बुद्धीने एकदा ठरवले नव्हते का? जर मुंग्यांनी खड्ड्यावर गर्दी करायचे ठरवले, तर त्यांची प्रेते त्यातील काठोकाठ भरलेल्या पाण्यात पडतील. अजून लेइनिन्गेनच्या मेंदूचे आवरण फोडायला वेळ होता. त्या शेतकऱ्याची हनुवटी बाहेर आली. अजून त्या मुंग्यांनी त्याला गिळंकृत केले नव्हते. आणि त्याने अशी काळजी घेतली

होती, की त्या तसे कधीच करू शकणार नाहीत. जोपर्यंत तो विचार करू शकत होता, तोपर्यंत तो मरणाला व सैतानाला धिक्कारू शकत होता.

कूच करणारे सैन्य चाल करून येत होते. माणसांच्या शिस्तशीर सैन्यालाही असे जमले नसते. सरळ रेषेत पुढचे सैन्य हलत होते. मुंग्या खड्ड्यांच्या जवळजवळ येत होत्या. जेव्हा त्याना हेर मुंग्यांकडून अडथळयाचे स्वरूप कळले, तेव्हा सैन्याच्या दोन ओळी इतर सैन्यापासून अलग झाल्या व खड्ड्यांच्या पूर्व व पश्चिम दिशांना विखुरल्या.

हे वळण घेणासाठी सैन्याला एक तास लागला. अर्थात कुठेतरी आत शिरता येईल, अशी आशा त्या मुंग्या बाळगून होत्या.

सैन्याच्या या वळण्याच्या क्रियेमध्ये, मधले व दक्षिणेकडचे सैन्य स्थिर राहिले. मग वेढ्यामधील अंगठ्याएवढ्या लांब, काळसर लाल, लांब पायाच्या मुंग्यांनी त्यांच्या रिकाम्या वेळात, इकडे तिकडे बघणे चालू ठेवले. काही लोकांचे म्हणणे होते की त्यांना दिसते. झुंडीने आलेल्या त्या टक लाऊन, थंड डोळयांनी निरीक्षण करू शकतात. त्यांच्या खालच्या जबड्याला धार असते.

सर्वसामान्य माणसाला अशी कल्पना करणे सोपे नाही, की असा मुंग्यांसारखा प्राणी विचार करू शकेल. पण आता लेइनिन्गेनचा युरोपिअन मेंदू व तेथील मागासलेल्या रेड इंडियन लोकांचा प्राथमिक स्वरूपाचा मेंदू, काळजीने व दुःखाने हे बघून चकित झाले, की किटकांच्या या महापुरातील प्रत्येक मुंगीमध्ये विचारशक्ती आहे. तो विचार होता, खड्डा किंवा खड्डा नाही, तरी आम्ही तुमच्या मासापर्यंत पोचू!

संध्याकाळी चार वाजेपर्यंत ते सैन्य खड्ड्यांच्या शेवटापर्यंत पोचले. परंतु त्याना पुढे नदीच दिसली. काही गुप्त स्वरूपाचा अंतर्गत संदेश शत्रूच्या सर्व पलटणीला पोचला.

खड्डयाशेजारी उभ्या असलेल्या, घोड्यावर बसलेला लेइनिन्गेनला मुंग्यांच्या दूरवर पसरलेल्या, जलद हालचाली दिसत होत्या. काय कारणाने कुणास ठाऊक पण दाटीवाटीच्या दक्षिणेकडील सैन्यावर, या माघार घेण्याचा जास्त परिणाम झालेला वाटत होता. खड्डयावरून मार्ग शोधायचा अयशस्वी प्रयत्न कदाचित मुंग्यांना पिकाशी जाऊ देत नव्हता. जास्त सहजपणे कसला नाश करता येईल, याचा विचार बहुधा त्या करत असाव्यात.

थोड्याच वेळात त्याचा भ्रमनिरास झाला. मुख्य गर्दीपासून लांबच्या दिशेने येणाऱ्या आवाजामुळे त्याने घोड्याला टाच दिली व तो नदीच्या दक्षिण किनाऱ्याने जोरात निघाला. त्याने असे दृष्य पाहिले की त्याचा श्वास रोधला गेला.

खड्ड्यातून उतारावरून पडणाऱ्या पाण्याच्या काळया चकाकीत धबधब्याबरोबर शंभर यार्ड रुंदीचा मुंग्यांचा जोरदार पूर वाहून चालला होता. हजारो मुंग्या अडकलेल्या पण वरवर

वाहणाऱ्या प्रवाहात गटांगळया खात होत्या. त्यांच्या मागून मुंग्यांच्या तुकड्याच्या तुकड्या येत होत्या. त्या त्यांच्या बुडणाऱ्या सहकाऱ्यांवर पडत होत्या. त्याच्या प्रेतांवरुन, त्यांच्या मागील मुंग्या पुलासारख्या उपयोग करून पलीकडे जायच्या विचारात दिसत होत्या.

प्रवाहाने मुंग्यांचा गठ्ठा खड्डयाच्या मध्यभागी वाहून चालला होता. हळूहळू त्यांचे दोन भाग होत होते. आणि मग त्यांच्या जीवनेच्छेशी झगडून त्या बुडून नाहीशा होत होत्या. तथापि पाण्यावर हालचाल करून झगडणाऱ्या शंभर यार्ड रुंदीचा मुंग्यांचा गठ्ठा सावकाशीने दुसऱ्या तीराकडे कूच करत होता. प्रथम त्याना खड्डा मुंग्यांच्या प्रेताने पूर्ण भरावा लागेल व मगच त्याना पलीकडे जाता येईल, हा लेइनिन्गेनचा अंदाज चुकला. त्यांना फक्त एका पायरीसारखा आधार पुरेसा होता. त्या हालचाल करत होत्या, बुडत होत्या. आणि मागून आलेला नवीन मुंग्यांचा गठ्ठा त्यांच्यावर आदळत होता.

लेइनिन्गेनच्या जवळ काही लोक त्याची आज्ञा झेलायला थांबलेले होते. त्याने एकाला धरणाकडे पाठवले. पाण्याचा प्रवाह अजून जोरदार करायची गरज होती. त्यामुळे खड्ड्यात येणारे पाणी वाढले असते. दुसऱ्या शिपायाला फावडे व पेट्रोल फवारायचे पाईप आणण्यासाठी पाठवले गेले. तिसऱ्याला निरीक्षणाच्या जागा सोडून, जे खड्डयाजवळ आहेत पण अजून तितकी भीती नाही, अशा सर्वांना हल्ला झाल्यास तयार रहायला सांगण्यासाठी घोड्यावरून लांबवर पिटाळण्यात आले.

लेइनिन्गेनने अंदाज केला होता, त्यापेक्षा फारच जलद गतीने मुंग्या पलीकडे जाऊ लागल्या होत्या. त्यांच्या मागील सैन्याचा रेटा बसून त्या नदीच्या आतल्या काठाकडे कूच करत होत्या. हल्ल्याचा जोर इतका होता, की खड्ड्यात हळू पडणाऱ्या पाण्याला किंवा त्याच्या तळाशी खेचण्याच्या जोराला तो जुमानत नव्हता. प्रत्येक बुडणाऱ्या मुंगीवरून डझनभर मुंग्या जोराच्या रेट्याने पलीकडे जात होत्या.

अजून काही उपाय अमलात आणायला हवे आहेत, हे लेइनिन्गेनला समजायच्या आत, हल्लेखोर अर्धी वाट पार करून गेले होते. त्याला कबूल करावे लागले की दैव बलवत्तर असल्यामुळेच केवळ एका कडेनेच मुंग्या आत शिरायचा प्रयत्न करत होत्या. जर त्यांनी एकाच वेळेस सर्व खड्ड्यांवरुन आत यायचा प्रयत्न केला असता तर त्याना रोकणे फारच मुश्कील होऊन बसले असते.

आत्ता होती ती परिस्थिती सुद्धा काही फार चांगली होती, असे म्हणता आले नसते. भीतीदायक मरणाची चाहूल जवळजवळ येत असल्याबद्दल लेइनिन्गेन थोडा अनभिद्न्यच होता. जसजशी त्याची बुद्धी व 'देवाची करणी' यातील युद्धाने कळस गाठला, तसतशी सर्वनाशाची सावली लेइनिन्गेनला उदास करू लागली. भव्य व रोमांचक अशा नव्या ऑलीम्पिक खेळांमधील विजेत्यासारखे त्याला इथून जिंकून बाहेर पडायचे आहे, असा निश्चय केल्यासारखे वाटू लागले.

त्याच्या आत्मविश्वासाचा प्रभाव खरच इतका होता, की रेड इंडियन लोकांच्या मनात फक्त एकदोन यार्डावर असलेल्या धोक्याच्या भीतीचा शिरकाव होईना. त्यांची मती कुंठीत झाली. तरीही लेइनिन्गेनच्या देखरेखीखाली ते मोठ्या उत्साहाने नदीकिनारी खड्डे खणू लागले. मातीची मोठी ढेकळे व उकरून काढलेली माती ते चाल करून येणाऱ्या मुंग्यांच्या सैन्यावर टाकू लागले.

आजपर्यंत किटकनाशक व रोगनाशक म्हणून वापरले जाणारे पेट्रोल फवारणारे आयुधदेखील उपयोगात आणले गेले. आधीच मातीची ढेकळे फेकल्याने जेरीस आलेल्या, पुढे पुढे सरकणाऱ्या पापी शत्रूवर, ते उडवले गेले.

या यशस्वी व जोरदार खबरदारीच्या उपायांना मुंग्यांनी, त्यांच्या बचावाच्या पुढील चालीने उत्तर दिले. कीटकांचे ते एकत्र गठ्ठे पलीकडील किनाऱ्यावरून पाण्यात कोसळू लागले. त्याच वेळेस लेइनिन्गेनच्या लक्षात आले की आता मुंग्या अतिशय रुंद आघाडीवर झुंजत आहेत. त्याची खड्डे खणणारी व पेट्रोल उडवणारी माणसे सीमित होती. हे लढाईचे झटपट पर्व, झाकोळून टाकणारे संकट होऊ पहात होते.

एवढी संकटे कमी म्हणून की काय त्या तरंगणाऱ्या काळया गालिच्यावर मारलेली ढेकळे फुटून परत मारणाऱ्यांकडे उडत होती. नदीच्या आतल्या काठाला अंधाराचे पट्टे उमटू लागले होते. ढेकळे किंवा फवारा यांच्या उपयोगानंतरही असे दिसत होते की त्या अजूनही फारच पसरलेल्या होत्या. त्यांच्या संख्याबळाच्या मानाने माणसांची फळी अपुरी पडत होती. सर्व ठिकाणाहून घुसणाऱ्या मुंग्यांसाठी ती कमी ठरत होती. जरी शिपाई वेड्यासारखे शर्थीचे प्रयत्न करत होते तरी त्यांची चढाई क्षणाक्षणाने धोकादायक ठरत होती.

एका माणसाने त्याच्या फावड्याने शत्रूच्या गठ्ठ्यावर हल्ला केला आणि ते फावडे पाण्यातून लवकर बाहेर काढले नाही. क्षणार्धात लाकडी दांडा वर येणाऱ्या किटकांनी भरून गेला. एक शिवी हासडत त्याने ते फावडे खड्ड्यातील पाण्यात टाकून दिले. पण उशीर झाला होता. ते त्याच्या शरीरावर आधीच चढले होते. त्यांनी वेळ फुकट घालवला नाही. त्याना जिथे जिथे उघडी कातडी सापडली तिथेतिथे त्यांनी खोलवर चावा घेतला. त्यांच्यापैकी काही मोठ्या मुंग्यांनी त्यांच्या मागील पायाजवळील नांगीने जळजळणारे व अर्धमेले करणारे विष शरीरात पसरवले. ओरडत, दुःखाने वेडापिसा होत, तो अंगात आल्यासारखे नाचू लागला.

ह्या प्राणघातक हल्ला लक्षात घेऊन -- हो कदाचित हा एकच माणूस -- त्याच्या बाकीच्या माणसांना गोंधळवून टाकेल आणि त्यांचे धैर्य खच्ची करेल, म्हणून लेइनिन्गेनने जखमी माणसापेक्षा जोरदार आवाज काढून जाहीर केले, “अरे मूर्खा, पेट्रोलमध्ये बुडव. तुझे हात पेट्रोलमध्ये बुडव.” तो गरकन वळून खिळल्यासारखा उभा राहिला. त्याने शर्टाचा हात फाडला व त्यावरील मुंग्यांसकट पेट्रोलच्या एका मोठ्या भांड्यात बुडवला. पण तरीही त्या तो भयंकर चावा सोडेनात. दुसऱ्या एका शिपायाला प्रत्येक मुंगीला टिपून सोडवावे लागले.

ही घटना बघून घाबरलेले लोक खड्डयापासून लांब पळू लागले. आता संकटमय किंकाळया, फावड्यांचे दणदणाट आणि मागेपुढे होणारी रानटी हालचाल, असे दाखवत होती की मिळालेल्या वेळाचा मुंग्यांनी पुरेपूर फायदा करून घेतलेला आहे तरी नशिबाने फक्त काही मुंग्याच पलीकडे येऊ शकल्या होत्या. माणसे परत शर्थीचे प्रयत्न करून मातीची ढेकळे मुंग्यांवर फेकू लागली. मध्यंतरीच्या काळात वयस्क रेड इंडियन प्रथमोपचाराचे काम करू लागले. मुंग्या अंगावर चढलेल्याला काही वेळापूर्वी बनवलेले पेय प्यायला दिले. त्याने तो शांत झाला व त्याच्या अंगातले विष उतरू लागले.

लेइनिन्गेनने त्याची, तो उभा असलेली जागा तपासली. अधीर निरीक्षकाने त्याच्या विरुद्ध हजारो अडथळे उभे केले असते. पण या निरीक्षकाने नुसते बघून अंदाज केला -- मुंग्यांच्या सैन्याच्या तुकड्या त्याना अडवणाऱ्या थोड्या लोकांच्या अपुऱ्या प्रयत्नांना न जुमानता, पुढेपुढे येत होत्या. त्यांची चाल मनुष्याच्या मेंदूत स्पष्टपणे नोंदली जात होती.

लेइनिन्गेनने ठरवले होते की तो अगदी मुळापासून लढेल, आणि ते चूक नव्हते. आता खड्ड्यांमधले पाणी वाढू लागले होते. नदीवरील धरण हे घडवून आणत होते. हळूहळू खड्ड्यातील पाण्याची पातळी व शक्ती वाढली. खळखळ वाढून भोवरे तयार होऊ लागले.

पराभवाच्या भीषण जबड्यातून विजयश्री खेचून आणली गेली. उधाण आलेल्या आनंदाचा आरडाओरडा करत शिपाई लोक जोरजोरात ढेकळांचा वर्षाव करत राहिले.

आता पलीकडील तीरावरील वादळ कमी कमी होत, नाहीसे होऊ लागले होते. जणू मुंग्यांच्या लक्षात आले की त्याचे ध्येय गाठणे त्यांना शक्य नाही. त्या उतारावरून सुरक्षित जागी निघाल्या होत्या. खड्ड्यात पडलेल्या सर्व मुंग्या फुकटच नष्ट झाल्या. बुडालेल्या धडपडणाऱ्या हजारो मुंग्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर भोवऱ्यात अडकल्या. तर किनाऱ्यावरील रेड इंडियन लोकांनी पोहून पलीकडील तीरावर पोचलेल्या प्रत्येक मुंगीला ठेचून काढले.

पूर्वेला वळलेल्या खड्ड्यांकडे विखुरलेल्या मुंग्या परत एकसंधपणे जमल्या. दमलेल्या व बधीर झालेल्या त्यांना आता नदीचा प्रवाह ओलांडण्याची शक्ती राहिली नव्हती. वळणाच्या येथील खड्ड्याच्या तोंडावर व नदीत ढेकळे व मातीचा वर्षाव चालूच होता त्यामुळे आता काहीही मागमूस न ठेवता मुंग्या नाहीशा झाल्या.

ही बातमी सर्वदूर पसरली. लवकरच हसऱ्या माणसांची ओळ विजयोत्सव साजरा करत हसतहसत, खड्ड्यानच्या दिशेने कूच करताना दिसू लागली. एकदा त्यांच्यावर नामुष्कीची पाळी येण्याची चिन्हे दिसू लागली होती. पण लेइनिन्गेनच्या सल्ल्याने तो प्रसंग निभावला गेला आणि आता विजयश्रीची माळ त्यांच्या गळयात पडली होती. जणू काही पलीकडील तीरावरून हजारो, लाखो आक्रमक थंड, भुकेलेले डोळे त्यांच्याकडे रोखून बघत, हल्ला करायची वाट बघत, कधी थांबलेले नव्हतेच.

चिंचेच्या झाडामागे सूर्य मावळला व संधिप्रकाश संपून रात्र सुरु झाली. आता मुंग्या पहाटेपर्यंत शांत रहातील, अशी आशा नव्हे तर खात्रीच होती. पण असा प्रयत्न झालाच तर धरणातून पाण्याचा जोरदार प्रवाह खड्ड्यांमध्ये येणे सुरूच होते.

इतका बंदोबस्त केला तरी त्याने, नदीकिनाऱ्यावर त्याच्या माणसांना रात्रभर पहारा देण्यासाठी बसवले होते. तरीही मुंग्या अचानक हल्ला करण्याची शक्यता असल्याचे लेइनिन्गेनला वाटत होते. त्याच्या मोटारीमधून काही माणसांना गस्त घालण्यासाठी ठेवले होते. खड्डयांमधील पाण्याच्या पृष्ठभागावर सतत बॅटरीचा झोत व मोटारींच्या दिव्यांचा झोत पाडणे रात्रभर चालू ठेवले होते.

एवढी सर्व काळजी घेतल्यावर लेइनिन्गेनने जेवण केले व झोपायला गेला. त्याला चांगली झोप लागली नाही. वीस चौरस मैलाच्या, थांबलेल्या, जिवंत सैन्याची त्याला आठवण येत होती. सकाळी खूपच ताजातवाना आणि चपळ लेइनिन्गेन घोड्यावरून खड्ड्यांजवळून फेरी मारत होता. गराडा घालणाऱ्या, न हलणाऱ्या मुंग्यांचा गठ्ठा त्याला दिसला. त्यांच्यातील व शेतामधील पाण्याचा रुंद पट्टा त्याने तपासला. आणि क्षणभर पश्चात्ताप केला, की लढाई एवढ्या लवकर व एवढ्या साधेपणे संपली. सकाळच्या छान उजेडात त्याला आरामशीर वाटत होते. आता मुंग्यांनी शेतात घुसायची काही शक्यता नाही, असे त्याला वाटले. जरी त्यांनी एकदम तिन्ही बाजूनी हल्ला केला तरी पाण्याचा जोरदार प्रवाह त्याना परतवून लावेल. या लढाईचे त्याला फार अप्रूप वाटले -- पण दुर्दैवाने ती आता संपली होती.

त्याने खड्ड्यांच्या पूर्व व दक्षिण दिशेला फेरफटका मारून सर्व काही ठीकठाक असल्याची खात्री केली. चिंचेच्या झाडासमोरील पश्चिम बाजूला तो पोचला आणि इथे इतर लढायांचा जागेपेक्षा शत्रू फार व्यग्र दिसला. खड्ड्याच्या खूप मागील बाजूस, झाडाचे खोड, फांद्या व लोंबणाऱ्या वेली उद्योगी किटकांनी भरून गेल्या होत्या. पण तिथल्यातिथे पाने खाण्याऐवजी त्या सतत पाने तोडून खाली टाकत होत्या. खाली पानांचा मोठा थर तयार झाला होता. नक्कीच त्या इतर सैन्याला खाणे मिळावे म्हणून हे करत होत्या. या शोधाचे लेइनिन्गेनला काही आश्चर्य वाटले नाही. मुंग्या हुशार होत्या, हे त्याला सांगायची गरज नव्हती. काही ठराविक जाती इतर प्राण्यांना दूध देणाऱ्या गाईसारखे, पहारा देणाऱ्या कुत्र्यासारखे किंवा गुलामांसारखे वापरत असत. त्यांची जुळवून घ्यायच्या क्षमतेबद्दल त्याला चांगले माहिती होते. गटासाठी असलेली त्यांची बांधिलकी त्यांच्या शिस्तीतून व बुद्धीमत्तेतून दिसून येत होती. जंगलाबाहेर थांबलेल्या सैन्याला त्या पानांचा पुरवठा करण्याची मोहीम चालू होती. मग त्याच्या एकदम लक्षात आले की हा पानांचा हिरवा पाऊस त्या कशासाठी पाडत आहेत.

डझनावारी श्रमजीवी मुंग्यांकडून प्रत्येक पान ओढले व ढकलले जात होते आणि खड्ड्याचा कडेला आणले जात होते व मग पाण्यात पाडले जात होते. जसे लेइनिन्गेनने त्यांना जवळजवळ येताना पाहिले, तसे चिंचेचे जंगल हळूहळू जवळ येतयेत मुंग्यांच्या घशात जाताना

पाहिले. तरीही ते बघून, तो घाबरला नाही. चेटकिणींनी त्याच्या मरणाचे भविष्यकथन केलेले नव्हते. आणि केले असते तरी तो सुखाची झोप झोपला असता. पण त्याला असे कबूल करणे भाग होते की परिस्थिती कालच्यापेक्षा वाईट होती.

त्याला असे वाटत होते की पूल बांधणे, मुंग्यांसाठी अशक्य आहे -- पण आता हजारोंच्या संख्येने त्या खड्ड्यावर पूल बांधायच्या तयारीने येत होत्या. पानांचे ढीगच्या ढीग उतारावरून खड्ड्यातील पाण्याच्या दिशेने लोटले जात होते. प्रवाहामुळे ती पाने किनाऱ्यापासून लांब ओढली जाऊन मध्यभागी स्थिर होत होती. प्रत्येक पान अनेक मुंग्या वाहून आणत होत्या. यावेळेस त्याच्या निरोप्यांच्या खबरदारीवर लेइनिन्गेनचा विश्वास नव्हता. घोडा चौखूर उधळत, वाटेत प्रत्येक ठिकाणी थांबून जिनवरुन वाकत, लेइनिन्गेन सगळयांना आज्ञा देऊ लागला. "नैऋत्य दिशेला पेट्रोलचे पंप आणा. जंगलाकडे तोंड करून माणसांना उभे करून, प्रत्येकाच्या हातात फावडे द्या." फक्त निरीक्षण करणारी माणसे सोडून बाकी सगळयांना, त्याने संभाव्य धोक्याची जाणीव देऊन लढाईच्या भूमीवर पिटाळले.

काल जिथे मुंग्यांना पाणी ओलांडणे जमले नव्हते, तिथे नंतर तो आला व छोटेसे पण परिणामकारक दृष्य पाहिले. लांबवरच्या टेकडीच्या उतारावरून त्याच्या दिशेने धावण्यापेक्षा एखाद्या मोठ्या प्राण्यासारखी शरीराची चपळ हालचाल करत, एक चार पाय असलेला आकारहीन डोक्याचा काळा पुतळा चालताना अंग थरथरवत व पायाखालील जमीन क्रूरपणे तुडवत, चाल करून येत होता. जेव्हा तो खड्ड्याच्या पलीकडील तीरावर पोचला व लेइनिन्गेनच्या समोर येऊन पडला, तेव्हा त्याला कळले की तो अर्जेन्टिनातील एक महाकाय काळवीट होता. त्याच्या अंगावर मुंग्या ठासून भरल्या होत्या.

ते धूड सैन्याजवळ आणले गेले. नेहमीप्रमाणे प्रथम त्याच्या डोळयांवर हल्ला केला गेला. त्या आंधळयाला ढकलत, क्रूरपणे छळ करत, सरळ त्या आक्रमकांमध्ये आणले गेले. आता त्या पशूवर मुंग्यांनी चोहो बाजूंनी हल्ला चढवून त्याला मरणप्राय यातना दिल्या.

लेइनिन्गेनने त्याच्या रायफलने नेम साधून, त्या प्राण्याची यातनांमधून सुटका केली. मग त्याने त्याचे धड्याळ बाहेर काढले आता जिवंत रहायचे असेल, तर एकही क्षण फुकट घालवून चालणार नव्हते. पण त्याच्या उत्सुकतेला तो लगाम घालू शकला नाही. किती काळ मुंग्या -- त्यांच्या खासगी चिवटपणे तग धरु शकतील? सहा मिनिटांनी त्या काळवीटाची फक्त पांढरी हाडे शिल्लक राहिली. असेच तो स्वतःही दिसेल, त्यापूर्वी -- लेइनिन्गेन थुंकला व घोड्याला धावडवले.

काल तो जसा लढण्याच्या जिद्दीने झपाटला गेला होता, तसे आज नव्हते. त्याऐवजी तो आज थंड व हिंसक हेतू मनात बाळगून होता. तो त्या पिकांचा फन्ना उडवायला टपलेल्यांना, ते जिथून आले त्या नरकात परत पाठवणार होता. कसेही करून. काहीही करून! पण कसे, एवढाच प्रश्न होता. आत्ताच्या परिस्थितीवरून असे दिसत होते, की ते राक्षस त्याला व त्याच्या लोकांना

पृथ्वीतलावरून पूर्णपणे नाहीसे करतील. त्याला शत्रूच्या शक्तीचा अंदाज आला नव्हता. जर त्याला शत्रूला हरवायचे असेल, तर तनमनधन अर्पून काम करायला हवे होते.

त्याने ठरवले की आता जिथे पश्चिमेकडील खड्डा दक्षिणेकडे वळतो, तिथे सर्वात मोठा धोका आहे. तिथे गेल्यावर त्याला, तेथील परिस्थिती भीषण असल्याचे समजले. तिथे पाण्याच्या जोराने पाने एकत्र झाली होती आणि मुंग्यांचा ताफा त्या वळणावर इतका जवळ आला होता की पूल जवळजवळ तयार होत आला होता. अजूनही पेट्रोलच्या व ढेकळांच्या माऱ्याने पूल तयार होऊ शकला नव्हता, हे खरे होते. पण पाण्यात तरंगणारी पाने पूर्वीपेक्षा जोमाने वाढत होती. एक मैल लांबीच्या पाण्यावर हिरवा थर पसरला होता. त्या वळणावर हजारो, लाखोंच्या संख्येने एकमेकांना चिकटलेल्या मुंग्या पुढे सरकू शकत होत्या.

लेइनिन्गेनने घोड्याला टाच मारून धरण गाठले. काठावरील एका चक्राने नदीवरील धरण काम करत होते. त्या चक्रावरील माणसाला लेइनिन्गेनने आज्ञा दिली, "पहिल्यांदा खड्ड्यातील पाण्याची पातळी कमी करून जवळजवळ नाहीशी कर, क्षणभर थांब व नंतर एकदम जोराने पाणी सोड. अशा तऱ्हेने पाण्याची पातळी आधी एकदम खाली जाऊन वर येईल. असे मी पुढची सूचना देईपर्यंत वारंवार करत रहा."

ही युक्ती प्रथम लागू पडली. खड्ड्यातील पाणी खाली बसले. त्याबरोबर पानांचा थरही खाली बसला. त्यावरील मुंग्याही तळाशी गेल्या. काठावरील मुंग्यांचा लोंढाही त्यावर येऊन आदळला. मग खड्ड्यात एकदम जोरदार पाणी आले. मुंग्या त्यात गटांगळया खाऊ लागल्या.

या सतत पाण्याचा प्रवाह कमीजास्त करण्यामुळे, जेमतेम अगदी वेळेवर खड्ड्यावर पूल तयार होणे वाचले. पण त्यामुळे शत्रूसैन्याच्या तीन तुकड्या आतल्या किनाऱ्यावर इकडेतिकडे विखुरल्या गेल्या. त्याना त्यांचे कर्तव्य चांगले माहिती होते व त्यांनी अजिबात वेळ न घालवता ते काम सुरु केले. रेड इंडियन लोकाना त्या कडकडून चावल्या. ते ओरडत सुटले व पटापट त्यांचे कपडे काढून, मुंग्या शोधून त्याना ठेचायला सुरवात केली. नशीबाने त्यांची संख्या फार नव्हती.

परतपरत पाण्याची पातळी कमीजास्त होत राहिली. त्याबरोबर पाने व त्यावरील मुंग्याही वरखाली होत राहिल्या. परत एकदा पातळी अगदी तळापर्यंत गेली. पण यावेळेस दमलेला शत्रू निरर्थकपणे मरणाच्या लाटेची वाट बघत राहिला. पण पाण्याचा जोरदार प्रवाह येईचना. लेइनिन्गेनला संकटाची कल्पना आली. धरणाच्या येथील मशिनमध्ये काही बिघाड झाला असावा. मग धापा टाकत एक शिपाई ओरडत आला, "ते बंद पडले आहे."

जंगलाच्या बाजूकडील संरक्षक फळीच्या येथील मुंग्यांचा वेढा जास्त गर्दीचा होऊ लागला. जंगलाच्या पलीकडील सैन्य काही फसव्या कृती करत असल्यासारखे दिसत होते. इथे लेइनिन्गेनची माणसे कमी व विखुरलेली होती. जो तो घाईने दक्षिणेकडे पळत होता. धरणावरील माणसाने खड्ड्यातील पाण्याची पातळी एकदम खोल केली, तेव्हा खड्ड्यातील मुंग्या आदल्या

दिवसाप्रमाणे, सरळ वर चढून यायचा प्रयत्न करू लागल्या. खड्ड्यात अशक्यप्राय मुंग्यांचा गठ्ठा साठला. रेड इंडियन लोकांच्या लक्षात यायच्या आत, त्या खड्डा पार करून आतल्या किनाऱ्यावर आल्या. त्या लोकांच्या किंकाळया धरणावरील माणसांपर्यंत जाऊन पोचल्या. त्याने पाणी सोडण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी, त्याला मुंग्यांनी वेढले. तो जिवाच्या आकांताने पळू लागला.

जेव्हा लेइनिन्गेनला हे समजले, तेव्हा त्याला कळले की आता पीक गाळात गेले. मग त्याने त्या टाळता न येणाऱ्या गोष्टीवर शोक करण्यात, वेळ घालवला नाही. जेव्हा थोडी जरी यशाची खात्री होती, तेव्हा तो पाय रोवून उभा राहिला होता. आता यापुढे विरोध करणे, कुचकामाचे व धोक्याचे होते. त्याने बंदुकीचे तीन बार हवेत उडवले -- हा त्याच्या माणसांसाठीचा आधीपासून ठरलेला परवलीचा, धोक्याचा  शब्द होता. कॉंक्रीटच्या खंदकाच्या आतील गोलाकारात ताबडतोब येण्याचा तो आदेश होता. मग तो घोड्यावरून दौडत शेतघराकडे निघाला.

ती जागा आक्रमणाच्या जागेपासून दोन मैलावर होती . त्यामुळे तिथे मुंग्यांच्या चढाईविरुध्ध संरक्षक फळी उभारण्यासाठी पुरेसा वेळ होता. घराजवळील पेट्रोलच्या तीन मोठ्या टाक्यांपैकी एक, खड्डयांजवळील लढाईच्या वेळी केलेल्या सततच्या पंप फवारणीमुळे, जवळजवळ अर्धी रिकामी झाली होती. त्यातील उरलेले पेट्रोल जमिनीखालील पाईपने शेतघराच्याभोवती असलेल्या कॉंक्रीटच्या खंदकात आणले गेले.

लेइनिन्गेनची माणसे दोन तीनच्या गटाने, हळूहळू त्याच्यापर्यंत पोचली. त्यातील बरीचशी अर्थात शांत आणि बेफिकीर असल्याचा आव आणत होती. तरी त्यांच्या अधीर दृष्टीक्षेपांनी व चढलेल्या भुवयांनी त्यांचा खोटेपणा समजत होता. हे अगदी सहज कळत होते की त्यांची लढाईतील जिंकण्यावरील श्रद्धा डळमळीत झाली होती. लेइनिन्गेनने त्याच्या शिपायांना जवळ बोलावले.

त्याने सुरवात केली, “हे बघा मित्रानो, आपण पहिल्या फेरीत हरलो आहोत. पण तरीही अजून आपण त्या भिकाऱ्यांना चिरडू शकतो. तुम्ही काही काळजी करू नका. ज्यांना हे पटत नसेल त्यांनी आपला पगार उचलून चालू पडावे. नदीवर भरपूर बोटी आहेत. आणि त्यांना इथे पोचायला अजून वेळ आहे.”

एकही माणूस हलला नाही.

लेइनिन्गेनने गालातल्या गालात हसून, त्यांची मूक संमती ओळखली. ही आपली सामग्री आहे. तुम्ही उरलेले नाट्य बघणे हुकवलेत, तर ते फार वाईट ठरेल. काय समजलात? एकदा हे पळपुटे सैन्य शेपूट घालून पळाले आहे. आता नवीन राज्यात सर्व ठिकाणी सर्वांना, भरपूर काम असेल व वाढीव पगार असेल. आता पळा व काहीतरी खा. तुम्ही चांगले काम केले आहे.”

लढाईच्या धुमश्चक्रीत सबंध दिवस, घासभरही अन्न न खाता गेला होता. आता तात्पुरत्या तरी मुंग्या दृष्टीबाहेर होत्या आणि 'पेट्रोलची भिंत' भक्कम सुरक्षितता पुरवत होती. भुकेलेली पोटे त्यांचा हक्क गाजवू लागली.

काँक्रीटच्या खंदकावरील पूल काढला गेला. इकडून तिकडून थोड्याफार मुंग्या खंदकापर्यंत पोचल्या. त्यांनी विचारीपणे पेट्रोलकडे पाहिले व घाईघाईने मागे परतल्या. त्या अडथळयाच्या मागे काय भयंकर होते, ते बघून, त्यांची चढाई करण्यातली रुची कमी झाली. पिकाची नासाडी हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. थोड्याच वेळात, अनेक महिने अति श्रम केलेल्या मुंग्यांनी झाडेझुडुपे व मैलोगणती पीक असलेली जमीन भरून गेली. त्या पिकाचा फडशा पाडू लागल्या.

संधीप्रकाश पडू लागला. मुंग्यांची ओळ पेट्रोलचा खंदकाभोवती चालू लागली पण अजून खंदकाच्या कडेपर्यंत आली नाही. लेइनिन्गेनने जागोजागी विजेऱ्या व दिव्यांचे झोत घेऊन शिपाई उभे केले. मग तो ऑफिसमध्ये आला. आणि त्याच्या नुकसानीचा हिशेब करू लागला. बरेच मोठे नुकसान झाले असल्याचे त्याच्या लक्षात आले पण बँकेतील त्याचे पैसे बघता, ते काही फार मोठे नव्हते. आत्ता त्याच्या पिकाचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी त्याने थोड्याच काळात परत जोमाने पीक काढण्याच्या योजनेबद्दल आकडेमोड करून बघितली. त्याच्या लक्षात आले की झालेले सर्व नुकसान त्यामुळे भरून निघू शकते. शेवटी तो समाधानी मनाने झोपायला गेला. उद्या त्याचा फक्त सांगाडा शिल्लक राहिलेला असेल, असल्या कुठल्याही विचाराने विचलित न होता, तो सकाळपर्यंत सुखाने झोपला. सूर्योदयाबरोबर तो उठला व त्याच्या घराच्या सपाट गच्चीवर गेला. डान्टे कवीच्या आगीच्या वर्णनाप्रमाणे प्रत्येक बाजूला मैलोनमैल काळे चकाकणारे मुंग्यांचे थवेच्या थवे पसरले होते. हावरट, आवरण्यास कठीण अशा मुंग्या! फक्त उत्तरेकडील नदी सोडून, जितकी दूरवर दृष्टी जाऊ शकेल तिथपर्यंत काळे गठ्ठेच्या गठ्ठे! नदी ओलांडू न शकलेल्या मुंग्या! नदीच्या सीमारेषेवर त्या चढू शकल्या नव्हत्या. पण फक्त पूर आला तर संरक्षण म्हणून लेइनिन्गेनने पाण्यामध्ये बांधलेल्या नदीकाठच्या उंच दगड जणू रस्त्यांप्रमाणे होता. तुटलेली झाडेझुडपे व जमीनही मुंग्यांमुळे पूर्ण काळी झाली होती.

एवढे विस्तीर्ण शेत खाऊनही त्यांची हाव संपली नव्हती का? साठवलेले धान्य, चारशे माणसे व अनेक घोड्यांकडे, आता त्यांचा डोळे लागले होते.

पहिल्यांदा असे वाटले की पेट्रोलचे साठे उद्देश सफल करतील. हल्लेखोरांना त्यातील धोका कळला. मग त्याच्या कडांवर आंधळेपणाने त्या चढल्या नाहीत. त्याऐवजी त्यांनी एक फसवा बेत आखला. त्या धान्याची साले, वाळलेल्या फांद्या व पाने त्यात टाकू लागल्या. आतापर्यंत फस्त केलेल्यासारखेच त्या, हे पण खाऊ शकल्या असत्या. थोड्या वेळाने कालच्यासारखीच त्यांची मोठी मिरवणूक पश्चिमेकडील चिंचेच्या झाडाची पाने आणू लागली.

पण पेट्रोल पाण्यासारखे हलत नसून स्थिर असल्यामुळे, त्यात टाकलेले सर्व काही तिथल्यातिथेच राहिले. अनेक तासांनी मुंग्या पेट्रोलच्या वरील एका बाजूचा पृष्ठभाग भरून टाकण्यात यशस्वी झाल्या. खरे पाहता, त्या समोरासमोर हल्ला करायला जास्त तयार होत्या.

त्यातील वादळी तुकड्या काँक्रीटच्या खंदकाच्या पृष्ठभागावर उतरल्या व तो ढीग पेट्रोलवर पुढेपुढे पसरवू लागल्या. तो पसरत पसरत त्यांनी खंदकाच्या दुसऱ्या कडेपर्यंत नेला. नंतर आत अडकलेल्या बिचाऱ्या मुंग्यांसाठी त्यांनी वाट करून दिली. या सर्व खटाटोपात, लेइनिन्गेन शांत बसला होता. त्यांना रस घेऊन बघत होता. पण स्वतः जराही हलत नव्हता. शिवाय त्याने त्याच्या माणसाला आज्ञा दिली होती, की मुंग्या काय करतील ते त्याना करू दे. त्याना त्रास देऊ नका. त्यामुळे ते खंदकाभोवती उकिडवे बसून मालकाच्या आज्ञेची वाट बघत होते.

आता पेट्रोलचा पृष्ठभाग मुंग्यांनी भरला होता. काही मुंग्या काँक्रीटच्या खंदकाच्या आतील बाजूच्या भिंतीवर चढून तिथे गर्दी करत होत्या.

लेइनिन्गेन गरजला, “खंदकापासून सगळे बाजूला व्हा.”

त्याच्या बेताची काहीही कल्पना नसलेले लोक घाईने बाजूला झाले. त्याने पुढे वाकून पेट्रोलमध्ये एक दगड फेकला. त्यामुळे तरंगणाऱ्या मुंग्यांचा गालिचा विस्कटला. पेट्रोलचा एक तुकडा दिसू लागला. एक पेटती काडी त्या तेलकट पृष्ठभागावर टाकली गेली. लेइनिन्गेनने मागे उडी मारली. आगीच्या लोळाने मुंग्यांना वेढले.

हे क्षणार्धात तयार झालेले प्रेक्षणीय दृष्य बघून रेड इंडियन लोक आनंदाने वेडे झाले. ते टाळया वाजवून बालनाट्य बघणाऱ्या मुलांसारखे ओरडू, किंचाळू लागले. ते त्यांच्या मालकाजवळ आश्चर्याने जमले. ते जर मालकाला घाबरून त्याचा मान ठेवत नसते, तर त्यांनी त्याला नक्की उचलून उंच धरले असते.

खंदकातील पेट्रोल पूर्ण जळण्यापूर्वी धुराचे ढग आकाश व्यापून राहिले. हळूहळू जाळ कमी झाला. त्या आगीच्या संकटापासून मोठ्या गोलाकारात मुंग्या भक्ष्यस्थानी पडल्या होत्या. बाहेरील काठावरील त्यांचे जळलेले अवशेष दाखवत होते की जाळामुळे खंदकातील मुंग्यांपासून ते जिथे त्यांनी धुमाकूळ घातला होता, त्यातेथील मुंग्यांपर्यंत सर्वांची कत्तल झाली होती.

तरीही मुंग्यांच्या चिकाटीला काही अंत नव्हता. प्रत्येक संकट त्यांना जास्त जास्त धारदार बनवत होते. काँक्रीटच्या खंदक निवला. विझू पहाणाऱ्या ज्वाळा वाऱ्याने भरकटत नाहीशा झाल्या. आता दुसऱ्या टाकीतील पेट्रोल खंदकात पडू लागले -- आणि पुन्हा हल्ला करायला मुंग्या सरसावल्या.

मागचेच सर्व दृष्य परत तसेच घडले. फक्त यावेळी खंदकभर आग पसरायला कमी वेळ लागला कारण राखेच्या ढिगाऱ्यात आधीच्या पेट्रोलचे अंश शिल्लक होते. आताही हजारो मुंग्या आगीत जळाल्या.

परत एकदा त्या मागे हटल्या. परत खंदकात पेट्रोल वाहिले. त्या प्राण्यांना हे कधीच कळणार नव्हते का, की त्यांचे आत्मसमर्पण अतिशय मूर्खपणाचे होते? ते खरेच व्यर्थ होते, नाही का? हो. ते मूर्खपणाचे होते, पण जर पेट्रोलचा पुरवठा अमर्यादित असता तर!

जेव्हा लेइनिन्गेन असा तर्क करण्यापर्यंत पोचला, तेव्हा मुंग्या आत शिरल्यापासून पहील्यांदाच त्याला असे वाटले की, त्याचा आत्मविश्वास डळमळीत होऊ लागला आहे. त्याची त्वचा आक्रसू लागली. त्याची कॉलर सैल पडू लागली. एकदा ते राक्षस खंदकावर आले, की मग तो व त्याची माणसे याना बचावाची काही संधी नव्हती. देवा, जिवंतपणी मुंग्यांकडून खाल्ले जाण्याचे नशिबात आहे की काय?

तिसऱ्यांदा आगीचा लपलपत्या ज्वाळांनी हल्लेखोर तुकड्यांना भाजून नष्ट केले. तरीही काही न झाल्यासारखे अजून अजून सैन्य येतच होते. मध्यंतरीच्या काळात लेइनिन्गेनला त्याची हाडे गोठवून टाकणारा असा शोध लागला की -- आता पाईपमधून पेट्रोल वाहणे बंद झाले होते. तिसऱ्या टाकीमधून पाईपमध्ये येणारा प्रवाह कशामुळे तरी अडवला जात होता -- एखादा साप किंवा उंदीर? काही असले तरी आता टाकीतून खंदकात पेट्रोल आल्याशिवाय मुंग्यांना मारणे शक्य नव्हते.

मग लेइनिन्गेनला आठवले की जवळ असणाऱ्या एका ठिकाणी, वापरात नसलेली दोन आगीची मशीन्स पडली आहेत. सगळा जोर लाऊन शिपायांनी ती तेथून ओढत आणली. त्यांचे पंप टाकीला जोडले. गुंडाळलेली नळी सोडवून ती जोडली. पुढेपुढे येणाऱ्या मुंग्यांच्या एका गठ्ठ्यावर अगदी वेळेवर त्यांनी पेट्रोलचा मारा करून त्यांना खंदकात ढकलले. पुन्हा एकदा सैन्याच्या पलटणीवर पेट्रोल पसरले. पुन्हा एकदा क्षणभर -- आक्रमक पवित्रा घेणे शक्य झाले.

तरीही, हे होणारच होते की हे शेवटचे पेट्रोल म्हणजे फक्त आजचे मरण आणि पराभव उद्यावर ढकलण्यासारखे होते. काही शिपाई गुडघ्यावर बसून प्रार्थना करू लागले. दुसरे काही घाबरून किंचाळत, त्यांच्या बंदुकीतून पुढेपुढे येणाऱ्या सैन्यावर गोळीबार करू लागले. जसे काही त्याना वाटत होते की त्यांच्या दयनीय दुःखामुळे नशीब चांगले वळण घेईल.

काही वेळाने दोनजणांचे मज्जातंतू तुटून मरण ओढवले. लेइनिन्गेनने पाहिले की एक नागडा रेड इंडियन पेट्रोलच्या खंदकाच्या उत्तर दिशेला सरकला. दुसरादेखील ताबडतोब त्याच्या मागे गेला. ते जोराने धावत नदीकडे गेले. पण त्यांचे पलायन त्यांना वाचवू शकले नाही. त्यांनी बोट गाठायच्या आत मुंग्यांनी त्यांच्या पूर्ण शरीराचा ताबा घेतला. छळामुळे गांजले जाऊन आंधळेपणाने त्यांनी खळाळत्या नदीत उडया घेतल्या. तिथे अजून दुष्ट शत्रू टपून बसलेला होता.

श्वास रोधून बघणाऱ्या लोकांना जीवघेण्या किंकाळयांवरुन समजले की मगरींचे करवतीच्या दातांचे जबडे मुंग्यांइतकेच भारी होते आणि त्यांचे भक्ष्य पकडण्यासाठी अति चपळ होते.

ही रक्तरंजित धमकी मिळूनदेखील, जास्त जास्त लोक पळायचा विचार करू लागले. शक्तिपात झाल्यासारखे मरणाची वाट बघत हळू हळू शरीर कुरतडले जाण्यापेक्षा, प्रवाहातील मगरींशी झुंजणे बरे, असा विचार बहुधा ते करत असावेत.

लेइनिन्गेनने त्याच्या मेंदूला जास्तीत जास्त ताण देण्याचा प्रयत्न केला. या राक्षसमुंग्या जिथून आल्या त्या नरकात त्याना परत ढकलून देण्याचा एकही उपाय  शिल्लक राहिला नाही का?

नंतर त्याच्या घबराटीच्या आगडोंबातून एक अदद्‌भुत प्रेरणा उसळली. हो, अजून एक आणि एकच आशा उरली होती. अख्ख्या नदीवर धरण बांधले तर! म्हणजे फक्त खड्डेच भरले जाणार नाहीत तर शेतासकट पूर्ण भूभाग पाण्याने भरून जाईल.

नदीचा पलीकडील किनारा पाणी वाहून जाण्यासाठी फारच उंच होता. नदी आणि शेत यामध्ये लेइनिन्गेनने पाण्यामध्ये बांधलेला नदीकाठचा उंच दगड होता. जिथे घोड्याच्या नालाच्या आकराचे वळण होते, जिथे खड्डे संपून नदी सुरु होत होती, तिथे थोड्या फटी होत्या. तिथून पाण्याला शेतात घुसणे भाग पडले असते. पण त्या उंच दगडाच्या येथे ते त्या उंचीला येईपर्यंत साठून राहिले असते. अर्ध्या तासात किंवा आधीच शेत आणि त्यावरील मुंग्यांची पलटण पुराच्या पाण्याखाली गेली असती.

शेतघर व  त्याच्या आसपासच्या इमारती उंचावर होत्या. पण त्यांचा पाया नदीच्या पाण्यातील उंच बांधीव दगडापेक्षा उंच होता. त्यामुळे पाणी तिथपर्यंत आले नसते. आणि काही उरलेल्या वर चढू पहाणाऱ्या मुंग्यांना पेट्रोल फवारून परतवून लावता आले असते.

हे शक्य होते -- हो, जर धरण बांधले तर! शेतघर व धरण यातील अंतर दोन मैल होते -- दोन मैल पसरलेल्या मुंग्या. त्यातले दोन शिपाई त्यातले फक्त एक पंचमांश एवढेच अंतर त्यांचा जीव धोक्यात घालून पार करू शकले होते. तिथे त्याच्या पाचपट धाऊ शकणारा एखादा धाडसी रेड इंडियन होता का? आणि असलाच तर त्याला परत यायला मिळणे अशक्यप्राय होते.

नाही. एकच गोष्ट होऊ शकत होती. त्याला स्वतःलाच ते करणे शक्य होते. नाहीतरी तो नुसताच बसून होता, तर तो धाऊ शकत होता. शेवटी त्याला मुंग्यांविरुध्ध स्वतःच हातपाय हलवावे लागणार होते.  शिवाय थोडीशी शक्यता अशी होती की कदाचित मुंग्या तेवढ्या शक्तिवान नव्हत्या. साप जसा मोहात पाडून भुरळ घालतो, तसे त्याला त्या मुंग्यांचा पापी काळा गठ्ठा भुरळ पाडत होता.

मुंग्या त्यांचे पूल बांधत होत्या. लेइनिन्गेन खुर्चीतून उठून बसला व ओरडला, “अरे लोकांनो, ऐका.” चेहऱ्यावर मरणकळा पसरलेले लोक हळूहळू धापा टाकत त्याच्याभोवती जमले.

तो ओरडला, “लोकहो, ऐका. तुम्ही त्या भिकार मुंग्यांना घाबरलेले आहात. पण त्यापेक्षा जास्त तुम्हाला माझी भीती वाटत असल्याचे मला दिसते आहे. मला तुमचा अभिमान वाटतो. आपली आयुष्ये वाचवायची अजून एक संधी आहे -- नदीला पूर आणून -- सर्व शेतात पाणीच पाणी करून. तुमच्यापैकी एकजण धरणाशी जाऊ शकेल. पण तो कधीच परत येणार नाही. मी तुमच्यापैकी कोणालाच हे करू देणार नाही. जर मी ते केले तर मी एका मुंगीपेक्षादेखील वाईट ठरेन. नाही. मी हे सर्व सुरु केले आहे व मीच या गाण्याचा शेवट बासरी वाजवून करणार आहे.

मी खड्डा ओलांडताक्षणी पेट्रोलला आग लावा. त्यामुळे पूर यायला काही अवधी लागेल. नंतर तुम्हाला एवढेच करायचे आहे की इथे मी परत येईपर्यंत शांतपणे आरामात बसायचे आहे. हो. मी परत येणार आहे. माझ्यावर विश्वास ठेवा.” -- तो तोंडभरून हसला -- जेव्हा मी माझे ठरवलेले काम संपवेन. तेव्हा मी परत येणार आहे.”

त्याने त्याचे चामड्याचे उंच बूट घातले. हातात मनगटापर्यंत जड मोजे घातले. त्याच्या बुटांच्या, गुडघ्यापर्यंतच्या विजारीच्या, शर्टाच्या हातांच्या व मानेच्या फटींमध्ये पेट्रोलमध्ये बुडवलेल्या चिंध्या कोंबल्या. डासांपासून संरक्षण करणारा, डोळयांशी घट्ट बसणारा गॉगल घातला. त्याला माहिती होते की पहिल्या प्रथम तिथे दिसणाऱ्यावर मुंग्या हल्ला करतील. शेवटी त्याने नाकाकानाची भोके कापूस घालून ठेवली आणि शिपायांना त्याच्या कपड्यांवर पेट्रोल शिंपडण्यास सांगितले.

तो निघाला असताना, वैद्य असलेला म्हातारा रेड इंडियन माणूस त्याच्याजवळ आला. त्याच्याकडे एक आश्चर्यकारक मलम होते. एका पक्ष्याच्या अंड्यानंतरच्या अळी अवस्थेपासून तयार केलेले व मुंग्याना त्याचा वास असह्य असलेले, असे ते मलम होते. खुनी मुंग्यांपासून त्या पक्ष्यांचे संरक्षण त्यामुळे होत असे. त्या म्हाताऱ्याने ते मलम लेइनिन्गेनच्या बुटांना, मोज्यांना व चेहऱ्याला परतपरत लावले.

लेइनिन्गेनला नंतर मुंग्यांच्या विषाचा बधीर करणारा परिणाम आठवला. मुंग्या चावलेल्या शिपायाला दिलेल्या औषधाची बाटली त्या म्हाताऱ्याने लेइनिन्गेनला दिली. त्याच्या कडू चवीची पर्वा न करता त्याने ते पिऊन टाकले. त्याचे मन आधीच धरणावर जाऊन पोचले होते.

तो वायव्य दिशेला जाऊ कागला. एक उडी मारून तो आता मुंग्यांमध्ये आला होता. वेढा घातलेल्या त्या सैन्याला लेइनिन्गेनची मरणाशी चाललेली झुंज बघायला वेळ नव्हता. खंदकाच्या आतल्या काठावर त्या परत चढत होत्या -- गडद रंगाची पेट्रोलची रिंग भीतीदायक रित्या जळत होती. त्या दिवशी चौथ्यांदा आगीचा लखलखाट घामाने निथळणाऱ्या अडकलेल्या माणसांच्या

चेहऱ्यावर आणि लालसर काळ्या त्या छळीक मुंग्यांच्या सैन्यावर दिसू लागला. आता लालनिळ्या ज्वाळा लपलप करत धडाडून उठत होत्या. त्या काय साजरे करत होत्या? चारशे लोकांची की हल्लेखोरांची धडाडून पेटलेली चिता?

लेइनिन्गेन धाऊ लागला. आपल्याला हे अंतर पार करायचे आहे, हा एकच ध्यास, एकच विचार डोक्यात घेऊन, लांब अंतर पार करत राहिला. झाडेझुडुपे दूर करत राहिला. एक सेकंदभराच्या उडीचे अंतर राहिले. मुंग्या असण्याची शक्यता नसलेल्या जमिनीला त्याचे पाय लागले. त्याच्या बुटांना मलम लावलेले असले, कपड्यांवर पेट्रोल शिंपडलेले असले तरी मुंग्या त्याच्यावर हल्ला करणारच होत्या, हे त्याला पुरते कळून चुकले. पण त्याहूनही खात्रीलायक रित्या त्याला हे माहिती होते की त्याला धरणापर्यंत पोचायचे आहे.

तसेही मलमाचा थोडाफार उपयोग झालाच, अर्धे अंतर जाईपर्यंत त्याला कळले की काही मुंग्या त्याच्या कपड्यांखाली व काही चेहऱ्यावर शिरलेल्या आहेत. आपसूकपणे तो त्याना हाकलू लागला. त्यांच्या चाव्याची त्याला थोडीशी कल्पना होती. तो आता धरणाच्या बराच जवळ आला होता -- मधले अंतर हळूहळू कमी होऊ लागले – पाचशे याड्‌र्स उरले -- तीन – दोन -- शंभर याड्‌र्स

मग तो धरणाशी आला. मुंग्यांनी भरलेल्या चक्राला त्याने हात घातला. ते त्याने जेमतेम पकडले तोच मुंग्यांचे सैन्य त्याच्या हातावर व खांद्यांवर चालून आले. त्याने चक्र सुरु केले -- ते फिरण्यापूर्वी मुंग्यांनी त्याच्या चेहऱ्याचा कब्जा घेतला. लेइनिन्गेनने वेड्यासारखा जोर लावला. ओठ घट्ट दाबून ठेवले. जर त्याने श्वास घ्यायला तोंड उघडले असते --

तो चक्र फिरवत राहिला -- फिरवत राहिला. हळूहळू धरण नदीच्या उंचीला आले. खड्डयांमधून आधीच पाणी ओसंडून वहात होते. दुसऱ्या मिनिटाला, मधल्या उंच दगडाच्या येथील फट पाणी भरून काढत होते. शेतात पूर यायला सुरवात झाली.

लेइनिन्गेनने चक्र फिरवणे चालू ठेवले. आता प्रथमच त्याला जाणवले की तो पायापासून डोक्यापर्यंत मुंग्यांनी भरून गेला आहे. कपड्यांवर पेट्रोल शिंपडले होते तरी पूर्ण कपडे मुंग्यांनी भरून गेले होते. त्याचा अंगावरही व चेहऱ्यावरही त्या शिरल्या होत्या. आता त्याने त्याचे काम पूर्ण केले होते आता त्याला त्या कीटकांचे त्याच्या मासात रूतणारे चावे खुपू लागले.

वेदनेने विव्हळत मगरींनी फडशा पाडण्यासाठी त्याने नदीत उडी घेतली का? परतीची वाट त्याच्यासाठी मुश्कील असल्याचे त्याला आधीच माहिती होते. तो त्याच्या जाकीटावरुन व मोज्यांवरुन व रक्ताळलेल्या चेहऱ्यावरून मुंग्या झटकत होता. कपड्यांखालील मुंग्यांना चिरडत होता.

एका मुंगीने गॉगलच्या थोडे खाली चावा घेतला. तो तिला उडवून लावू शकला. परंतु त्या चाव्याची आग आणि दुःख डोळयापर्यंत गेले. त्याला आता आगीच्या डोंबातून पांढरट धुके दिसू लागले. मग तो काही वेळ जवळजवळ आंधळा झाला. आता जर तो घसरून पडला, तर – म्हाताऱ्या रेड इंडियनचे मलम फारसे चांगले दिसत नव्हते. त्याने विषबाधा थोडी कमी झाल्यासारखी वाटली. पण पूर्ण बरी झाली नाही. त्याचे हृदय फुटेल की काय, असे वाटण्याइतके धडधडू लागले. कानशिले गरम झाली. फुफ्फुसांना जणू राक्षसाचा दणका बसला.

मग त्याला दिसू लागले. पण जळणारे खंदकातील पेट्रोल खूपच लांब असल्यासारखे वाटत होते. तिथपर्यंतचे अर्धे अंतरही तो जाऊ शकला नसता. भरभर बदलणारी चित्रे व त्याच्या आयुष्यातले प्रसंग मेंदूच्या एका भागात तरळत होते. तर त्याच्या मेंदूच्या दुसऱ्या भागातील थंड आणि निःपक्षपाती बघ्या मुंग्यांनी व्यापलेले, धापा टाकणारे, अति दमलेले लेइनिन्गेनचे गाठोडे झालेले शरीर दाखवत होते. इतकी भरभर सरकणारी भूतकाळातील दृष्ये, फक्त मृत्युपूर्वीच्या क्षणीच दिसतात.

रस्त्यावरील दगड -- फार दमल्यामुळे तो ओलांडून जाण्याची शक्ती नसलेला -- तो शेतकरी लडखडला व कोलमडला. त्याने उठण्याचा प्रयत्न केला -- तो नक्कीच एका खडकाखाली अडकला होता -- ते अशक्य होते -- एक कणभरसुद्धा हालचाल करणे शक्य नव्हते --

मग एकाएकी त्याला दिसले, त्याच्या डोळयासमोर, खूप ठळकपणे, आगडबंब व मुंग्यांनी भरलेले, मरणयातना भोगत फरफटत जाणारे उजाड दक्षिण अमेरिकेतील काळवीट. सहा मिनिटात त्याची फक्त हाडे उरलेले! अरे देवा, मी असाच मरणार की काय? नाही. नाही. त्याच्या बाहेरील कोणीतरी त्याला पायावर उभे केले. तो लटपटला. तो ओढल्यासारखा परत पुढे चालू लागला.

गरम गोलाकारातून एक भूत प्रकटले व आतील बाजूच्या जमिनीवर निःश्चेष्ट आडवे पडले. क्षणभर त्याला वाटले की तो आगीच्या ज्वाळांमधून उडी मारतो आहे. आयुष्यात प्रथम लेइनिन्गेनची शुध्द हरपली. चकाकणारे डोळे आणि खरचटलेला चेहरा घेऊन तो तिथे पडला. तो मरणकळा भोगून स्मशानातून परत आलेला मनुष्य वाटत होता. शिपाई त्याच्याकडे धावले. त्याचे कपडे ओरबाडून काढले. अंगावरील मुंग्यांना हाकलले. अंग एखाद्या उघड्या जखमेसारखे दिसत होते. काही ठिकाणी नुसती हाडे दिसत होती. त्यांनी त्याला शेतघरात नेले.

जसजसा आगीचा डोंब विझू लागला, तसतशा अमाप, अगणित मुंग्यांच्या जागी पाण्याचा लोंढा दिसू लागला. घोंगावत येणारी नदी तिच्याबरोबर मेलेल्या मुंग्यांच्या सैन्याचा खच ओढत शेतावरून वाहू लागली. खोलगट बशीसारख्या भागात पाणी साचले. ज्या टेकडीवर शेतघर उभे होते, तिथे जाण्याचा मुंग्यांचा वृथा प्रयत्न चालला होता. आगीचा पट्टा त्यांना त्यापासून रोकत होता. त्यामुळे त्या आग व पाणी यामध्ये अडकून पडल्या. त्यांचा पार धुव्वा

उडाला. जिथे दगडाच्या फटीत चिचुंद्री होती तेथील पुढील खड्ड्याच्या तोंडाशी, पाण्याबरोबर वहात आलेले सैन्य नदीत जाऊन पडले व कायमचे नष्ट झाले.

पेट्रोलच्या खंदकावर पाणी आल्याने, तेथील आग आटोक्यात येऊन विझली. पूर वाढू लागला. पाण्यातील फांद्या, लाकडे, पाने यामुळे पाण्याचा वेग कमी झाला. लेइनिन्गेनने पाण्यामध्ये बांधलेल्या नदीकाठचा उंच दगडापर्यंत पाण्याला यायला थोडा वेळ लागला. एकदा पाणी त्यावरून वाहू लागल्यावर उरलेल्या मुंग्यांच्या सैन्याचा खातमा झाला.

टेकाडाच्या पायथ्याशी जिथे मुंग्यांचा वेढा पडला होता त्या जागी पाणी भरले आणि मुंग्यांनी भरलेल्या झाडाझुडुपांवरही ते चढले. काही काळ मुंग्यांच्या सैन्याने कोरड्या जमिनीवर जाण्याचा परतपरत प्रयत्न केला. पण पेट्रोलच्या झऱ्यांनी व बेभान पुराने, त्याना माघार घ्यायला लावली.

लेइनिन्गेन अंथरुणावर पडला होता. पायापासून डोक्यापर्यंत त्याचे शरीर बँडेजमध्ये गुंडाळलेले होते. पोटीस व मलम याच्या उपयोगाने रेड इंडियन लोकांनी रक्तस्त्राव थांबवला. त्याच्या जखमांना मलमपट्टी केली. चेहऱ्यावर एकच प्रश्नचिन्ह घेऊन, ते त्याच्या भोवती होते. तो बरा होईल का? म्हातारा म्हणाला, “त्याला मरायचे नसेल तर, तो मरणार नाही.”

लेइनिन्गेनने डोळे उघडले व विचारले, “सर्व काही ठीकठाक आहे?”

त्याची शुश्रुषा करणारा परिचारक म्हणाला, “त्या मुंग्या नरकात गेल्या.” त्याने त्याच्या मालकाला एक जबरदस्त झोपेची गुंगी येणारे फळ दिले. लेइनिन्गेनने ते गिळले.

तो पुटपुटला, “जरी मी प्रवाहपतित झालो होतो, तरी मी तुम्हाला म्हणालो होतो की मी परत येईन.” तो तोंडभर हसला व डोळे मिटून झोपला.

The birthday

By

Vance Palmer

# वाढदिवस



सूर्योदयापूर्वी जुळयांनी डॅरोला त्याच्या अंथरुणावर येऊन उठवले. त्याने आदल्या रात्री आणलेल्या भेटवस्तूंनी त्यांचे हात भरलेले होते. त्याच्या मेंदूवर अजून अंमल असलेले झोपेचे धुके त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या उशांना टेकून आरामशीर बसलेल्या त्या दोघांच्या किंकाळयांनी विरून गेले.

टिब म्हणाली, “मी रात्री जेव्हा जागी झाले, तेव्हा मी खिडकीतील पडद्यांवर गाडीचा उजेड पडलेला बघितला, तेव्हाच मला तू आल्याचे कळले.”

पीटर किणकिणला, “मला ही.”

टिब म्हणाली, “ए खोटारड्या, तू काहीही पाहिले नाहीस. तू अगदी -- गाढ झोपला होतास.”

पीटरने हेका चालू ठेवला, “नाही. मी दार वाजलेले व कोणीतरी बोलत असलेले ऐकले -- हे बघा डॅड! खरंच वस्तूंना मारेल अशी बंदूक.”

टिब म्हणाली, “माझ्या बाहुलीचे डोळे मी बोटाने काही न करता आपोआप उघडमिट होतात. आणि अजूनही खूप गोष्टी आहेत. तुम्ही बघायच्या आत आम्ही अंधारात झोपेतून उठलो.”

पीटर बोलला, “मी आधी जागा झालो. मी आवाज करत कागद उघडायला लागेपर्यंत टिबला काही माहिती नव्हते.”

एकमेकांचा पायजमा ओढत व रगाच्या घड्यांवर लोळत, आधी कोण जागे झाले यावरून ते भांडत राहिले. बाहुली डॅरोच्या चेहऱ्यावर पडली. पलंगाच्या दुसऱ्या बाजूकडील खोलीतून त्यांच्या आईचा चिडलेला झोपाळू आवाज आला,

“मुलांनो, पुरे झाले. आता परत झोपायला जा बघू. नाहीतर दिवस उजाडण्यापूर्वीच तुम्ही दमून जाल.”

डॅरो परत तेच बोलला, “हो. छोट्या सैतानानो, चला परत झोपायला जा. न्याहारीच्या वेळी तुम्हाला मी अजून काहीतरी गंमत देणार आहे. काही जिवंत, असे.”

टिब म्हणाली, “मला माहिती आहे, एक माकड.”

“काहीतरी काय? मला माकड कुठे मिळणार?”

“मग छोटासा भाऊ?”

दुसऱ्या पलंगावरील अंधाराकडे बघून डॅरो हसला. त्याच्या छातीवर चढून, त्यांनी प्रश्न विचारून त्याला भंडावून सोडले. तो कुशीवर वळला व त्यांना हळूच जमिनीवर ठेवले. त्याने आज्ञा केली, “चला, आता परत झोपायला जा बघू. मी तुम्हाला न्याहारीच्या वेळेपर्यंत काही सांगणार नाही.”

ते दोघे व्हरांड्यातून चालत गेल्यावर तो खिडकीबाहेरील पाण्याचा निळा पट्टा व वाळूचा पिवळा किनारा बघतांना, उठून बसला व सिगरेट पेटवली. हे जरा लवकर होते, पण

काही विशिष्ट झुडुपांचे शेंडे सोनेरी रंगाने झळकत होते. पॅसेजच्या सुरवातीला फिकट पाण्यातील काळ्या बोटीत एक माणूस गळ टाकून मासे पकडत बसला होता. त्याच्या थोडे उजव्या बाजूला वाळूवर शांत आकारात, काचेच्या भासणाऱ्या समुद्रपक्ष्यांची ओळ बसलेली होती. जादू!

खोलीतून मार्गारिट म्हणाली, “मला वाटत नाही, की मी न्याहारीसाठी मी उठू शकेन. मुले नक्की काहीतरी खात आहेत ना, हे बघ -- आई ग, फील, त्या सिगरेटी दे!”

खिडकीतून डोके बाहेर काढत तो म्हणाला, “मी नेहमी ओढतो, त्याच त्या आहेत. काय ग? बरे वाटत नाही का?”

ती बोलली, “सकाळ संपायला येईपर्यंत मला कधीच बरे वाटत नाही.”

त्याला आठवले की जुळयांच्या जन्मापूर्वी पण असेच होते. काळजीचे काही कारण नाही. तशी ती बरी होती. तिची तब्येत बरी नसायचे काही कारण नव्हते. त्याच्या रक्तातून जीवनेच्छा सळसळत होती. त्याने अंघोळीसाठी कपडे काढले. मागील बाजूला करड्या रंगाचा असणारा एक पक्षी त्याच्या इच्छेने इकडून तिकडे उडत होता व पडणाऱ्या पाण्यासारख्या ताज्या व स्पष्ट आवाजात गाणे आळवत होता. कागदपत्रांच्या ढिगाऱ्यातून थोडी मोकळीक हिसकावून घ्यावी तसा काही तो दिवस नव्हता, तर पूर्णपणे त्या पक्ष्याचा असा तो दिवस होता. दिवसभराचे सर्व काम करणारी जेसी, मागच्या पोर्चमध्ये न्याहारीची तयारी करत होती. कपबशा व डिशची किणकिण ऐकू येत होती. त्यापाठोपाठ अंगणातून आनंदाच्या आरोळीचा प्रतिध्वनी आला.

“तो कुत्रा आहे. जिवंत पिल्लू! तो म्हणाला की ते जिवंत आहे.”

त्याने दडवून ठेवलेले गुपित काय असेल, त्याबद्दल जुळे तर्क करू लागले. जेव्हा तो कपडे करून बाहेर आला, तेव्हा पीटर अनवाणी पायांनी गवतावर धावत होता. खेळण्यासाठी आणलेले पिल्लू त्याच्यामागे धावत होते व झोपेतून उठलेली टिब त्याच्यामागे धावत होती.

डॅरो ओरडला, “इकडे बघा, हे पिल्लू तुम्हाला कुठे मिळाले?”

टिब उत्तरली, “ते घराखालील खोक्यात होते. तुम्ही म्हणालात ते आमच्यासाठी आहे. तुम्हाला माहिती आहे, तुम्ही म्हणालात.”

त्या पिल्लाच्या नादात बाकी सर्व खेळणी विसरली गेली. पीटरची रायफल ओल्या गवतात कुठेतरी पडली होती आणि टिबची बाहुली व्हरांड्याच्या शेवटी कुठेतरी पडली होती.

डॅरोने विचार केला की जिवंत प्राण्याइतके दुसरे काहीच मुलांच्या आवडीचे नाही. ते त्याच्यावर मालकी हक्क प्रस्थापित करू शकतात. त्यातील विरोधाभास असा होता, की परतून निघण्यापूर्वीच्या सकाळी शेजारी रहाणाऱ्या माणसाने त्याला सुचवल्यामुळे त्याने उशीरा विचार

करून, ते पिल्लू आणले होते. त्याआधी इतर वस्तू आणण्यावर त्याने वेळ व विचार खर्च केला होता.

न्याहारीच्या वेळी खुर्चीवर त्यांच्या शेजारी ते पिल्लू पाहिजे, असा हट्ट मुलांनी केला आणि कोण त्याला भरवणार त्यावरून, भांडाभांडी सुरु केली. डॅरोने त्यांना भांडू दिले, तो त्यांचा दिवस होता. पिल्लू म्हणजे दोन पडलेले कान, गुलाबी लोकरीच्या गठ्ठ्यासारखी बाहेर आलेली जीभ, पण जिवंत असलेली अशी ती आकारहीन छोटीशी वस्तू होती. न्याहारीनंतर जेव्हा ते समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेले, तेव्हा ते पिल्लू त्यांच्या बाजूने चालत होते व त्यांच्या पायात घोटाळत होते. वाळूत वेडेवाकडे पडून त्यांना ढुशा देत होते. डॅरो हे सगळे सहन करत, त्यांना बघत होता.

ते त्याला ज्या तऱ्हेने विसरले, त्यावरून त्याने झुडूपांमधून मोटारीचे वळण घेताना विचार केला, “पिल्लू त्यांच्यासाठी माझ्यापेक्षा जास्त खरे आहे.”

ती एक नरम, सोनेरी सकाळ होती आणि उन्हाळयातील पाहुणेमंडळी समुद्रकिनाऱ्यावर आली होती. एका हॉटेलमधून मुलींचा गट तिथे येत होता. निळे व तपकिरी ठिपके असलेले रंगीबेरंगी कपडे घालून त्या तिथे वाळूत बागडत होत्या. काही मुले खेकडे मारत होती. वाळूच्या किनाऱ्यावरून आवाज स्पष्टपणे तरंगत येत होते. कुणी बोटीसाठी किनाऱ्यावरून ओरडून सांगत होते. पॅसेजच्या कडेला शांतपणे अर्धा डझन लोक चिरूट ओढत गळ टाकून मासे पकडत होते.

त्यांनी मुख्य किनाऱ्यावर फेरी मारली, तेव्हा त्याना तिथे समुद्रात डुंबणाऱ्यांची गर्दी दिसली. समुद्रात ठराविक अंतरावर माणसे उभी होती. पीटर पिल्लाला वाळूमधील खेकडे खणून काढायला व धावायला शिकवत होता. पिल्लाचे छोटेसे गोल पाय सूर्यप्रकाशात चमकत होते.

डॅरो ओरडला, “ते जीवरक्षक आहेत. ते सराव करत आहेत. इकडे या.”

डॅरोने अर्धे अंतर पार करण्यापूर्वी, मुले त्याच्या खूपच पुढे गेली होती. त्यांच्या बरोबरीने धावतांना, पिल्लू धापा टाकत होते. डॅरोला काहीतरी नको ते घडल्याचा वास आला. चहू दिशांनी माणसे समुद्रकिनाऱ्यावर गर्दी करत होती. ओळीच्या शेवटाकडील गडद आकृती एकाएकी उचलली गेली, तेव्हा महिला ओरडत होत्या व नाटकीपणे हावभाव करत होत्या. ओळीपलीकडे शंभर यार्डावर दोन समुद्रपक्षी घिरट्या घालत होते.

डॅरोने विचार केला, “बहुधा कोणीतरी फार लांब गेले. मला वाटते तो कळ येऊन पडला असावा.”

पांढऱ्या समुद्रकिनाऱ्यावर मुंग्यांच्या गठ्ठ्यासारख्या दिसणाऱ्या गर्दीमध्ये, मुले जाऊन मिसळली. त्यांना गाठण्यासाठी, डॅरो धाऊ लागला. आखूड पँट घातलेल्या दोन माणसांना त्याने ओलांडले.

त्याने त्या माणसांना विचारले, “काय झाले? नुसता सराव चालला आहे का?” पण त्याचा आवाज वाऱ्यावर विरून गेला. ओळीच्या शेवटाकडील बुडणारी आकृती समुद्रात ओढली जात होती. तो जवळ पोचल्यावर त्याने उच्च रवातले आवाज ऐकले. हिरव्या पोहायच्या पोशाखातील एक महिला समुद्राकडे बोट दाखवत होती.

ती किंचाळली, “तिथे ते आहे. मी एक काळी शेपटी बघितली.”

डॅरोची पहिली प्रतिक्रिया होती, ती म्हणजे मुलांना त्यापासून वाचवणे. त्याला संकटाची चाहूल लागली. त्या भीतीचा परिणाम ठळकपणे त्याच्या छोट्या मेंदूत उमटला. तिच्या हातात पिल्लाला घेऊन टिब उभी होती. पण पीटर गर्दीत जाऊन मिसळला होता. डॅरोला अगदी ठिपक्याएवढा त्याचा लाल शर्ट व छानसे केस दिसत होते. वाऱ्यावर तुटकतुटक बोलणे तरंगत होते. एका महिलेला चक्कर येऊन ती वाळूत कोसळली. तिच्या पांढऱ्याफटक पडलेल्या चेहऱ्यावर तिचे केस विखुरले होते. एक मोठा माणूस ओरडला, “मागे व्हा. कृपा करून, थोडा वाव द्या. थोडी हवा येऊ द्या.”

त्या गर्दीत घुसून डॅरोने पीटरची गचांडी धरून त्याला बाहेर खेचले. काळे कुरळे केस असलेला एक माणूस वाळूवर तोंड करून, पडलेला बघून त्याचा गोंधळ उडाला. पण त्याचे सगळे लक्ष मुलांना बाहेर काढण्याकडे लागलेले होते. काही धोका असेल तर तो त्यांच्याबाबतीत नसावा. आज त्यांचा वाढदिवस होता.

त्यांना कडकपणे, आग्रहाने बाजूला घेत तो म्हणाला, ”चला. आपण खडकांच्या पलीकडे वाळूत जाऊन खेळू.” त्यांना यायचे नव्हते. पण त्याने पिल्लाला उचलून घेऊन, त्याना घाई करत, चालायला सुरवात केली. ते फरफटल्यासारखे त्याच्या मागून चालत असतांना त्याच्या लक्षात आले की जे काय झाले होते त्यामुळे ते भारावले गेले आहेत, पण अगदी टोकाचे नव्हे.

टिब म्हणाली, “मी एका महिलेला बोलतांना ऐकले की तो कॉन डेलनी होता.”

पीटरने खात्रीपूर्वक सांगितले, “त्याला शार्क चावला. मी त्याच्या पायाच्या बाजूला रक्त बघितले.”

टिब ओरडली, “तो हॉटेल मध्ये काम करणारा कॉन डेलनी होता. तो बोटीवर गेला होता.”

डॅरोने खडकांच्या पलीकडे एक उबदार जागा निवडली. तिथे समुद्रस्नानाचा किनारा संपत होता. तो बसला. त्याने सिगरेट पेटवली, तेव्हा त्याच्या लक्षात आले की त्याचे हात थरथरत होते. पण त्याच्या स्वतःपेक्षा पहिल्यापासून भीतीचे प्रतिबिंब मुलांच्या डोळयात जास्त प्रकर्षाने उमटलेले दिसत होते. नरम सोनेरी सकाळी अंधारी निरर्थक सावट! झोपवलेला कॉन डेलनी उन्हाने चकाकत होता. हॉटेलच्या अंगणात नेहमी फिरताना दिसणारा, उंच चपळ माणूस!

मार्गारिटबरोबर तो पहिल्यांदा तिथे गेला होता तेव्हा एक वयस्क विधवा दुकान चालवायची, तिचा तो मुलगा होता का?

जवळून जाणाऱ्या माणसाला त्याने विचारले, “आता तो कसा आहे? आधीच्यापेक्षा बरा आहे का?”

त्याला उत्तर मिळाले, “नाही. तो आहे तसाच आहे. ते त्याला हॉटेलमध्ये घेऊन गेले आहेत आणि रुग्णवाहिकेसाठी थांबले आहेत.”

एकाएकी समुद्रकिनारा ओसाड पडल्यासारखा दिसू लागला. टिब आणि पीटर वाळूत जीवरक्षक खेळ खेळत होते. टिब तिच्या पाठीवर सरळ निःचेष्ट पडली होती. तिचा फ्रॉक गुडघ्याशी जमा झाला होता. पीटरने माणसांना जसे रक्तप्रवाह सुरु करतांना पाहिले होते, तसे तो करत होता. हा प्रकार गंभीरपणे चालला होता आणि मग एकदाचे त्यांचे ते जोरजोरात मूर्खासारखे सलग बोलणे संपले. त्याचे डोके एका बाजूला वळवून पिल्लू हा प्रकार उत्सुकतेने बघत होते. त्याची जीभ तोंडाच्या कोपऱ्यातून बाहेर आलेली होती.

निघायची वेळ झाल्यावर डॅरोने त्याना किनाऱ्यावरील गर्दी टाळून, टेकाडाच्या टोकावर नेले.

समुद्रातील बोट बघून, पीटर उद्दीपित होऊन म्हणाला, “ते शार्कला पकडायला बघत आहेत. वयस्क कॉर्नेने मागच्या आठवड्यात एक पकडला होता. तो म्हणाला तो शार्क माणसांना खाणारा होता.”

टिब म्हणाली, “कॉन डेलनी जेसीला भेटायला यायचा. वयस्क कॉर्नेच्या बोटीतून त्याने एकदा तिला फिरायला नेले होते. ख्रिसमसनंतर ती परत घरी जाणार असल्याचे जेसी म्हणत होती.”

लोकांच्या झुंडी दुकानाबाहेर उभ्या होत्या आणि पोस्ट ऑफीसमधील लोक खालच्या आवाजात, शांतपणे बोलत होते. डॅरोला अचानक असे वाटले, की मुलांपेक्षा मार्गारिटला जास्त धक्का बसेल. आणि आत्ताच्या तिच्या अवस्थेत -- ! जुळयांच्या जन्मापूर्वी व्हरांड्यात साप बघून, ती जवळजवळ कोसळलीच होती. दुपारच्या जेवणाच्या वेळी मुले जेव्हा दुर्घटनेसबंधी काही असंबद्ध बोलू लागली, तेव्हा ती कोषात असल्याप्रमाणे, स्वतःच्या संरक्षक विचारातच गुरफटून गेलेली होती. ती गेल्या पंधरा दिवसात घराबाहेर पडली नव्हती. तिच्या बाबतीत तिचे आयुष्य सोडून बाकी काहीही खरे नव्हते.

थोडे हसत ती उद्गारली, “कॉन डेलनी? त्या मुलाला काहीतरी होणार आहे असे मला वाटायचे. तो सतत पाण्यात असायचा आणि तो अनेक आठवडे काहीही काम करत नव्हता. तो जणू काही पाण्यातच रहात होता.”

आणि मग त्याच्या काट्यावर एका वेळी खूप अन्न घेतल्याबद्दल ती पीटरला रागावली.

डॅरोला वाटले तिला डेलनीबद्दल, अनिश्चित स्वरूपाचा काही वाईट असा पूर्वग्रह असावा. जेवणानंतर मुले जेव्हा हिरवळीवर खेळत होती, तेव्हा त्याने तो विषय काढला. त्याने शोधून काढले की डेलनी हा काहीसा स्वार्थी, बेजबाबदार आणि महिलांच्या बाबतीत थोडा असातसा होता. त्याने एकापेक्षा जास्त मुलींना त्रास दिला होता आणि कधीतरी तो जेसीभोवतीदेखील पिंगा घालत होता. तिच्या मधल्या सुट्टीच्या वेळी तो तिच्यासाठी एका कोपऱ्यात उभा असे.

मार्गारेट बोलली, "ती तर एक वरचा मजला रिकामी असलेली मुलगीच आहे. मला तिच्याकडे, तिच्या आईसारखे लक्ष द्यावे लागते. ती स्वप्नरंजन करत बसते आणि मग तिच्या हातून चुका होतात."

आता स्वप्नरंजनाची पाळी डॅरोची होती. ओल्या केसांचा काळा गोळा झालेल्या जखमी मुलाचे व पोहायचा पोषाख घातलेल्या सूर्याच्या उन्हाने समप्रमाणात रापलेल्या त्याच्यावर वाकलेल्या आकर्षक लोकांचे दृष्य डॅरोच्या डोळयासमोर उभे राहिले. त्या मुलाला खरोखरच शार्क चावला होता का? की रक्त हा फक्त पीटरच्या कल्पनेचा खेळ होता? स्वतः जाऊन या प्रकरणाबद्दल माहिती करून घेतले पाहीजे, असे त्याला वाटले. पण त्याचा मुख्य उद्देश होता मुलांना त्यांच्या वाढदिवशी, त्यांचा दिवस बिघडवणाऱ्या कुठल्याही बातमीपासून वाचवणे. त्या सुस्त दुपारी त्याच्या कॅनव्हासच्या खुर्चीत झुलताना, त्याने हिरवळीवर मुलांना भांडतांना ऐकले.

"आपण त्या पिल्लाला रोव्हर म्हणू."

"नाही. असे आपण म्हणायला नको. ते मुलाचे नाव आहे आणि ती कुत्री आहे, असे जेसी म्हणाली होती."

"जेसीला कुत्र्यांमधील काही कळत नाही. ते सगळे नर घोड्यांसारखे तो कुत्रे असतात."

ते गवतात लोळत होते व पिल्लाला त्यांच्या हाताला चावा घेऊन देत होते. त्यांच्या तारस्वरातील आवाजाव्यतिरिक्त इतरत्र शांतता होती. कारण जेसी बाहेर गेली होती आणि मार्गारेट तिच्या खोलीत पहुडली होती. चहा लवकर केला होता. वाढदिवसाच्या समारंभासाठी केक रंगीत मेणबत्त्यांसकट तयार होता. जेव्हा हे सर्व आटपले तेव्हा डॅरो त्याची काठी घेऊन हॉटेलच्या दिशेने बाहेर निघाला.

तिथे सकाळपासूनच गडबड होती. त्याला स्वप्नातून चालल्यासारखे वाटत होते. रहाण्याच्या इमारतीमागे हिरवळीवर टेनिसचा खेळ चालू होता. संधीप्रकाशात एक मनुष्य व एक मुलगी चेंडू शोधत होते. किनाऱ्यावरील लहान घरांमध्ये दिवे लागायला सुरवात झाली होती. ओल्या केसांचा काळा गोळा झालेल्या मुलाचा, समुद्रातून भिजून आलेल्या माणसाचा व मुलांच्या

वाळूतील जीवरक्षक खेळाचा, डॅरो विचार करत होता. जेसी आणि कॉन डेलनी यांच्यात खरेच काही होते का? आणि असेल तर जेसीला त्या घटनेबद्दल लगेच सांगायला नको का?

हॉटेलबाहेर त्याच्या मोटारीवर डोकावणाऱ्या माणसाकडे त्याने चौकशी केली.

त्याला सांगितले गेले, “इथे पोचण्यापूर्वीच तो मृत्यू पावला. डॉक्टर आले होते.”

डॅरोने सावधपणे स्वतःला धक्क्यातून सावरले.

“मला वाटते -- अमानुषपणे त्याचा चावा घेतला जाऊन जखम झाली होती का?"

तो मनुष्य बोलला, “नाही. पण बरेच रक्त वाहून गेले. त्याला पाठीत व मांडीवर चावले गेले होते. आता त्या राक्षसामागे अर्धा डझन तरी बोटींच्या ओळी लागल्या आहेत."

डॅरो क्षणभर टेकाडावर उभा राहिला. पाण्याच्या पलीकडे उगवणाऱ्या चंद्राकडे बघत राहिला. त्याला घरी जायची काही घाई नव्हती. त्याच्या स्वतःच्या शरीरभर विचित्रपणे पसरणाऱ्या धक्क्यापासून त्याला मुलांना व मार्गारिटला वाचवायचे होते. पाण्यावर प्रकाशकिरण नाचत होते. ते हळूहळू फिकट होऊ लागले. समुद्रावर किनाऱ्यापलीकडे तीन बोटी करड्या रंगाचे लटकलेले अंधारी अवघड असे काही ओढायचा प्रयत्न करत होत्या. अंथरुणाशेजारी उभे राहून प्रार्थना म्हणणाऱ्या जुळयांना डोळयासमोर आणून, डॅरोने प्रतिक्रिया दिली, “ -- आम्हाला वाईटापासून वाचव.”

जेव्हा तो रस्त्यावर आला, तेव्हा मार्गारिट गेटशी थांबली होती. चांदण्यात ती सुंदर, गोरीपान दिसत होती. ती खचलेली वाटत होती व जोराचा झटका यायच्या बेतात होती.

“ओहो, फील, तू कुठे गेला होतास? मी फारच घाबरून गेले होते. टिब तीन वर्षाची असताना तिला जशा फिट यायच्या तशी तिला येते आहे की काय, असे मला वाटत होते.”

त्याच्या बाहूत ती थरथरत असल्याचे त्याला जाणवले.

तो विषादाने म्हणाला, “टिब? तिला काय त्रास झाला?”

हताश होऊन मार्गारिट म्हणाली, “ते दोघेही नाराज आहेत. फारच उदासवाणे झाले आहेत. ते कुत्र्याचे पिल्लू! त्यांनी त्याला रस्त्यावर खेळायला नेले आणि ते एका गाडीखाली आले. माझी संध्याकाळ इतकी वाईट गेली. ओहो, फील तू त्यांना परत जिवंत गोष्टी देत जाऊ नकोस -- कधीही.”

तिचा धीर सुटला होता. ती आतून हादरली होती. ते पायऱ्यांकडे जाऊ लागले, तेव्हा डॅरोच्या अंगावर ती रेललेली असल्याने, त्याला तिचे वजन जाणवू लागले. ठप्प घरात उदासीनता भरून राहिली होती. मुलांच्या खोलीत रात्रीचा दिवा जळत होता. जेव्हा तो आत गेला, तेव्हा

त्याला दोघेजण एकाच उशीवर डोके ठेऊन, जसे काही एकमेकांना सहानुभूती दाखवत असल्यासारखे, झोपलेले दिसले. झोपेतही त्यांचे चेहरे पडलेले दिसत होते. पीटरचा हात रजईवर वरचा दिशेने उघडा असा पडला होता. आणि टिबच्या पापण्या रडून तिच्या फुगीर गालांना चिकटून बसल्या होत्या. डॅरो जायला वळला, तेव्हा तिने झोपेत एक हुंदका दिला आणि एक अश्रू तिचा नाकावरून खाली ओघळला.

तो मार्गारेटची समजूत घालत म्हणाला, “आता सर्व ठीक होईल. ते सकाळचा सर्व प्रकार विसरले असणार.”

नंतर तो जेव्हा बाहेर चंद्रप्रकाशात सिगरेट ओढत होता, तेव्हा त्याचे लक्ष गेटजवळ पडलेल्या लहानशा काळया गठ्ठ्याकडे गेले. त्याला असे आढळून आले की ते पिल्लाचे चिरडलेले आकारहीन शरीर होते. त्याने विचार केला ते पुरलेले बरे, म्हणजे सकाळी उठल्यावर मुलांना परत त्या दुःखद आठवणी येणार नाहीत. त्याने ते प्रेत उचलून मागील बाजूस नेले. तिथे झुडुपांच्या सावलीत कुंपणाजवळ त्याला एक आकृती दिसली. जेसी कुंपणावर रेलून, हातात डोके लपवून, तिचे शरीर दगडाप्रमाणे स्थिर ठेऊन उभी होती. डॅरोच्या मेंदूत उष्ण व बुडबुड्यासारख्या पसरणाऱ्या भावनांनी त्या हळूवारपणे उसळेपर्यंत गर्दी केली.

अंधारात गॅरेज मधील फावडे घेताना त्याने भरकटल्यासारखा विचार केला, “असे हे आयुष्य! – "

The Honeymoon

by

Per Hallstrom

# हनिमून



लग्नाच्या आदल्या दिवशी तरुण जोडप्याने नवऱ्यामुलाच्या आईचा निरोप घेण्यासाठी, तिच्या घरी भेट दिली. अनेक वर्षे ती विधवेचे आयुष्य जगत होती आणि आता तिचा सर्वात धाकटा मुलगा, तिला सोडून जाणार होता. कारण लग्नानंतर तो, तिने त्याच्यासाठी रिकाम्या केलेल्या कुटुंबाच्या इस्टेटीवर रहाणार होता. तो परत तिला नक्कीच भेटला असता पण लग्नाच्या समारंभाच्या धामधुमीत व्यवस्थित निरोप घ्यायला, वेळ मिळाला असता की नाही कुणास ठाऊक! शिवाय नवविवाहित जोडप्याला शक्यतोवर कुणाचाही अडथळा न येता

लवकरात लवकर रेल्वे स्टेशनवर पोचायचे होते. त्याना तिथे पोचवायला कुणीही येऊ नये अशी विनंती, त्यांनी सर्वांना केली होती. थोड्या उदास उत्सुकतेने, ते सगळ्या गर्दीपासून त्यांची सुटका होण्याची वाट बघत होते. पण त्यांच्यावरील शुभेच्छांचा व उपदेशाचा वर्षाव संपतच नव्हता.

त्यामुळे आईलाही खरी शांतता नव्हती. जरी कुणी मध्ये येत नव्हते, तरी तिने तिच्या भावनांचे किंवा शब्दांचे प्रदर्शन न करता त्याना त्रास देणे टाळले. बराच वेळ स्वस्थ बसून, ती त्यांच्याकडे बघत राहिली. बहुधा ती तिच्या गतकाळातील तशाच, पण खूप दूर गेलेल्या आठवणींची स्वप्ने बघत होती. “मी यातून आधीच गेलेली आहे. हे पूर्वी एकदा घडले आहे.” अशा ओळखीच्या पण गूढ खात्रीने पछाडले गेल्यासारखी ती दिसत होती. पण तिच्या बाबतीत असा फरक होता, तिला अर्थात ते माहिती होते व ओळखायला सोपे होते, की ती तिच्या हनिमूनबद्दल विचार करत होती.

त्याना एकांत हवा आहे, हे जाणून तरुण मंडळींना, या आनंदोत्सवात हिरीरीने भाग घ्यायला नको वाटत होते. त्यांच्यापेक्षा पूर्णपणे वेगळी असलेली, खरे तर थोड्या कमी दर्जाच्या असणाऱ्या आधीची पिढीने माना उंचावून तुलना करावी, हे त्याना चांगलेच खटकत होते. ते लोक नवपरिणीत जोडप्यांच्या स्विझर्लंड ते इटालीच्या प्रवासाचे बेत मोठ्या आनंदाने व ठामपणे इतक्या जोरात करत होते, की त्यांना थांबवायचे सर्व प्रयत्न वाया जात होते. तरुण जोडप्याला स्वारस्य नसलेल्या काही ठिकाणांची नावे ते ऐकून घेत नव्हते, पण ते तसेच होणार होते.

त्या वयस्क बाईसाहेबांच्या हे लक्षात आले. पण त्यांनी त्या खळाळत्या अरेरावीकडे दुर्लक्ष केले. ते जितका वेळ चालेल तितका वेळ चालू दे, असे म्हणणे कदाचित शहाणपणाचे होते. फक्त दुर्लक्ष केल्या गेलेल्या एकाच बाबीचा त्यांना त्रास होत होता. “जर तुम्ही ईशान्य स्विझर्लंडला जाऊन थंडीच्या कडाक्यात सापडणार असाल तर” -- ती अशा सुरात बोलली, की तिला त्या जागेबद्दल अजून काहीतरी सांगायचे आहे, असे वाटत होते.

“अग प्रिय आई, आम्ही त्याच्या जवळपास कुठेही जात नाही आहोत.”

“हे दयनीय आहे. ती फारच सुंदर जागा आहे. ‘वेसेन रोस्ली’ अजून तिथे असेल तर मी त्याची शिफारस करेन.”

नवरीमुलगी म्हणाली, “काय छान नाव आहे!”

“पण तुम्हाला वाटते तसा त्याचा अर्थ ‘छोटा शुभ्र गुलाब’ नसून, “छोटा शुभ्र घोडा’ आहे. ईशान्य स्विझर्लंडमध्ये अशी नावे सहसा नसतात. हे जर्मन-स्विस लोकांनी दिलेले नाव आहे. तुम्ही तिथे गेलात, तर तुमच्या ते नक्की लक्षात येईल.” ती अशा सुरात बोलली की तिला त्या जागेबद्दल अजून काहीतरी सांगायचे आहे असे वाटत होते.

तरुण लोकांनी तिकडे काही लक्ष दिले नाही. त्यात त्यांना काही दिलचस्पी नव्हती.

“नाही. दुर्दैवाने आम्ही तिकडे जात नाही आहोत.”

तेव्हा तिच्या डोळयात निष्कारण किंचित उदास छटा तरळली. तिने तो विषय व तिचे चित्त विचलित करणारा प्रत्येक विषय सोडून दिला. त्याना तिला काय सांगायचे आहे, त्याकडे तिने तिचे लक्ष वळवले. मग वातावरण खेळकर झाले व तरूण जोडप्याला पाहिजे होते तसा निरोपाचा क्षण, तरल तरीही भावविवश झाला नाही.

पण ते गेल्यावर परत तिच्या ठायी स्वप्नाळू भाव आला व ती पूर्वी उसळलेल्या आठवणींमध्ये हरवून गेली. तिच्या आयुष्यातील उल्लेखनीय घटना ठरणारी, अशी ती एक लहानशी गोष्ट होती. अशा अयोग्य वेळी जर ती सांगायची वेळ आली असती तर तिने ती थोडक्यात पण अर्धवट का होईना नक्की सांगितली असती. पण आता ती स्वतःशीच ती आठवू लागली. विचित्रपणे वातावरणाला छेद देणाऱ्या रंगाने तिने पूर्णत्वाने ती स्वतःलाच कथन केली.

ऐंशीच्या दशकाच्या सुरवातीला ती हनिमूनसाठी ऐन उन्हाळयातही बर्फाच्या भिंती असलेल्या अल्बुला खिंडीतून, ईशान्य स्विझर्लंडमध्ये आली होती. मोठ्या उत्साहाने, परीकथेतल्यासारखी -- सहा घोड्यांच्या गाडीतून पोंगा वाजवत, आली होती. ते एकटेच प्रवासी असल्याने, त्याना गाडीचालकही मिळाला होता. मध्येच गाडी थोडी हळू करायला सांगून ते उडी मारून बाहेर पडून धावत व थोडी उब मिळवत. एकमेकांच्या अंगावर बर्फाचे गोळे उडवत. एकदोनदा ते चेहऱ्यावरही लागले असल्याचे तिला आठवले. तो वितळणारा बर्फ फार गार नसे. पण सूर्याच्या उन्हात चकाकत असे व स्वच्छ विरळ हवेत पटकन त्याचे पाणी होत असे. त्यांच्या डोक्याला काही त्रास असता, तर त्यांनी ते लगेच थांबवले असते. पण तसे काही नव्हते. तिने पाहिलेल्या वीस उन्हाळयांमध्ये ती एवढी आनंदी व तरुण कधीच नव्हती.

त्यांनी लवकर जेवण केले व आनंदाने त्याना फ्रेंच बोलायची सक्ती करणाऱ्या यजमानाला हटकले. तिथे त्यांनी पहिल्यांदा बेव्हर्समधील ‘वेसेन रोस्ली’ हे नाव मनोरंजक फसव्या पद्धतीने त्याच्या मित्राकडून ऐकले. दोन्ही बाजूला गुलाबाची फुलेच फुले असलेली ती छान जागा असल्याचे तिला आठवले.

हनिमूनला आलेले जोडपे म्हणाले, “मग तुम्ही आम्हाला गुलाबी रंगांचे घोडे घेऊन दिले पाहिजेत.” ते म्हणाले, “आमच्याकडे दुसरे कुठले नाहीच आहेत.” तर मग त्या रंगाचे घोडे त्यांनी ते आणले कारण त्या दिवशी दुसरे कुठल्या रंगांचे घोडे त्यांच्याकडे नव्हते.

जेव्हा जोडपे तिथे पोचले, तेव्हा त्यांना ती जागा आल्हाददायक वाटली. जेव्हा लोकांना कळले की ते कुठल्या प्रकारचे पाहुणे आहेत, तेव्हा त्यानी त्यांना सर्वात चांगली खोली दिली. ती हलकाश्या विटकरी रंगाचे छत व भिंती असलेली मोठी खोली होती. खिडकी

उघडल्यावर त्यात संध्याकाळचा सूर्यप्रकाश पडला होता. एका दिशेला शुभ्र हिमाने झाकलेल्या व किंचित गुलाबी छटा असलेल्या शिखरांचे, निळे मुरायगल व लँगार्ड पर्वत दिसत होते. त्यांच्या हॉटेलच्या उजवीकडील दरीतून निघालेले बर्फाचे हिरवट पाणी कुरणांमधून वहात होते. त्या स्वच्छ गावरान पांढऱ्या शुभ्र हॉटेलला अवर्णनीय असा दुधाचा वास होता. सर्व काही नवे व विचित्र तरीही मैत्रीपूर्ण होते.

ते तिथे खूप दिवस राहिले. त्या थंड वातावरणात त्यांनी न दमता, बऱ्याच लांबवरच्या सहली केल्या. जेव्हा ते उंचावर चढून जात, तेव्हा त्यांना त्यांच्यात ताकद व सुदृढतेचा जोम भरल्यासारखा वाटे. जीवन आनंदाने भरल्यासारखे वाटे. एकदा नदीच्या पलीकडील डोंगरावर चढताना, त्यांना सुळक्यांमध्ये दडलेली दरी दिसली. त्यात चकाकणारा झरा व हिरवळीने वेढलेली विलोची झुडुपे दिसली. ते अफलातून असे, काळाचा स्पर्श न झालेले दृष्य होते. ते बराच वेळ त्याचाच भाग असल्यासारखे तिकडे बघत राहिले. मग परतू लागल्यावर त्याना वाटले की तरुण मुले सोडून कुणालाच ही जागा सापडणे शक्य नाही. ते पुढेपुढे जात राहिले नंतर त्या जागेच्या खास आठवणी त्यांच्याबरोबर रेंगाळत राहिल्या.

ते वास्तवाचे घुटके घेत असले, तरी स्वप्नवत जगत होते. जेव्हा त्यांना त्यांच्या जुन्या कौटुंबिक पार्श्वभूमीची आठवण येई, तेव्हा ते आत्ताचे त्यांचे सर्व अनुभव खरेखुरे असल्याचे आठवून त्यांचे स्वागत करत. पायथ्याशी पाइनची जंगले असलेल्या 'पॅलुड मार्चा' या पाणथळ ठिकाणी नवी नवरी गेली, तेव्हा त्यांना अचानक घरी असल्यासारखे वाटू लागले. आणि जेव्हा त्यांनी आसपास व वरती क्रेस्टा मोरा डोंगराकडे पाहिले तेव्हा तो ग्रॅनाईटचा असल्याचे त्याना दिसले. नावाप्रमाणेच तो नवाकोरा होता व त्यांच्याशी बोलत होता. त्यांनी आनंदाने त्याला परत भेट दिली. 'तू, मी आणि आनंद सगळे काही खरे आहे आणि घरी पण आपण आपले आयुष्य आत्तासारखेच एकत्र काढू.' अशा स्वरूपाच्या भावना त्याना जाणवत होत्या.

एक दिवस जेव्हा ते म्युटाज मुरायगलवरून पॅलुड मार्चा या ठिकाणी जाऊ लागले तेव्हा त्यांना त्यांच्या पायांवर मागील बाजूने लहान लहान दगडांचे ढीग घसरत असलेले आढळले. एकमेकांना गूढ शीळ घालत, त्यांनी लपण्यासाठी जागा शोधली. मग त्यांना एक बकऱ्यांचा कळप लागला. त्या बकऱ्या पाळणाऱ्या धनगराने थंडी पळवण्यासाठी, शेकोटी पेटवली होती. ते त्याच्याशी बोलले, तेव्हा त्याचे डोळे विस्फारले गेले व सर्व बकऱ्या त्यांच्याकडे शांतपणे रोखून पाहू लागल्या. त्या दोघांकडून त्यांना एकाच प्रकारचा, प्राचीन युगातील विचित्र अनुभव आला. त्यांनी त्या मुलाला एक नाणे दिले. मुलाने त्यांचे आभार मानून त्यांना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. तो आनंदी व्हावा म्हणून त्यांनी त्याला अजून एक नाणे दिले.

उतारावर चालताना त्यांना पहिल्यांदाच गुलाबाची फुले फुललेली दिसली, त्यामुळे त्या घनगराचे त्यांनी परत आभार मानले. तिला ती फुले हवी होती आणि तिने आनंदाचा अस्फुट

हुंकार काढला. पण तो सरळ उतार इतका धोकादायक होता, की ती ते करू शकत नव्हती. पण तो चालता चालता तिला एक एक फूल तोडून देऊ लागला.

अचानक त्याचा तोल गेल्यासारखे झाल्याने, त्याने त्याच्या मोकळया हाताने एक गुलाबाचे झुडूप धरले. तो हळू आवाजात गंभीरपणे म्हणाला, "घाबरू नकोस. मी फारसा सुरक्षित ठिकाणी उभा नाही. मला घट्ट पाय रोवून उभे रहाण्यासाठी, दुसरी जागा शोधली पाहिजे. पण मी इथून हलायला घाबरतो आहे. मी हा आहे तो आधार सोडला, तर लगेच दुसरा मिळेल का ते माहिती नाही." काही अंतर्गत जाणीवेने अतिशय हळूवारपणे तिने त्याच्या एकंदर अवस्थेचा व किती मोठा धोका आहे, याचा स्पष्टपणे अंदाज घेतला. ते सुळक्याचे टोक होते व खाली दरी होती.

ती म्हणाली, "हलू नकोस. एक मिनिट थांब. मी लवकरच -- "

तिच्या खांद्यावर लांब शाल होती. ती तिने काढली व गुंडाळून तिची दोरी तयार केली. तिच्या आसपास छोटेछोटे पाईन वृक्ष उगवले होते. त्यातील चांगला भक्कम व मुळे खोलवर गेलेला तिने निवडला व त्याला शालीचे एक टोक घट्ट बांधले. दुसरे टोक तिने स्वतःच्या डाव्या मनगटाला सर्व शक्ती लाऊन बांधले. मग वाकून ती त्याच्या एका हातापर्यंत पोचली.

ती बोलली, "मला धर. तू मला जास्तीत जास्त घट्ट धरून ठेव."

"मी फार जड आहे आणि मी माझा तोल नीट सावरू शकत नाही आहे."

"तुला हे झटपट केले पाहिजे. आता झाडापासून दूर जाऊन एखाद्या बऱ्या ठिकाणी उभा रहा. मला वाटते, तू जरासा उजवीकडे गेलास, तर तशी जागा आहे. तिथून तू माझा हात पकड. आणि मी तुला वर खेचते. थोडे तुझ्या पायांच्या मदतीने वर यायचा प्रयत्न कर. बघू कसे जमते आहे."

त्याच्या मलूल चेहऱ्यावर उसने हसू आणत, त्याने तिच्याकडे पाहिले. तू सर्व काही छान जमवले आहेस. मी पण काहीसा असाच विचार केला होता. ही शक्यता मीदेखील विचारात घेतली होती. किती भरभर माझ्या मनात अनेक विचार डोकावून गेले! मी जर झाडाचा आधार सोडला, तर माझे सर्व वजन तुझ्यावर पडेल."

"चालेल. मी तेवढी बळकट आहे.'

"पण जर शाल एवढा भार घेऊ शकली नाही तर? तू ती कशाला बांधली आहेस?"

"ती मी घट्ट बांधली आहे. आता चल."

'पण तुला समजत नाही का? मी तुला माझ्याबरोबर खाली ओढायला नको आहे.'

"जर तसे होणार असेल, तर का नाही? मी एकटी जगून काय करु जर -- "

आणि आता भावना अनावर होऊन, ती तरलपणे हसली. त्याच्या वरील बाजूस तिचा चेहरा चकाकत होता. त्यालादेखील अगदी तिच्यासारखेच वाटले. त्यांनी बरोबर गेले पाहिजे. काही झाले तरी त्यात मग तिच्या बाजूनेही, काही भीतीदायक नव्हते.

त्याने तिचा हात घट्ट पकडला. आणि त्याला जाणवले की तो सहज पाहिजे तशी हालचाल करू शकतो आहे. त्याच्या पायांनी एक बरी जागा शोधली आणि आता काही धोका वाटत नव्हता. क्षणभराने तो काळजीपूर्वक वर चढू लागला. तो वर आला. ते शेजारी शेजारी बसले. शारीरिक व भावनिक धक्क्यातून ते अजून सावरले नव्हते. त्याचे अंग दुखत होते. हे प्रचंड आनंद झाल्यामुळे होते आहे की मज्जातंतुंवरील ताणामुळे होत आहे, ते त्यांना कळत नव्हते. ते खोलवर सुखाचा अनुभव घेत होते. अचानक त्यांची अनाकलनीय स्थिती संपली व त्यांनी एकमेकांचे चुंबन घेतले. एकमेकांना कुरवाळून, तुटक तुटक आनंदी शब्द बोलू लागले. आता धोका संपला, हे त्यांच्या मनात नव्हते. काहीच नव्हते. फक्त वेगळयाच रीतीने उमललेले नवे प्रेम त्यांना जाणवत होते. स्वच्छ व खळाळणाऱ्या तरल सुखाच्या लाटा, त्यांच्या हृदयावरुन वहात होत्या. विचित्र गोष्ट अशी होती की हीच भावना दोघांचीही होती, जसे काही दोन शरीरात एकच ह्रदय धडधड करत आहे. नेहमीप्रमाणे ते हातात हात घालून चालू लागले, तेव्हा परत त्याच जाणीवेने त्यांना झपाटून टाकले. तरीही मध्येमध्ये त्याना काही विचार करायला अवसर राहिला.

तिचे विचार फार पुढे गेले नाहीत. ती आश्चर्य वाटून उद्गारली, “असे कसे झाले, की मी अजून अजून आनंदी होत चालले आहे?" पण त्याचे उत्तर शोधायचा प्रयत्न तिने केला नाही. ही अगदी सहज साधी गोष्ट होती. त्याचे काही स्पष्टीकरण तिला नको होते. तो तिच्यावर पूर्वीपेक्षाही जास्त प्रेम करू लागला.

आत्तापर्यंत तिच्याबद्दल त्याच्या मनात काय भावना होत्या कुणास ठाऊक! भेटलेली सर्वात सुंदर मुलगी, जणू त्याच्यासाठीच बनवली गेलेली. तिचे मन जिंकल्यावर तो फार आनंदी झाला होता. त्याला जग स्वप्नवत वाटू लागले होते. ती त्याची बायको, आयुष्याची साथीदार, त्याचे खेळणे व त्याच्या जाणीवांची पाठराखीण झाली, तेव्हा त्याला नशिबाची कृपा झाल्यासारखे वाटले. पण आता त्याहीपेक्षा ती काहीतरी जास्त असल्याचे त्याला वाटू लागले. तेही जवळजवळ सर्व काही संपते आहे की काय, अशा वेळी! तिच्या चकाकणाऱ्या डोळयात व साध्या दिलासा देणाऱ्या शब्दात, त्याला काळोख्या, अस्वस्थ तरसण्यापेक्षा काही अमर्याद अपर्याप्ततेची चाहूल लागली. आधीही तिच्या प्रेमात त्याला ते दिसले होते, पण आता खात्रीच झाली. जणू काही ते आता खरेखुरे नवरा बायको झाले.

जेव्हा ते हॉटेलवर परतले, तेव्हा त्यांच्या बाबतीत काहीतरी धोकादायक घडल्याचे लोकांना कळले आणि त्यावरून लोकांचे लक्ष उडवण्यासाठी त्याना त्यांचा रोजचा दिनक्रम सुरु करावा लागला. त्याना एकमेकांमध्ये पूर्वी कधीच न वाटलेला मोकळेपणा व सहजता वाटू लागली. काही राजेशाही आमोदाची जाणीव होऊन ते जणू गुरुत्वाकर्षण नसलेल्या जगात, हवेत

तरंगू लागले. जेव्हा ते दोघेच असत, तेव्हा त्यांना जो निखळ शुध्द भावनानुभव डोंगरकडा व गुलाबांच्या घटनेच्या वेळी आला होता, तो ते परत घेत. त्यांना प्रत्येक वेळेस तो तसाच नवीन व अवर्णनीय वाटे. दुसऱ्या दिवशी सकाळी उघड्या खिडकीतून आत येणाऱ्या सूर्यप्रकाशाने तो लवकर जागा झाला. त्याने ती खिडकी सकाळची थंड हवा आत येण्यासाठी सताड उघडली. मोतिया निळसर व दंवाने भिजलेल्या जांभळट चंदेरी रंगाची फुले त्याने पाहिली व कुरणामधून येणारा फुलांचा सुगंध त्याने हुंगला. निळे डोंगरही ओलसर फिकट चंदेरी रंगांचे दिसत होते. सर्व काही लागवडीशी मिळतेजुळते नसणारे, विचित्रपणे स्पष्ट व नवीन होते. सबंध दरी त्यांनी डोंगरकड्यावरून पाहिली तशी, मानवजात तिथे न फिरकलेली, अस्पर्श व पवित्र दिसत होती. त्याने कपडे केले व आतुरतेने त्याची बायको उठायची वाट पाहू लागला. पण तिला उठवून त्रास द्यायची त्याची इच्छा नव्हती. त्याच्या मनात येत होते, “मी यापूर्वी खरा जगलोच नाही.”

त्याने पाहिले की खिडकीशेजारील भिंतीवर काहीतरी लिहिले होते. नेहमी प्रवाश्यांकडून अशा प्रेक्षणीय जागांवर लिहिले जाते तसे, रितीला सोडून, उद्धटपणे भावना प्रक्षुब्ध करणारे असे काहीतरी. पण आता त्याने ते वाचले. त्याच्याशेजारी लिहिलेले देखील वाचले. ती सगळी पुरुष व बायकांची इंग्लिशमध्ये तारखांसकट लिहिलेली नावे होती. त्याने तर्क केला, की ती तरुण जोडप्यांची नावे होती. त्याला तो काय करतो आहे ते कळायच्या आत त्याने खिशातून पेन्सिल काढली व हृदयातील संगीताच्या तालावर, विटकरी लाकडावर आधीच्या सर्व मजकूरावर कडी करणारी एक ओळ लिहिली. इथे त्याचा पोरकटपणा सहज दिसून येत होता.

नंतर त्याने मागून त्याच्या बायकोचा हसतानाचा नवलपूर्ण आवाज ऐकला.

“तू काय करतो आहेस?”

स्वतःला हे करताना पाहून तो शरमला व बोलला, “ओहो, काहीतरी आचरटपणा करतो आहे. पण त्याने वळून रोखून बघणाऱ्या तिच्या चेहऱ्याकडे पाहिले, तेव्हा त्याने चालत पलंगाजवळ जाऊन, उचलून तिला खिडकीशी आणले. तिथे जेव्हा तिचे डोळे उजेडाला सरावले तेव्हा तिने त्याच्या ओळखीच्या अक्षरात लिहिलेले पाहिले, “मी आनंदी आहे”

ती ओळ तिच्या नजरेत इतकी रुतली गेली आणि आता ती तिला स्पष्टपणे दिसली. ती बसली व या ओळीकडे त्याला आणणाऱ्या सर्व घटना आठवू लागली.

अजूनही बरेच काही ठळकपणे तिच्या नजरेसमोर आले -- बर्फाचे मुगुट ल्यालेले डोंगर, पाटीच्या दगडांचे छत असलेल्या घरांची गावे, ‘वेसेन रोस्ली’ मधील मंद दुधाचा वास, कुरणभर विखुरलेल्या फुलांच्या गालिच्याचा सुगंध, हे सर्व सुवासाच्या अनुभवाने अधिक खरे वाटत होते. तिने परत अल्पाईन गुलाबाची झुडुपे बघितली. ‘पॅलुड मार्चा’कडे जाणारी उताराची वाट बघितली. त्यादिवशीच्या तिच्या कपड्यांबरोबर या सर्व आठवणी तिच्या मनात जाग्या झाल्या.

तिच्या मनात तिची स्मृती व्यापून उरलेले, न आठवणारे असे काहीच नव्हते. ते काय होते, ते तिला खरच जाणवत होते. मात्र ते इथपर्यंत कसेकसे आले ते थोडे पुसटपणे आठवत होते. त्या स्मृतींची उंची, खोली, उसळणाऱ्या आयुष्याचा वेग व त्याहूनही तिच्या धमन्यात वहाणाऱ्या रक्ताचे जोराचे अभिसरण, तिच्या लक्षात येत नव्हते. अशा सर्व गोष्टी लक्षात ठेवायला तिची स्मरणशक्ती कमी पडत होती. आयुष्याच्या गाभ्यातील अर्थ असा वाहून चालला होता. प्रत्येकाला त्यातील काही अंशच फक्त पकडणे शक्य होत होते. त्या धोकेबाज घटनेनंतरचा क्षण तिच्या हृदयात आनंद, तरल भावना व त्याच्या मनातील विचार उमटवून गेला. जरी आनंदाची भावना पुसट झाली तरी, कुठेतरी ती अजाण तरल भावना भरून राहिली होती, त्यामुळे ती विसरली जाणे शक्य नव्हते. सर्वात वरकडी म्हणजे त्याने दिलेली अविचल सुखाची कबुली आठवून, ती भलतीच खूष झाली होती.

आता तिने नेहमीप्रमाणे स्वतःला बजावले, ती आणि तो त्यांचा आनंद कायम असाच ठेवतील. कदाचित तो एवढ्या उंचीचा रहाणार नाही. बराच काळ टिकणार नाही. कारण आयुष्य तसेच आहे. पण आयुष्यात एका घडीला त्याने शिखर गाठले होते व त्याची अनुभूती त्यांना मिळाली होती, हेदेखील कमी नव्हते. जोपर्यंत ते दोघे एकमेकांचे राहतील, तोपर्यंत आयुष्याची वाट त्यांना कुठेही घेऊन गेली, तरी ते त्या क्षणाकडे थोड्याफार नेमकेपणे येऊ शकतील. त्या वयस्क बाईसाहेब स्वप्नरंजनातून जाग्या झाल्या.

मुलगा आणि सून न ठरवता एन्गाडाइनला गेले होते. इटालीमध्ये कॉलऱ्याचा उद्भव झाल्याने, विशेषतः साथीची बातमी गुप्त ठेवली गेल्याने, त्यांनी केलेले सर्व बेत कोलमडले. साथ जिकडेतिकडे पसरल्याच्या अफवा उठत होत्या. पण शेवटी त्यांनी जिथे जायचे ठरवले, तिथे ती साथ अजून पोचली नव्हती आणि पोचणारही नव्हती. त्यामुळे उत्तरेकडील प्रवाश्यांचे लोंढे घाबरून मागे फिरले व नक्की जिथे जायचे असे ठरवले होते, तिथे न जाता जवळपास गेले आणि तिथे त्याना भेटणाऱ्या लोकांनी सांगितले की ते कसे धोक्यापासून थोडक्यात बचावले. काहीजण गोंधळून अशा संभ्रमात होते की त्याना कॉलऱ्याची लागण झाली आहे, पण प्रत्यक्षात तसे नसल्याने त्यांना हॉटेलांमध्ये प्रवेश दिला गेला. सगळीकडे गोंधळ चालू होता आणि आता रात्री आपण कुठे मुक्काम करू, हे कुणाला कळत नव्हते.

पण तरुण स्वीडिश जोडपे अशा संभ्रमात नव्हते. इटाली सोडताना त्याना झालेल्या दुःखाने त्याना प्रवाश्यांच्या जथ्याबरोबर वाहून नेले. सेंट मॉरिट्झला इतकी गर्दी होती, की तिथे त्याना हॉटेलांमध्ये जागाच मिळाली नाही. मग ते उत्तरेला लहानशा गावाकडे गेले. तिथे बेव्हर्समध्ये त्यांना आसरा मिळाला. त्या नावावरून त्यांना काही समजले नाही. पण 'वेसेन रोस्ली' हे नाव ऐकल्यावर त्याना आठवले, की कुणीतरी त्यांना या नावाची शिफारस केली होती. त्यांचा प्रवास तसा कंटाळवाणा चालला होता. नंतरच्या प्रवासात त्यांना थंडीच्या लाटेशी व बर्फाच्या वादळाशी सामना करावा लागला. पुढे उन्हाळयाची प्रचंड काहिली त्यांनी अनुभवली.

त्यामुळे ते हनिमूनसाठी आलेले जोडपे वाटेनासे झाले होते. पण त्यावेळी हॉटेलच्या जाणकार लोकांनी त्याना योग्य अशा खोल्या दिल्या. जरी इमारत जुन्या वळणाची असली तरी तिथे त्यांना खूप समाधान लाभले. कॉलऱ्याची समस्या संपेपर्यंत त्यांनी तिथे रहायचे ठरवले. त्याच संध्याकाळी त्यांच्यावर नको ती वेळ आली. त्याना बरे वाटत नव्हते आणि त्यानी जेवायचे टेबल सोडले. वरती खोलीमध्ये तो झोपायला जात असताना त्याला ताप चढल्यासारखे वाटले. दोघांनाही वाटले की दक्षिणेकडून येणाऱ्या कोण्या प्रवाश्याकडून त्याला कॉलऱ्याची लागण झाली असली पाहिजे. पण कोणीच तसे बोलले नाही. ते शक्य होते एवढेच. पण त्यातला वाईट भाग असा होता की हॉटेलच्या लोकांनाही असे वाटल्याने, मालक स्वतः दारात योग्य अंतर राखून उभा राहिला व त्याने त्याना दुसरे हॉटेल शोधायची विनंती केली, जरी कुठले हॉटेल ते तो सांगू शकला नाही. त्याला समजले की हे सांगायला त्याने उशीर केला आहे व आता इतक्या उशिरा त्यांनी कुठे जायचे हा प्रश्न होताच. पण संसर्गाच्या भीतीने मालक त्यांना ठेऊन घेण्यास तयार नव्हता. त्या मालकाचा नाईलाज होता त्या नवरीला अडचण समजली, पण लगेच हॉटेल सोडणे शक्य नव्हते.

तिने याबाबत पूर्ण विचार केलेला होता. त्यामुळे ती कशीबशी तयार झाली व परत कपडे करू लागली. ती म्हणाली, “कॉलरा झाला असेल, इतका टोकाचा विचार करायची गरज नाही. पण तसे समजून आपण वागले पाहिजे.” मालकाने शक्य तेवढे लवकर, तरीही बहुधा दुसऱ्या दिवशी सकाळी, डॉक्टर पाठवायचे कबूल केले. पण इतरांना त्याची बाधा होऊ नये म्हणून वेगळी, थोडी अलग खोली देण्यात आली.

एवढे सगळे झाल्यावर त्या नव्या नवरीवर आजारी माणसाची जबाबदारी आली.

नवऱ्याने विचारले, “तू कशी काय माझ्याकडे बघू शकणार आहेस? तू सुद्धा माझ्याइतकीच आजारी दिसते आहेस.”

“ते फक्त प्रवासामुळे आहे. आता मी दमलेली नाही. तुला ताप आहे. मला नाही. मी काही वेगळा विचार करते आहे.”

तिने आता निश्चय केला होता आणि तो ती अंमलात आणणार होती. काहीही झालेले असले, तरी भीती न बाळगण्याइतकी बळकट ती नक्कीच होती. तो दमल्याने व शक्तिपात झाल्याने काही बोलू शकत नव्हता. तिने सर्व सूत्रे तिच्या ताब्यात घेतली. त्याच्या अंगातून कळा येऊ लागल्या. पण नक्की काय होते आहे ते कळत नव्हते. ती रात्रभर त्याच्या उशाशी बसून राहिली. त्याला बरे वाटण्यासाठी जे जे करता येईल, ते ते करत राहिली. तिचे बहुतेक प्रयत्न सफल झाले.

दुसऱ्या दिवशी डॉकटरने योग्य निदान करून औषधे दिल्याने, त्याला बरेच बरे वाटले. बहुधा धोका खरा नव्हता. जरी डोंगराची उंची फार नव्हती, तरी बहुधा ती हवा बाधल्यामुळे आलेली प्रतिक्रिया होती. हवेच्या दाबातील व तापमानातील फरकामुळे हे उद्भवले असावे. पण कदाचित काही गंभीर यातून निघाले, तर त्याला एका बाजूला वेगळे ठेवलेलेच बरे,

असा विचार करून आणि हॉटेलमधील इतर लोकांच्या भीतीने, हे वेगळे ठेवायचे नाटक असल्याचे नवरीला समजले. डॉक्टरने जेव्हा तिला तपासायचा प्रस्ताव मांडला, तेव्हा तिने तो फेटाळून लावला. कारण तिला आजारी पडायला सवड नव्हती. ती खरेच बरी होती, की तिची जबरदस्त इच्छाशक्ती तिला तसे करायला भाग पाडत होती हा प्रश्न अनुत्तरीतच राहिला.

दुसऱ्या दिवशी तिला काळजीचे काही कारण उरले नाही. डॉक्टरचा तिच्या नवऱ्याबद्दलचा अहवाल सांगत होता, की तो थोडेच दिवसात बरा होईल.

ते काही दिवस मग दोघांसाठी खूप शांततेचे गेले. काळाच्या रेट्याबरोबर ते अविचलपणे जगत राहिले. आयुष्याचा ताण झेलत राहिले. त्यांचे एकमेकांवरचे प्रेम कमी न होता, उलट जास्त समजून घेणारे झाले. मागील पिढीपेक्षा वेगळे असे, प्रेम बोलून दाखवायच्या पिढीत ते जन्माला आले होते. त्याना असे वाटले की प्रेम एक प्रकारचा अमूल्य ठेवा म्हणून, आयुष्यामधून वेगळा काढता आला पाहिजे आणि आयुष्य स्वतंत्रपणे पूर्णत्वाला नेले पाहिजे. जसे एखादे फूल त्या झाडापासून वेगळे काढून, जपून ठेवावे तसे. पण अती काळजीने त्याचे आस्तित्व संशयास्पद व्हायला नको. एखाद्या जुगाऱ्याचा तीव्र इच्छेसारखे किंवा वेड्या सचोटीसारखे, ते विशेष ठरायला नको. “मी या पत्त्यावर माझे सर्वस्व लावतो आणि जर हरलो तर माझे सर्व काही डुबले.” हे सर्व म्हणजे आदर्शतेचा मुखवटा घातलेली सुखलोलुपतेची आस असते. कितीही मनापासूनच्या भावना असल्या तरी त्यात धोकादायक असा अहंपणा असतोच.

त्या दोघांच्या हनिमूनमधील आनंद अजून तरी मावळला नव्हता. उलट हे आजारपण हा त्यासाठी लागणारा बळकट पाया ठरला होता. एकदोनदा परीक्षेच्या क्षणी त्यांना असे वाटले होते, की तो पाया डळमळीत होतो आहे की काय. पण आता आजारपणाच्या शांत खोलीत, आरामशीर वातावरण झाले होते. एकमेकांबद्दल वाटणाऱ्या भावनांमध्ये नेमकेपणा आला होता. त्यांच्या विचारात काही अडथळा आणणारे मुद्दे नव्हते. त्याना धमकावणाऱ्या धोक्याने त्यांचे आयुष्य अधिक उजळून निघाले. रोजच्या जगण्यातील साध्या गोष्टींच्या मागणीने, ते अधिक विशाल बनले. कितीही गंभीर परिस्थिती उद्भवली तरी आपण योग्य तो निर्णय घेऊन धैर्य दाखवू शकतो, असा आत्मविश्वास तिच्याठायी निर्माण झाला. आणि तिच्यात सौदर्यापेक्षा अधिक चांगले असे काही आहे हे नवऱ्याला समजले. त्याचे आजारपण संपले व ते शांत, तेजस्वी व जादुई आनंदात बदलले. त्याना त्यांचा भविष्यकाळ अधिक स्पष्टपणे दिसू लागला.

ती खोली सोडण्यासाठी दोघे तयार झाले त्या दिवशी सकाळी ती जागा, त्यांची विशेषत्वाने आवडती ठरली. तिला खास महत्व प्राप्त झाले. स्वच्छ चमचमत्या निळया सूर्यप्रकाशात बाहेरचे जग उजळून निघाले. त्यांना भिंतीवर काही लिहिलेले दिसले. ते लिहिणाऱ्यांच्या भावनांशी तद्रूप होऊन, त्यांनी मित्रत्वाने ती नावे वाचली. ते लोक एकदा इथे आले होते व नंतर निघून गेले होते. त्यात थोडी उदासी होती. पण लगेच तिथे दुसरा असा विचार उमटला, “दुसऱ्या कोणालाही या जागेबद्दल जे वाटणार नाही, ते आम्हाला नक्की वाटते आहे.”

अचानक तरुण बायको म्हणाली, “इथे स्वीडिशमध्ये एक ओळ आहे. तिथे नाव किंवा तारीख नाही. पण ते फार पूर्वी लिहिलेले आहे. त्याजवळ काय लिहिले आहे, त्यावरून तू ते जाणू शकशील. इतकी विनोदी गोष्ट लिहिली आहे!”

तिच्या नवऱ्याने विचारले, “ती काय आहे?’

“ती तूच वाच. आपल्यापैकी कुणीतरी ती लिहिलेली असू शकेल.”

त्याने ती मोठ्याने वाचली, “*Jag ar lycklig (मी आनंदी आहे)*” आणि त्याने थरथरत ते हस्ताक्षर ओळखले. त्याच्या मनात त्याला लख्ख आठवले, त्याने केव्हा व कसे पहिल्यांदा ‘वेसेन रोस्ली’ हे नाव ऐकले होते.

तो सभ्यतेने म्हणाला, “माझ्या वडिलांनी हे लिहिले आहे. तो काळ बरोबर जुळतो आहे. ते त्यांच्या हनिमूनसाठी इथे आले होते.”

“हो, अर्थात मलाही आता आठवले.” जरी ते एकमेकांकडे बघून हसत होते, तरी त्याना दोघांनाही रडू फुटले. ज्याने हे लिहिले तो अनेक वर्षांपूर्वी आनंदाने मरण पावला, पण तरीही अंधाराच्या जाणीवेबरोबर त्याचा थक्क करणारा खोलवर ठसा इथे उमटलेला आहे -- त्याचे अक्षय कोरले जाणे, अद्वितीयता, चिरंतन नावीन्य, सौदर्य, ताजेपणा, गांभीर्य व जादुगिरी इथे वसते आहे.

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. वृषाली जोशी यांचे हे दहावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशीच वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. डॉ. वृषालींसारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१७ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (दोन), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १० पुस्तके), विनीता देशपांडे (४ पुस्तके) उल्हास हरी जोशी(५), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।